# INTRODUCTION

TO THE

# HISTORY OF INDIA,

ABRIDGED FROM THE WORK

OF

THE HON. MOUNTSTUART ELPHINSTONE,

BY THE LATE

BÁL GANGÁDHAR SHÁSTRI, Esq.

A REPRINT OF THE NEW EDITION.

**EDITED BY MAJOR CANDY.**

*Registered under Govt. of India's Act No. XXV. of 1867.*

Bombay:

GOVERNMENT CENTRAL BOOK DEPOT.

1872.

*Price 8 Annas.*

BOMBAY:
PRINTED AT THE "ORIENTAL STEAM PRINTING PRESS," FORT.

# हिंदुस्थानाचा इतिहास.

हें पुस्तक

बाळ गंगाधर शास्त्री जांभेकर

ह्यांनीं,

नामदार एलफिन्स्तन साहेब ह्यांच्या इंग्रेजी भाषेंतील ग्रंथाचा संक्षेप करून मराठी भाषेंत केलें.

तें

मेजर क्यांडी साहेब ह्यांनीं शोधिलें.

---


आवृत्ति तिसरी.

---

(सन १८६७ च्या २५ आक्टा प्रमाणें हें पुस्तक रजिस्टर केलें आहे.)

मुंबई.

गवर्नमेंत सेंत्रल बुक डिपो.

---

शके १७९४.

इसवी सन १८७२.

किंमत आठ आणे.

मुंबईमध्यें
"ओरिएन्टल" छापखान्यांत छापिलें.

# प्रस्तावना.

आपल्या देशांत पूर्वींपासून कोण कोण राजे झाले, त्यांनीं राज्य कोणत्या प्रकारें केलें, त्यांचे कारकिर्दींत विशेष गोष्टी कोणत्या झाल्या, आणि मोठे नामांकित पुरुष कोण कोण जन्मले, हें समजण्यापासून सर्वांस उपयोग होतो. ह्या गोष्टींचा प्रसंग चौघांमध्यें वारंवार येतो, तशासमयीं त्या अगदीं ठाऊक नसल्या तर तें लज्जेस आणि संकोचास कारण होतें. ही गोष्ट कोणास कदाचित लहान वाटेल, परंतु प्राचीन इतिहास समजल्यापासून दुसरे बहुत उपयोग होतात. आरंभीं लोकांची स्थिति कशी होती, ती पुढें कसकशी सुधरत चालली, राज्यें कशीं वाढलीं, आणि कोणत्या कारणांनीं मोडलीं, ह्या सर्व गोष्टींचा विचार करण्यांत मनास उद्योग आणि आनंद हीं दोनही होतात; आणि पूर्वीं जे पुरुष होऊन गेले त्यांचे गुण आणि दोष ह्यांचीं उदाहरणें स्पष्ट दृष्टीस पडून चांगला मार्ग आचरण्याविषयीं वारंवार बोध होतो. ह्याकरितां बहुतेक देशचे लोक स्वदेशाचा इतिहास मोठ्या अगत्यानें पढतात. तसें करावयास ह्या देशांतील लोकांनीं जरी इच्छा केली असती तरी आजपर्यंत कांहीं साधनें नव्हतीं, म्हणून मुसलमानांच्या ह्या देशांतील राज्याचा हा पुढील इतिहास संक्षेपें लिहिला आहे.

हा ग्रंथ पढणाऱ्यांनीं राजांचीं नांवें, त्यांच्या जन्मादिकांच्या तारखा, लढाया, घात, मारामाऱ्या, इत्यादि गोष्टींवरच केवळ लक्ष्य देऊं नये; त्यांच्या वाचण्यांत ज्या ज्या गोष्टी येतील त्यांविषयीं विचार करीत असावें. हा विचार करण्याचा प्रकार त्यांस समजावा म्हणून कारण पाहून कोठें कोठें राजांच्या गुणांविषयीं किंवा त्यांच्या आकृतींविषयीं जें सहज मनांत यावयाजोगें तें लिहिलें आहे; आणि मुसलमानांच्या राज्याची वृद्धि आणि क्षय ह्यांविषयीं एक प्रकरण वेगळें करून शेवटीं जोडिलें आहे. अशा जातीचे विषय अधिक लिहिले असते, तर ग्रंथापासून अधिक मनोरंजन आणि बोध झाला असता; परंतु हा उद्योग मुख्यत्वें मुलांकरितां आहे, त्यांचें लक्ष्य अशा विषयांच्या विचारांपेक्षां कथांकडे लवकर लागतें, म्हणून झालेल्या गोष्टींचा संग्रह मात्र एथें केला आहे. ह्यावर आणखी विस्तार पुढें व्हावा ही इच्छा आहे.

# अनुक्रमणिका.


| प्रकरण. | | पृष्ठ. |
|---|---|---|
| | देशाचें वर्णन.... .... .... .... | १ |
| | **भाग पहिला प्राचीन इतिहास.** | |
| १ | मुसलमानांच्या येण्याच्या पूर्वींचा वृत्तांत-उत्तर हिंदुस्थानांतील राज्यें .... .... | ४ |
| २ | दक्षिणेंतील प्राचीन राज्यें .... .... | ११ |
| ३ | हिंदुस्थानांत मुसलमान प्रथम स्वाऱ्या करूं लागले त्यांचें वर्तमान .... .... | १७ |
| ४ | सुलतान महमूद ह्यांच्या स्वाऱ्यांविषयींचा वृत्तांत.... .... .... .... .... | १९ |
| ५ | महमूदाचे वंशज गजनवी राजे ह्यांचें वर्तमान इ० स० १०३० पासून ११८६ पर्यंत .... ... .... .... .... | २६ |
| ६ | गोरी वंशाचे राजांचें वर्तमान इ० स० ११८६ पासून १२०६ पर्यंत.... .... | ३२ |
| | **भाग दुसरा अर्वाचीन इतिहास.** | |
| १ | गुलाम राजांचें वर्तमान इ० स० १२०६ पासून १२८८ पर्यंत.... .... | ३५ |

| प्रकरण. | | पृष्ठ. |
| --- | --- | --- |
| २ | गिलची अथवा खिलजी वंशाच्या राजां. चें वर्तमान इ० स० १२८८ पासून १३३१ पर्यंत.... .... .... .... | ४२ |
| ३ | तघलख वंशाचे राजांचें वर्तमान. इ०स० १३३१ पासून १४१२ पर्यंत .... | ४९ |
| ४ | सय्यद व लोदी हे वंश. इ० स० १४१४ पासून १५२६ पर्यंत.... .... | ५९ |
| ५ | मोंगली वंश. इ० स० १५२६ पासून १५३० पर्यंत.... .... .... .... | ६३ |
| ६ | हुमायून. इ० स० १५३० पासून १५५६ पर्यंत.... .... .... .... | ६६ |
| ७ | अकबर ह्याचे वेळेस हिंदुस्थानांत स्वतंत्र राज्यें होतीं त्यांविषयींचें वर्तमान .... | ७४ |
| ८ | अकबर बादशाहा. इ० स० १५५६ पासून १५९२ पर्यंत.... .... .... | ७७ |
| ९ | अकबर बादशाहा. इ० स० १५९२ पासून १६१५ पर्यंत.... .... .... | ८८ |
| १० | जहानगीर बादशाहा. इ० स० १६०५ पासून १६२७ पर्यंत.... .... .... | १०० |
| ११ | शाहाजहान बादशाहाची कारकीर्द. इ० स० १६२७ पासून १६५८ पर्यंत. | १०९ |
| १२ | औरंगजेब बादशाहा. इ० स० १६५८ पासून १७०७ पर्यंत.... .... .... | ११९ |

| प्रकरण. | | पृष्ठ. |
|---|---|---|
| १३ | बाहादुरशाहा आणि फरूकशीर इ० स० १७०८ पासून सन १७२० पर्यंत. | १३९ |
| १४ | महंमदशाहा. इ० स० १७१९ पासून सन १७३९ पर्यंत .... .... .... | १४० |
| १५ | महंमदशाहा. इ० स० १७३९ पासून १७४८ पर्यंत.... .... .... .... | १४७ |
| १६ | इ० स० १७६० त मोंगली राज्याची समाप्ति झाली तेथपर्यंत, वर्तमान........ | १५२ |
| १७ | मुसलमानांच्या राज्याविषयीं साधारण विचार.... .... .... .... .... | १५८ |

# हिंदुस्थानाचा इतिहास.

## देशाचें वर्णन.

१. हिंदुस्थानाचे उत्तरेस हिमालय पर्वत; पूर्वेस ब्रह्मपुत्रनद, व त्याचे पलिकडेस ब्रह्मदेश; आग्नेयी, दक्षिण, आणि नैर्ऋत्य, ह्या तीन दिशांकडे समुद्र; आणि पश्चिम दिशेस सिंधुनद, म्हणजे अटक नदी, आहे.

२. काश्मिरापासून कन्याकुमारी केपापर्यंत ह्या देशाची लांबी १९०० मैल, आणि ब्रह्मपुत्रनदाच्या पलिकडील डोंगरांपासून सिंधुनदाच्या मुखापर्यंत रुंदी १५०० मैल आहे.

३. हिंदुस्थानाच्या सुमारें मध्यभागीं पूर्वपश्चिम विंध्याद्रिनामें पर्वत आहे; तेणेंकरून उत्तर हिंदुस्थान व दक्षिण हिंदुस्थान असे ह्या देशाचे दोन भाग झाले आहेत.

४. उत्तर हिंदुस्थानाचे चार विभाग आहेत; सिंधुनदाच्या कांठचा प्रदेश, भागिरथीच्या कांठचा प्रदेश, सिंधुनदाचे पूर्वेकडचा ओसाड वालुकामय प्रदेश, आणि मध्यदेश.

५. सिंधुनदाच्या कांठच्या प्रदेशांतून पांच नद्या वाहतात, म्हणून त्यास पंजाब असें नांव आहे.

६. ह्या प्रदेशाचा पूर्वेकडील विभाग सपाट आहे, परंतु पश्चिम आणि दक्षिण ह्या दिशांकडील विभाग उंच सखल आहे. ह्या प्रदेशांतून **सतलज**, **बिया**, **रावी**, **चिनाब**, आणि **जेहलम**, ह्या पांच नद्या वाहात जाऊन खालीं **सिंधुनदास** मिळाल्या आहेत. ह्या नद्यांचें पाणी पिणारा देश मात्र आबाद आहे; त्यावांचून राहिलेला देश ओसाड आहे.

७. **भागीरथीच्या** कांठचा सारा प्रदेश मैदान आहे; व त्यांत सकल धान्यें पिकतात. त्यांतच **बंगाला** प्रांत आहे. ह्या **भागीरथी** नदीच्या कांठचा प्रदेश पूर्वीपासून हिंदूच्या राहाण्याचें स्थान होय असें समजावें.

८. **सिंधुनदाच्या** पूर्वेकडचा प्रदेश उत्तरेस **सतलज** नदीपासून दक्षिणेस समुद्रापर्यंत एकसारखा सपाट व वालुकामय आहे; त्यास **मारवाड** असें म्हणतात. त्यामध्यें **जोदपुराजवळ** कांहीं प्रांतांत पीक होतें, आणि **जसलमीर** शहरच्या सभोंवतालच्या प्रांतांत कांहीं झाडी आहे; वरकड देश ओसाड आहे. हा प्रदेश आणि **गुजराथ** ह्या दोहोंच्या मध्यें **कच्छ** प्रांत आहे. ह्याचे पूर्वेस **अरवली** नामें पर्वत आहे.

९. वर सांगितलेल्या पर्वताचे पूर्वेस **मध्यदेश** हा समुद्राचे सपाटीपासून सुमारें २००० फूट उंच आहे. हा प्रदेश उंच सखल असून ईशानीकडेस उतरता आहे. ह्यामध्यें **माळवा** इत्यादि प्रांत आहेत.

१०. दक्षिण हिंदुस्थानांत **नर्मदा** नदीचे दक्षिणेस **सातपुडा** डोंगर आहे. त्याचे दक्षिणेस **तापीनदी** वाहती.

तिजपासून दक्षिणेकडला बाकीचा सर्व देश त्रिकोणाकृति आणि पूर्वपश्चिम दिशांकडे उतरता असा आहे. ह्या दोनही दिशांकडेस सह्याद्रिनामें एक मोठी उंच पर्वतांची ओळ आहे. हिचा पश्चिमेकडचा भाग अधिक उंच आहे, त्यापासून समुद्रापर्यंत प्रदेश अरुंद आणि उंच सखल आहे.

११. वर्धानदीपासून **गोदावरी** नदीपर्यंत एक विभाग, आणि **गोदावरीचे** दक्षिणेस एक विभाग, असे दक्षिण हिंदुस्थानाचे दोन विभाग आहेत. त्यांतून उत्तरेकडील आणि पूर्वेकडील प्रदेशांत मोठीं घोर अरण्यें आहेत, आणि ह्यांत लागवड आणि वस्ती थोडथोडी व विरळ आहे. दक्षिण आणि पश्चिम ह्या दोन दिशांकडील प्रदेश सपाट व आबाद आहे. **दक्षिण हिंदुस्थानांत महाराष्ट्र, कर्नाटक, द्रविड,** आणि **तैलंगण,** हे प्रांत आहेत.

१२. **हिंदुस्थानाचा** विस्तार १२,८७,४८३ चौरस मैल आहे, ह्यांतील लोकांची संख्या सुमारें १४,००,००,००० आहे.

# भाग १.

## प्राचीन इतिहास.

### प्रकरण १.

### मुसलमानांच्या येण्याच्या पूर्वींचा वृत्तांत—उत्तर हिंदुस्थानांतील राज्यें.

१. सर्व हिंदुस्थान हा देश कधींहि एका पुरुषाच्या अधिकाराखालीं होता असें दिसत नाहीं. हिंदूंचे सूर्यवंशी आणि सोमवंशी राजे कलियुगास आरंभ होण्याच्या पूर्वीं म्हणजे पांच साहा हजार वर्षांच्या पूर्वीं होऊन गेले असें हिंदु मानितात. त्यावेळीं मनुष्यांस ईश्वरानें उत्पन्न केलें नव्हतें, असें पश्चिमेकडील लोकांचें मत आहे.

२. हिंदु लोकांच्या पुराणांत लिहिलें आहे कीं, कलियुगाच्या आरंभीं पांडव कौरव ह्यांचें युद्ध होऊन बहुतेक क्षत्रिय नाशाप्रत पावले; आणि त्यांच्या शेष राहिलेल्या कुळांतील राजांनीं १५०० वर्षें पर्यंत हिंदुस्थानांत राज्य केलें. ह्या दीड हजार वर्षांत झालेल्या राजांचीं नांवेंही त्या ग्रंथांत आढळतात. शेवटीं **चंद्रगुप्त** म्हणून कोणी शूद्र हा नंदनामक राजास मारून आपण **पाटलिपुत्र** नगरांत सिंहासनावर बसला, आणि तेव्हांपासून अभीर, गंधर्व, शक, यवन इत्यादिक लोक जागोजागीं राज्यें करूं लागले, असें त्या पुस्तकांवरून दिसतें.

३. फार प्राचीन काळामध्यें मिसर देशचा **सेसोस्त्रिस** राजा आणि **आसिरिया** देशची **सेमिरामिस**

राणी ह्यांनीं **हिंदुस्थानावर** स्वाऱ्या केल्या असें पश्चिमे-कडील लोकांच्या ग्रंथांत लिहिलें आहे; परंतु त्या स्वा-ऱ्यांविषयींचें खचित वर्तमान माहीत नाहीं. **इसवी** सनाच्या पूर्वीं सुमारें पांचशें वर्षांवर **पारसी** लोकांचा राजा **डारीयस हिस्तास्पिस** ह्यानें **हिंदुस्थानचे** उत्तरेकडील कांहीं प्रांत जिंकून घेतला. तो त्याच्या राज्याच्या वीस सुभ्यांपैकीं एक सुभा झाला. तेथें त्याचा **सत्रप** (म्हणजे छत्रप) रहात असे. तो त्यास खंडणीबद्दल प्रतिवर्षीं **हत्ती** आणि इतर द्रव्य पाठवीत असे. **डारीयस** ह्याचा मुल-गा **जरक्सीज** ह्यानें **ग्रीस** देशावर स्वारी केली ते वे-ळीं त्याच्या बरोबर हिंदुस्थानचें कांहीं सैन्य होतें, असें **ग्रीक** ग्रंथांवरून समजण्यांत येतें.

४. **मासिदोन** देशचा **शिकंदर** बादशाहा हा फारस म्हणजे इराण देश जिंकून आला, तो प्रथम ५००० स्वार आणि ६००० पायदळ इतक्या सैन्यास-हित **सिंधुनद** उतरला (इ०स०पू० ३२६) त्यास **हैदा-स्पिस** म्हणजे **झेहलम** नदी हिच्या पश्चिम कांठचा **ताक्सिला** एथील राजा खंडणी घेऊन शरण आला. त्या नदीच्या पूर्वतीरीं कोणी एक **पोरस** (म्हणजे पौरव अथवा पंवार) नामें राजा होता तो २०० हत्ती, ३०० रथ, ४००० स्वार आणि ३०००० पायदळ इत-कें सैन्य घेऊन त्याच्या पुढें युद्धास उभा राहिला. त्याची आणि **शिकंदराची** मोठी लढाई होऊन **पोरसाचा** पराजय झाला. **शिकंदराची** इच्छा **भागीरथी** नदी-पर्यंत देश जिंकीत जावयाची होती; परंतु तो **हैफासि-**

स म्हणजे बियानदी हिच्या कांठीं जेव्हां येऊन पोहोंचला, तेव्हां त्याची फौज बिथरली. त्याचें कारण असें कीं ती युद्धास आणि श्रमास कंटाळली होती, आणि तींतील सर्व लोकांस स्वदेशास परत जाण्याची इच्छा झाली होती. त्या लोकांनीं आपला आग्रह सोडावा ह्याविषयीं शिकंदरानें फार प्रकारें प्रयत्न केला; परंतु तो निष्फळ झाला. असें पाहून त्यानें स्वदेशास परत जाण्याचा निश्चय केला. तो बादशाहा आपल्या सैन्यासहित मचव्यांत बसून सिंधुनदांतून खालीं त्याच्या मुखाजवळ आला. नंतर हिंदुस्थान आणि इराण ह्यांच्यामध्यें समुद्राचा कांठ कोणत्या प्रकारचा आहे हें समजण्याकरितां त्यानें आपला निअर्कस नामें सरदार थोड्या सैन्यासहित जळमार्गानें पाठविला; आणि आपली बहुतेक फौज घेऊन आपण सिंध आणि मेक्रान ह्या प्रांतांतील वाळवंटाच्या वाटेनें बाबिलन शहरास परत गेला. पुढें थोड्या दिवसांनीं तो पराक्रमी आणि विख्यात राजा मरण पावला.

९. ह्या शिकंदर बादशाहाचे वेळेस पश्चिम हिंदुस्थानामध्यें अनेक राज्यें होतीं, आणि त्यांमध्यें तपश्चर्या करण्याचे व सती जाण्याचे वगैरे संप्रदाय होते; असें ग्रीक ग्रंथकारांनीं लिहिलें आहे. प्राचीन लोकांची राजधानी पाटलिपुत्र, म्हणजे पाटणा, एथील राजा चंद्रगुप्त ह्याजवळ कांहीं ग्रीक फौज होती, आणि शिकंदराचा सरदार सिरिया देशाचा राजा जो सिलूकस ह्याचा वकील मेगास्थ-

इ० स० पू० ३२४.

नीस हा त्याच्या दरबारांत बहुत काळपर्यंत होता.* पुढें ग्रीक लोकांचें एक संस्थान बाक्त्रिया देशांत स्थापिलें होतें तें १३० वर्षेंपर्यंत चालल्यावर स्कुथी लोकांनीं बुडविलें. तेथील राजे आणि हिंदु राजे ह्यांच्या मध्यें अनेक प्रकारें व्यवहार चालत असे, असें मानावयास प्राचीन लेखांचा आधार आहे.

६. **चंद्रगुप्ताच्या** वंशजांनीं **मगध** म्हणजे **बहार** ह्या देशांत दहा पिढ्यांपर्यंत राज्य केलें. पुढें आणखी शूद्रजातीचे तीन राजवंश झाले; त्यांतील शेवटल्या वंशाचें नांव आंध्र असें होतें. त्या वंशाची समाप्ति इसवी सन ४३६ ह्यांत झाली. त्याकाळच्या राज्यांत **चंद्रगुप्ता** पासून तिसरा राजा **अशोक** ह्या नांवाचा मोठा प्रतापी झाला, तो बौद्धमतानुसारी होता. त्याच्या स्वाधीन मोठें राज्य होतें, असें जागोजागीं शिलालेख आहेत त्यांवरून समजण्यांत येतें.

७. **मगध** प्रांतामध्यें +**बुद्धाचा** जन्म झाला. त्यानें जो धर्म प्रवृत्त केला, तो बहुतेक साऱ्या **हिंदुस्थानांत**

---

* हा चंद्रगुप्त, आणि नंदास मारून सिंहासनावर बसलेला हिंदूंचा चंद्रगुप्त हा एकच असें मानावयास बहुत आधार आहेत. त्यांत चंद्रगुप्ताचा आणि यवन राजांचा स्नेह होता, आणि त्याजवळ यवनांची फौज होती असे जे हिंदूंच्या ग्रंथांतील लेख आहेत हा मोठा प्रबळ आधार आहे.

+ बुद्धाचे अवतार अनेक झाले आहेत असें बुद्धमतानुसारी मानितात. त्यांतील शेवटचा गौतम हा इ०स०पू० ५४० वर्षांवर झाला असें समजलें आहे. बुद्धगया एथें एक प्राचीन शिलालेख आहे त्यावरून एका बुद्धाचा जन्म इ०स०पू० १०१४त झाला; त्याचेंच नांव शाक्यसिंह असें दिसतें.

प्रबळ झाला, आणि **बौद्ध** व **ब्राह्मण** ह्यांच्या मध्यें शेंकडों वर्षेंपर्यंत कलह चालला. शेवटीं **ब्राह्मणांचा** उत्कर्ष झाला, आणि **मारवाड** वगैरे कांहीं प्रांतांत व **सिंहल** द्वीपांत मात्र बौद्ध धर्म राहिला. **मगध** देशाची भाषा **मागधी**, म्हणजे पाली, हीमध्यें **बौद्ध** व **जैन** ह्यांच्या धर्माचे ग्रंथ लिहिलेले आहेत. तो धर्म **हिंदुस्थानांतून चीन, तिबेत,** इत्यादि देशांत गेला, तो अद्यापि तेथें चालत आहे.

८. **बंगाल** देशांत पाल ह्या उपनांवाचे राजे राज्य करीत होते. त्यानंतर सेन ह्या उपनांवाचे राजे झाले. त्यांच्या राज्याची समाप्ति मुसलमानांनीं इसवी सन १२०३ च्या सुमारें केली.

९. **पंवार** नांवाचे प्रसिद्ध जे **परमार** राजे ते प्राचीन काळापासून **माळव्यांत** राज्य करीत होते असा निश्चय झाला आहे. त्यांमध्यें **विक्रमादित्य** इसवी सनाच्या पूर्वीं ५६ वर्षांवर *शककर्ता झाला. पुढें त्याच्या वंशांत **भोजराजा** विद्येची वृद्धि करणारा आणि विद्वानांस आश्रय देणारा असा झाला. त्याच्या दरबारांतील

---

* विक्रमापासून गेलेला जो काळ त्यास शक म्हणण्याचें कारण असें कीं, त्याकाळीं शक म्हणून यवन होते त्यांचा विक्रमानें पराजय केल्यावरून त्यास शकारि असें नांव प्राप्त झालें. त्याच्या विजयापासूनच्या काळास लोक शकारि संवत्सर ह्याचा संक्षेप करून शक म्हणूं लागले. शालिवाहनानें विक्रमास जिंकिलें म्हणून त्याचें शकारि हें पद ह्यानें घेतलें. प्रस्तुत विक्रमाच्या वर्षांस संवत् आणि शालिवाहनाच्या वर्षांस शक म्हणण्याची रूढी आहे. युरोपियन, ज्यांस सिथियन अथवा स्कुथी म्हणतात आणि ज्यांनीं बाक्त्रिया एथील ग्रीकांचें राज्य बुडविलें ते आणि हे हिंदुचे शक लोक एकच असें दिसतें.

कालिदास, भवभूति, इत्यादि कवि ह्यांचे ग्रंथ हिंदूंमध्यें सर्वमान्य आहेत. त्याच्या वंशाजांचें राज्य इसवी सन १२३१ ह्या मध्यें मुसलमानांनीं बुडविलें.

१०. गुजराथेमध्यें वलभीपुरांत इ० स० १४४ पासून ५२४ पर्यंत सेन नांवाचे राजे राज्याधिकार चालवीत होते. त्यांच्या मागाहून चौरे म्हणून रजपूत राजे झाले; त्यांनीं इ०स० ७४६ मध्यें अनलवाड नगर, म्हणजे ज्यास सांप्रत पट्टण म्हणतात तें शहर, आपली राजधानी केली. त्यांतील शेवटचा राजा इ०स० ९३१ त मरण पावल्यावर त्याचा जांवई, दक्षिणेंतील कल्याण एथील चालुक्य वंशाचा एक राजा, तो त्याच्या गादीवर बसला. ह्या चालुक्य राजांनीं माळवा प्रांत घेतला, आणि महमूद गजनवी ह्यानें जरी त्यांस नम्र करून त्यांपासून खंडणी वसूल केली, तरी ते सोलंकी अथवा चालुक्य राजे इ०स० १२२८ पर्यंत सिंहासनावर होते. त्यांस पदच्युत करून दुसरा एक राजवंश अधिकारावर आला. त्याची वेळ भरली तेंव्हां तो इ० स० १२९७ मध्यें मुसलमानांनीं बुडविला.

११. जागोजाग लहानसहान संस्थानें होऊन गेलीं, त्यांचें सविस्तर वर्तमान लिहिलें असतां वाचणाऱ्यांस कंटाळा मात्र येईल, म्हणून लिहीत नाहीं. थोडक्यांचीं नांवें व तीं कधीं होतीं इतकें मात्र लिहितों. १ कनोज एथील संस्थान इ०स० ४७० त होतें असें समजलें आहे. त्याविषयींचा शेवटला लेख इ०स० ११९३ ह्यांतला आहे. २ काशी आणि मिथिला एथें-

हीं प्राचीन काळापासून संस्थानें होतीं; त्यांतून पहिल्याची समाप्ति इ०स० ११९२ त आणि दुसऱ्याची इ०स० १३२५ त झाली. ३ दिल्लीचें संस्थान इ० स० पूर्वीं ५६ वर्षांवर होतें असा लेख आहे. तेथें त्या सनाच्या नवव्या, दाहाव्या व अकराव्या शेंकड्यांत रजपूत राजे राज्य करीत होते. त्यांचे वीस पुरुष झाल्यावर इ०स० १०५० त दिल्लीचें राज्य अजमीरवाल्यांच्या घराण्याच्या हातीं गेलें. त्या वंशांतील पृथुराज म्हणजे पृथ्वीराय ह्याचे वेळेस मुसलमानांनीं त्याचा शेवट केला. ४ अजमीर एथें इ०स० ६९५ त माणिकराय नामें राजा राज्य करीत होता. त्याच्या पूर्वीं सात पिढ्यांपासून तें राज्य त्याच्या वंशाकडे होतें असा लेख आहे. ह्या राजाचा वंशज विशाळ ह्यानें वर लिहिलेल्या वर्षीं दिल्लीचें संस्थान घेतलें. त्याची आणि अजमीरच्या राज्याची समाप्ति बरोबरच झाली. ५ मेवाड म्हणजे उदेपूर, जसलमीर, आणि जयपूर, हीं तीन संस्थानें अद्यापि आहेत. ह्यांतून पहिल्या दोहोंविषयीं इ० स० आठव्या शेंकड्यांतील लेख आहेत. जयपुराविषयीं इ०स० ९६७तील लेख प्रमाण आहे. ६ सिंध हा देश शिकंदर बादशाहा ह्याचे वेळीं स्वतंत्र होता, तो मुसलमानांनीं इ० स० ७११ मध्यें घेतला. ७ काश्मीर देशाचें वर्तमान इसवी सनाच्या पूर्वीं १४०० वर्षांपासून इसवी सनाच्या आरंभानंतर १०१५ वर्षें पर्यंत सविस्तर राजतरंगिणी नामक ग्रंथांत लिहिलें आहे. त्या देशाचा आणि हिंदुस्था-

संबंध थोडाच आहे. तेथील राजे हिंदुस्थानावर

स्वाऱ्या करीत असेंही त्या पुस्तकांत कितीएक जागीं आढळतें, परंतु त्याविषयीं संशय दिसतो.

---

## प्रकरण २.

### दक्षिणेंतील प्राचीन राजे.

विंध्य पर्वताचे उत्तरेस मोठीं राज्यें होतीं त्याकाळीं त्याचे दक्षिणेकडील देशांत डोंगरी व अडाणी लोक राहत होते असें संभवतें. त्यांत पुढें राज्यें स्थापिलीं, त्यांतील कित्येकांविषयींचें जें वर्तमान समजलें आहे, तें लिहितों.

१. **पांड्य**, म्हणजे **मधुरा** आणि **तिणवल्ली**, ह्या प्रांतांत एक राज्य होतें. हें इसवी सनाच्या पूर्वीं सुमारें पांचशें वर्षांवर कोणी शूद्र जातीच्या पुरुषानें स्थापिलें होतें. एथील राजाकडून रोमनांचा बादशाह **अगस्तस** ह्याजकडे वकील गेला होता. ह्या राज्याची राजधानी इसवी सनाच्या आरंभीं **मधुरा** एथें होती. तेथील राजे आणि **चोल** राजे ह्यांचे नेहमी कलह होत असत. ते कधीं चोल राजांस करभार देत, कधीं स्वतंत्र असत. शेवटीं तेथील अधिकारी नायक ह्यास **अर्काटचा** नवाब ह्यानें सन १७३६ मध्यें जिंकून त्या राज्याची समाप्ति केली.

२. **चोल** देशाच्या राजांची राजधानी **कांची** नगर होतें. इसवी सनाच्या आरंभीं ह्या राजांची सत्ता साऱ्या **द्रविड** देशावर मात्र चालत होती. पुढें त्या

सनाच्या आठव्या शैंकड्यांत त्यांनीं करनाटक व तैलंगण ह्या देशांवर अमल बसविला, आणि नंदिदुर्गाच्या डोंगराच्या पूर्वेचा सर्व मुलूख गोदावरी नदी पर्यंत घेतला. पुढें बाराव्या शैंकड्यांत त्यास आपल्या जुन्या हद्दीच्या आंत हटावें लागलें. ह्याप्रमाणें ते चोल राजे कधीं विजयनगरच्या अधिकाऱ्यास कर देऊन, व कधीं स्वतंत्रपणानें असे होते. पुढें शिवाजी ह्याचा भाऊ जेव्हां त्या प्रांतांत गेला तेव्हां त्यानें त्यांतील शेवटल्या पुरुषास गादीवरून काढून तंजावर एथें नवें संस्थान केलें.

३. चेर ह्यांचें राज्य पश्चिम समुद्राच्या कांठीं होतें. त्यांत सांप्रतचे त्रावणकोर, मलबार, व कोईमत्तूर हे प्रांत होते. ह्या राज्याचा उल्लेख मिसर देशचा राजा टालमी ह्याच्या ग्रंथांत आला आहे. एकवेळ ह्या राज्याची सत्ता बहुतेक करनाटकावर चालूं लागली होती, परंतु इसवी सनाच्या दाहाव्या शैंकड्यांत तें समाप्त होऊन त्याचे प्रांत भोंवतालच्या संस्थान्यांनीं वांटून घेतले.

४. केलर म्हणजे कोंकण आणि चेर ह्यांच्या मधला जो देश ह्यामध्यें प्राचीन काळापासून ब्राह्मणच अधिकार चालवीत असत. त्यांनीं त्याचे चौसष्ट प्रांत केले होते, आणि तीन वर्षेंपर्यंत आपणांतून एका ब्राह्मणास मुख्य करून, आणि त्यास चार मंत्री करून देऊन, ते सर्व कारभार करवीत. नवव्या शैंकड्यांत दक्षिणेकडील प्रांताचा अधिकारी हिंदु होता तो मुसलमान झाला म्हणून त्याच्या प्रजा बिथरल्या, आणि त्याच्या देशाचीं निरनिराळीं संस्थानें झालीं; त्यांपैकीं जें मोठें संस्थान

झालें त्याच्या अधिकाऱ्यास झामोरिनाचा राजा असें नांव पडलें. इसवी सनाच्या पंधराव्या शेंकड्याचे अखेरीस पोर्तुगीस लोकांचा सरदार वास्कोडीगामा जेव्हां कालिकोट एथें येऊन उतरला, तेव्हा तें शहर ह्या राजाजवळ होतें. उत्तरेकडील प्रांतांत इसवी सनाच्या आरंभापासून एक पृथक् संस्थान होतें; तें करनाटकचे बल्लाळ राजे ह्यांनीं मोडिलें. शेवटीं तो प्रांत विजयनगर एथील अधिकाऱ्यांच्या स्वाधीन झाला.

५. करनाटक भाषेची चाल उत्तरेकडेस कोलापुरापासून दक्षिणेस बेदरपर्यंत आहे. बेदराहून अद्वानी, अनंतपूर, आणि नंदिदुर्ग ह्यांवरून सूत्र टाकून तें पश्चिमेकडे मंगळूर व कालिकोट ह्यांच्यामध्यें घांटावर आणावें तें पूर्वेकडेस आणि दक्षिणेकडेस मर्यादा होईल. पश्चिमेकडेस गोंवें व समुद्र ह्यांपर्यंत त्या भाषेची चाल आहे. ह्या सर्व देशांत प्राचीन काळीं एक राज्य होतें असा संभव आहे. परंतु ह्याविषयीं जे फार प्राचीन लेख आहेत, त्यांमध्यें हा देश पांड्य, चेर आणि केरल एथील राजांचे सत्तेंत होता असें आहे. पुढें ह्यांत बहुत लहान लहान मांडलिक राजे धनीपणा करूं लागले. शेवटीं इसवी सनाच्या अकराव्या शेंकड्यांत बल्लाळ राजांच्या वंशाकडे ह्या साऱ्या देशाचें आधिपत्य आलें. एकेवेळीं त्यांची आज्ञा मलबार व द्रविड ह्या देशांवरही चालत होती. शेवटीं इ० स० १३१० च्या सुमारें मुसलमानांनीं त्यांची सत्ता हिरावून घेतली.

६. तैलंगणाचा पूर्वेकडील भाग यादव उपनां-

वाच्या राजांकडे होता; आणि **करनाटक** व **महाराष्ट्र** ह्यांचे हद्दीवर **कल्याण** एथें **चालुक्य** राजे राज्य करीत होते. ह्या **चालुक्यांचा** अमल नर्मदेपर्यंत साऱ्या **महाराष्ट्र** देशावर होता. **कल्याण** एथील शेवटला **चालुक्य** राजा ह्यास त्याच्या मंत्र्यानें मारिलें. त्या मंत्र्याची वेळ भरली तेव्हां कोणी लिंगायतांनीं त्याचा जीव घेतला. शेवटीं हें राज्य **देवगिरीच्या यादवांच्या** हातीं गेलें.

७. वरल्या **चालुक्य** वंशांतील कोणी पुरुषानें **तैलंगणाच्या** पूर्वेस **कालिंग** देशांत राज्याची स्थापना केली. तें राज्य सुमारें चारशें वर्षेंपर्यंत होतें. त्यांतून **आंध्र** देशचे **गणपति** राजे ह्यांनीं बरेंच घेतलें. शेवटीं तेराव्या शेंकड्यांत तें **कटकच्या** राजांनीं समाप्तीस नेलें.

८. **आंध्र** देशच्या राजांची राजधानी **वरंगूळ** शहर होतें. त्यांच्या वृत्तांतामध्यें प्रथम **विक्रम** आणि **शालिवाहन** ह्यांचीं नांवें येऊन पुढें इसवी स० ५१५ च्या सुमारें कोणी यवनांनीं राज्य घेतलें, आणि त्यांच्या नऊ पुरुषांनीं ४९८ वर्षेंपर्यंत तें भोगिलें, असा लेख आढळला आहे. नंतर, म्हणजे सन ९५३ च्या सुमारें, **गणपति** राजांचा वंश सिंहासनावर आला. त्यांत अकराव्या शेंकड्याचे अखेरीस **काकति** म्हणून प्रतापी राजा झाला; त्याच्या नांवावरून साऱ्या वंशास **काकतीय** वंश असें म्हणतात. ह्या वंशाच्या राज्याच्या उत्कर्षाची परम सीमा तेराव्या शेंकड्याचे अखेरीस झाली त्यावेळीं **गोदावरीपासूनचा** बहुतेक प्रांत त्याचे सत्तेखालीं होता. **सन १३३२** मध्यें त्याची राजधानी मुसलमानांनीं घेतली,

आणि त्यास हीनबळ केलें. शेवटीं त्याचें तें राज्य गोंवळकोंडच्याचे बादशाहींत दाखल झालें.

९. ओंढ्या देशांतील राजावळीमध्यें **विक्रम शा-लिवाहन** ह्यांपासूनच आरंभ आहे. पुढें यवनांनीं समुद्रांतून वारंवार येऊन त्या देशांत राज्य केलें असें लिहिलें आहे. त्यांतील शेवटच्या यवनांनीं १४६ वर्षें राज्य केल्यावर त्यांस **ययातिकेसरी** राजानें इसवी सन ४७३ च्या सुमारें काढून दिलें. इ० स० ११३१ पर्यंत त्या वंशाचे पस्तीस पुरुष सिंहासनावर बसले. नंतर **गांग** वंशाचे राजे झाले; त्यांच्या मागून **सूर्यवंशाचे** रजपूत गादीवर आले. पंधराव्या शेंकड्यांत त्यांच्या फौजा दक्षिणेस **कांचीपर्यंत** गेल्या होत्या, आणि त्यावेळच्या हिंदुराजांनीं मुसलमानांवर जो कट केला होता, त्यांत मदत करावयास तेथील राजा **बेदराजवळ** आला होता. असे आणीकही कितीएक मोठे पराक्रम त्यांनीं केल्या-नंतर त्या राजांवर **बंगाल्याकडून** आणि **पश्चिमेकडून** मुसलमानांचे हल्ले येऊं लागले; आणि राज्यांत अव्यवस्था होऊन कोणी एक **तैलंग** सरदार सत्ता करूं लागला. शेवटीं तें राज्य सन १५७८ मध्यें **अकबरानें** आपल्या राज्यांत दाखल केलें.

१०. **महाराष्ट्र** देशाविषयींचें वर्तमान फार थोडें ठाऊक आहे. त्यांत प्राचीनकाळीं **तगर** म्हणून शहर **गोदा-वरीच्या** तीरीं **पैठणाच्या** पूर्वेस होतें असें **ग्रीक** ग्रंथांत आहे. त्या **तगरपुरांत** **शिलार** नामें रजपूत राजे झा-ले; त्यांचे आणि **मुंबई** जवळचें **कल्याण** व **कोल्हापुरा-**

जवळचा **पन्हाळा** एथील राजांचे संबंध अकराव्या व बाराव्या शेंकड्यामध्यें झालेले होते. **शालिवाहनाचें** नांव प्रसिद्धच आहे. तो **पैठण** एथील कुंभाराचा मुलगा. त्यानें प्राचीन राजांचा पराजय करून आपली सत्ता व शक हीं नर्मदेचे दक्षिणेस चालू केलीं अशी कथा आहे. त्यानें **उज्जयिनीचा** राजा **विक्रम** ह्याचा पराजय केला, असेंही म्हणतात; पण त्या दोघांमध्यें १३५ वर्षांचें अंतर आहे. इसवी सनाच्या बाराव्या शेंकड्यांत **यादव** कुळां-तील कोणी पुरुषानें **देवगिरी** एथें राज्य स्थापिलें. तें इ० स० १३०७ मध्यें मुसलमानांनीं समाप्तीस नेलें.

११. वर **हिमालयापासून** दक्षिण समुद्रापर्यंत जीं प्राचीन हिंदुराज्यें लिहिलीं, त्यांचे राजे पांडवकौरवां-च्या युद्धांत होते, असें भारतांत आहे, परंतु तेव्हांपासून अलि-कडच्या काळापर्यंत राज्यांच्या घडामोडी कशा झाल्या हें कांहीं समजत नाहीं. वर लिहिलेलीं मधलीं मधलीं राजांचीं नांवें, व त्यांविषयींचीं त्रुटित वर्तमानें हीं मात्र ताम्रपट्ट, शिलालेख, वंशावळी, व परदेशी लोकांचे ग्रंथ ह्यांवरून समजण्यांत आलीं आहेत. परंतु यथार्थ इतिहास लिहि-ण्याचा सांप्रदाय ह्या देशांत नाहीं आणि ताम्रपट्ट वगैरे लेखांत अतिशयोक्ति आणि दुसरे काव्यालंकार फार अस-तात, म्हणून त्यांत लिहिल्यापैकीं सत्य कोणतें आणि मिथ्या कोणतें ह्याचा निर्णय होण्यास फार आयास लाग-तो; आणि तो कित्येक जागीं होतच नाहीं.

## प्रकरण ३.

### हिंदुस्थानांत मुसलमान प्रथम स्वाऱ्या करूं लागले त्यांचें वर्तमान.

१. मुसलमानी धर्म प्रवृत्त करणारा **महंमद** हा इ० स० ५६९ मध्यें जन्मला, आणि त्याच्या वयास ४० वर्षें झाल्यावर त्यानें **अरबस्तानांत** आपला धर्म प्रगट केला. तो इ० स० ६३२ मध्यें मरण पावला. त्याच्या मागें त्याच्या गादीवर जे बसले त्यांस खलीफा म्हणतात. त्यांमध्यें पांचवा खलीफा **मोआविआ** हा अधिकारावर असतां मुसलमानांनीं **सिंधुनदा** पर्यंत देश घेऊन काबुलांतील १२००० लोकांकरवीं इ० स० ६६४ मध्यें आपला धर्म घेवविला. पुढें **मोहालिब** नामें कोणी शूर सरदार **काबूलाकडून मुलतान** देश घेण्याकरितां आला, तो तेथें विजय पावला; आणि तो देश स्वाधीन करून घेऊन आणि बहुत लोकांस पाडाव करून आपल्या मुलकास नेता झाला.

२. पुढें खलीफा **वालिद** ह्याच्या कारकिर्दींत **महंमद कासिम** ह्या नांवाच्या एका सरदारानें **इराणांतून सिंधेस** येऊन तेथील दाहिर नामक राजावर स्वारी केली. त्यावेळीं तो राजा ५०,००० सैन्य सिद्ध करून लढला. त्यांत त्याचा केवळ पराजय होऊन तो मरण पावला, आणि त्याचे किल्लेकरी बहुत करून मेले. बाकीचे शत्रूंच्या हातीं सांपडले, त्यांचे त्यांनीं प्राण घेतले. ह्या प्रकारें सर्व **मुलतान** आणि **सिंध** हे दोनही देश मुसलमानांच्या हस्तगत झाल्यावर, ते

इ० स० ७११.

लोक तेथील रयतांकडून कांहींवेळ पर्यंत खंडणी घेत होते; परंतु पुढें लवकरच ते प्रांत फिरून हिंदूंच्या ताब्यांत येऊन मुसलमान तेथून परत आपल्या देशीं गेले.

३. ताहीर नामें कोणी मुसलमान, खलीफा ह्यांच्या हुकुमांत वागण्याचें सोडून **खुरासान** आणि त्याचे उत्तरेकडील **समर्कंद** इत्यादि देश ह्यांत स्वतंत्रपणाने सत्ता करूं लागला. त्याच्या वंशजांनीं पन्नास पाऊणशें वर्षेंपर्यंत राज्य केल्याउपरांत **सुफर** आणि **सामानी** ह्या वंशांचे राजे तेथें राज्य करिते झाले. त्यांतून **सामानी** राजांच्या वेळेस त्यांच्या **अलप्तगीन** नामक कोणी सरदारानें **गिजनी** एथें एक राज्याची गादी स्थापली. पुढें त्याचा जांवई **सबक्तगीन** तेथें राज्य करीत असतां **लाहोरच्या जयपाळ** नामक राजानें लष्कर जमवून त्यावर स्वारी केली, परंतु वारा वाऽइटळी इत्यादि उत्पात होऊं लागल्यामुळें ईश्वर आपणास अनुकूळ नाहीं असें समजून त्यानें **सबक्तगीन** ह्यास ५० हत्ती देऊन व आणखीं द्रव्य देण्याची कबुलात करून तो परत **हिंदुस्थानांत** आला. त्या करारापमाणें त्यानें द्रव्य दिलें नाहीं, हा अपमान न विसरतां **सबक्तगीन लाहोरावर** स्वारी करण्यास निघाला. त्यावेळेस **दिल्ली**, **अजमीर**, **कलंजर**, आणि **कनोज**, एथील राजांस मदतीस बोलावून आणि एक लक्ष स्वार बरोबर घेऊन तो जयपाळ पुढें गेला; परंतु त्याचा अगदीं पराजय करून त्याची छावणी लुटून **सबक्तगिनानें** भोंवतालच्या प्रांतांतून खंडणी घेतली,

इ० स० ८२०.

इ० स० ९६२.

आणि सिंधुनदापर्यंत देश जिंकून १००० स्वारांसहवर्तमान एक सरदार पेशावर एथें सुभेदार करून ठेविला.

---

## प्रकरण ४.

### सुलतान महमूद ह्याच्या स्वाऱ्यांविषयींचा वृत्तांत.

**सबक्तगीन** ह्याच्या मागें त्याचा वडील मुलगा **महमूद** हा आपला लाहान भाऊ **इस्मायल** ह्यास जिंकून व कैद करून आपण सन ९९७ मध्यें सिंहासनारूढ झाला, आणि पुढें दोन वर्षांच्या आंत बुखारा एथील सामानी वंशाच्या राजांस जो कर वगैरे द्यावा लागत होता, तो बंद करून आपण स्वतंत्र झाला. त्यास खलीफा ह्यानें वस्त्रें व किताबती पाठवून दिल्या. नंतर लवकरच तो आपणास सुलतान असें म्हणवूं लागला. ह्याप्रमाणें आपल्या राज्याचा बंदोबस्त करून त्यानें दहा हजार निवडक स्वारांसहित हिंदुस्थानावर स्वारी केली.

२. ह्या स्वारीमध्यें **महमूद** हा आपल्या बापाचा शत्रु **जयपाळ** ह्याचा पराभव करून अतिशयित लूट घेऊन व राजास धरून नेऊन लवकरच परत **गिजनीस** आला. पुढें **जयपाळ** ह्यानें कांहीं द्रव्य देऊन प्रतिवर्षीं खंडणी देण्याचें कबूल केल्यावर **महमूद** ह्यानें त्यास मुक्त केलें, परंतु त्यास त्या अप्रतिष्ठेचें सहन न होऊन त्यानें परत आल्यावर आपला मुलगा **अनंगपाळ** ह्यास राज्य दिलें, आणि

इ०स० १००१.

चिता तयार करून तिला आपल्या हातानें अग्नि देऊन आपला प्राण दिला.

३. मुलतानाचे दक्षिणेकडील भाटिया येथील राजा खंडणीपैकीं आपली वांटणी न देई, ह्यास्तव **महमूद** ह्यानें दुसऱ्यानें हिंदुस्थानांत स्वारी केली; त्यावेळेस त्या राजाचा पराजय झाल्यामुळें त्यानें रानांत पळून जाऊन जीव दिला. मुलतानांतील मुसलमान सुभेदार ह्यानें बंड केल्यामुळें **महमूद** ह्यास तिसऱ्यानें स्वारी करून त्याचा बंदोबस्त करणें प्राप्त झालें.

इ० स० १००४.

४. ही स्वारी करून परत गेल्यानंतर **महमूद** ह्यानें मोठा पराक्रम करून **तातार** देशच्या राजास जिंकून त्याचें राज्य हस्तगत करून घेतलें. पुढें **अनंगपाळानें** कांहीं विरोध केल्यामुळें त्याच्या पारिपत्याकरितां चौथ्यानें हिंदुस्थानावर स्वारी करून, **उज्जयिनी, ग्वालेर, कलंजर, कनोज, दिल्ली,** व **अजमीर** एथील राजांचीं एकत्र मिळालेलीं सैन्यें जिंकून **नगरकोट** म्हणून **ज्वालामुखीचें** तटबंदीचें देवालय त्याकाळीं प्रसिद्ध होतें, तेथें जाऊन तें लुटलें. तेथून सोन्याचे *दीनार सात लक्ष, व दोनशें मण सोनें व दोन हजार मण रुपें, व मोत्यें, पोंवळीं, हिरे, माणिकें वगैरे मिळून जवाहीर वीस मण, इत्यादि अपरिमित द्रव्य घेऊन स्वदेशास जाता झाला.

इ० स० १००७.

५. इ० स० १०१० मध्यें त्यानें पांचव्यानें हिंदु-

---

* दीनार म्हणून चार मासे वजनाचें सोन्याचें एक नाणें आहे.

स्थानावर स्वारी करून मुलतान घेतलें. पुढील वर्षी साहाव्या स्वारींत स्थानेश्वर म्हणून यमुनेपासून जवळच देवस्थान होतें, तें लुटलें. पुढें दोन स्वाऱ्या काश्मीरावर करून तो प्रांत हस्तगत झाल्यावर, महमूद ह्यानें परत स्वदेशास जाऊन समर्कंद, बुखारा वगैरे पश्चिमेकडील देश आपल्या राज्यांत मिळविले. नंतर तो एक लक्ष स्वार व वीस हजार पायदळ ह्यांसहित हिमालयाच्या पहाडांतून कनोज शहरास आला. तेथील राजा सहकुटुंब बाहेर येऊन त्यास शरण गेला, म्हणून महमूद त्यास कांहीं उपद्रव नकरितां तेथून मथुरेस गेला. तेथें वीस दिवसपर्यंत त्याच्या फौजेनें शहर लुटलें, मूर्ति फोडल्या, आणि देवळें बाटविलीं. शेवटीं त्याच्या धुमाळीमुळें शहरास आग लागली, तेणेंकरून फार नासाडी झाली. ह्याशिवाय आणखीं बहुत शहरें लुटून ओसाड करून व पांच हजार तीनशें पाडाव केलेले हिंदु घेऊन तो महमूद स्वदेशास गेला.

इ० स० १०१७.

६. नंतर पांच वर्षांनीं, त्यानें आणखी दोन वेळ स्वाऱ्या करून पंजाब प्रांतांत आपला कायम अमल बसविला. पुढें सन १०२४ मध्यें मूर्तिपूजकांचें पारिपत्य करून आपला धर्म वृद्धिंगत केल्याची कीर्ति मागें ठेवावी ह्या हेतूनें महमुदानें गुजराथेंतील सोरटीसोमनाथावर शेवटची म्हणजे बारावी स्वारी केली. त्यावेळेस त्याच्या बरोबर लष्कर बहुत होतें; केवळ ओझें वाहणारीं उंटें वीस हजार होतीं; आणि लूट करावी व पाखांडी जनांचें पारिपत्य केल्याची

इ० स० १०२२.

कीर्ति मिळवावी म्हणून मुसलमान लोक सहस्रशः त्याचे बरोबर आले होते.

७. सोमनाथास हिंदुलोक इतकें मानीत होते कीं, त्या देवास राजांनीं वगैरे दिलेले गांव दोन हजार होते. त्या देवळाकडे दोन हजार पुजारी, पांचशें कळावंतिणी, व तीनशें गवई असत. देवापुढें घांट होती तिला सोन्याची सांखळी दोनशें मण वजनाची होती; व देवास रोज भागीरथीच्या उदकाचें स्नान घालीत असत, असे लेख आहेत. मुसलमान ग्रंथकरणाऱ्यांनीं आपल्या राजाची प्रतिष्ठा होण्याकरितां ह्या अतिशयोक्ति लिहिल्या असतील; परंतु इतकें खरें कीं, तें देवस्थान मोठें होतें म्हणून त्याच्या संरक्षणार्थ रजपूत वगैरे फार जमले होते; त्यांनीं महमूद ह्याची स्वारी ज्या दिवशीं येऊन पोहोंचली, त्या दिवशीं त्याच्या लोकांस मागें हटविलें. दुसऱ्या दिवशींही देवळाच्या तटावर मुसलमान चढूं लागले असतां हिंदुलोकांनीं त्यांस खालीं लोटून देऊन त्यांचें कांहीं चालूं दिलें नाहीं. पुढें तिसऱ्या दिवशीं अनलवाड एथील राजा कुमक घेऊन तेथें आला; त्यामुळें पुढें कसें होईल असा मुसलमानांस संशय उत्पन्न झाला. त्यावेळीं महमूद ह्यानें ईश्वराची प्रार्थना करून घोड्यावर बसून आपल्या लोकांस धीर दिला; तेव्हां त्यांनीं एकच आरोळी करून पुढें इतक्या निकरानें हल्ला केला कीं, हिंदुलोकांची फळी फुटून त्यांचा देवळांत प्रवेश झाला. त्यावेळीं पांच हजार हिंदु लोक रणांत पडले व चार हजार लोक मचव्यांत बसून समुद्राच्या मार्गानें पळून गेले.

८. महमूद ह्यानें देवळांत जाऊन मूर्ति फोडाव यास आरंभ केला. त्यावेळीं ब्राह्मण येऊन बहुत नम्रपणानें म्हणूं लागले कीं, ही मूर्ति न फोडिल्यास आम्ही बहुत द्रव्य देऊं. हें बोलणें महमुदाच्या लोकांतून कितीएकांस आवडलें; परंतु त्यानें क्षणमात्र विचार करून म्हटलें कीं मूर्त्ति विकल्याचे कीर्तीपेक्षां मूर्ति फोडल्याची कीर्ति मला आवडती, असें म्हणून त्यानें त्या मूर्त्तीवर सोटा मारतांच बाकीच्यांनींही तिजवर प्रहार करून तिचीं शकलें केलीं. तींतून हिरे वगैरे जवाहीर आठ कोटी रुपयांचें निघालें. त्या मूर्त्तीच्या शकलांतून एक शकल मक्केस व दुसरें मदीनेस, व आणखी दोन गजनीस पाठवून दिलीं. तेथें तीं राजवाड्याच्या व मशिदीच्या पायरीस लाविलेलीं शेंकडों वर्षेंपर्यंत होतीं. सोमनाथाच्या देवळाचे चंदनी दरवाजे मशिदीस लाविले होते, ते इ० स० १८४२ ह्या वर्षीं इंग्रजांच्या लष्करानें गजनीहून परत आणिले.

९. त्यानंतर गुजराथेंतील अनलवाडच्या तक्तावर नवा राजा बसवून, तेथें एक वर्ष राहून, महमूद रेतीच्या मैदानाच्या मार्गानें मुलतानांतून परत स्वदेशास गेला. तेथें आपल्या राज्याचा बंदोबस्त करून आणि इराण देश जिंकून इ०स० १०३० सांत एप्रिल महिन्याचे २९ वे तारिखेस तो गजनी एथें मृत्यु पावला.

१०. महमूद ह्यानें जें मोठें राज्य मिळविलें त्यामध्यें त्यानें असा बंदोबस्त ठेविला होता कीं, तो राज्याच्या एका प्रदेशांतून दुसऱ्या प्रदेशास जरी गेला तरी बहुधा मागें बंडावा होत नसे. ह्यावरून त्याच्यामध्यें चातुर्य, पराक्रम, उ-

द्योग आणि साहस, हे गुण उत्कृष्ट असें स्पष्ट होतें; परंतु आपल्या राज्याचा पाया त्यानें मजबूत न घातल्यामुळें तें त्याच्या मागें लवकरच लयास गेलें. ह्यावरून पाहातां, त्याच्यामध्यें सूक्ष्म दृष्टि विशेष होती असें वाटत नाहीं. त्यास विद्वान् जवळ बाळगण्याचें, आणि विद्या वाढविण्याचें मोठें व्यसन होतें; त्यानें गजनीमध्यें विद्याभ्यासाची शाळा घालून तिच्या खर्चाकरितां प्रतिवर्षीं एक लक्ष रुपयांची नेमणूक करून दिली होती, आणि द्रव्य देऊन बहुत विद्वान् आणि कवि दरबारांत बाळगले होते. त्यामध्यें, उन्सारी आणि फरदुसी म्हणून दोघे प्रसिद्ध होते, त्यांतील दुसऱ्यानें इतिहासरूप काव्य शाहानामा म्हणून फारसी भाषेमध्यें केलें, तें अद्यापि सर्वमान्य आहे.

११. आपल्या प्रजांस कोणी उपद्रव देऊं नये ह्याविषयीं महमूद फार जपत असे. जरी त्याच्या युद्धामध्यें हजारों लोकांचा संहार झाला, आणि त्यानें इराणांत बहुत मुसलमान लोकांचे प्राण घेतले, तरी कारण नसतां उगीच हिंदु लोकांस त्यानें धरून मारिलें असा लेख कोठें दिसत नाहीं. तसाच तो धर्माच्या मिषानें स्वाऱ्या मात्र करी, परंतु हिंदुलोकांस जबरीनें त्यानें मुसलमान केलें असें नाहीं, त्यांकडून जितकें द्रव्य निघेल तितकें काढून त्यांस धरून आपल्या देशास न्यावें, असें त्याचें लक्ष होतें. हे धरून नेलेले लोक, त्याच्या वेळेस गजनींत इतके झाले होते कीं, दर हिंदु मनुष्यास, दोन अडीच रुपये देऊनही कोणी खरेदी घेत नव्हते.

१२. महमुदामध्यें अतिशयित लोभ हा मोठा दोष

होता; त्यामुळें द्रव्यसंपादनाकरितां त्यानें स्वाऱ्या करून अतिशयित लूट मिळविली, तो प्रकार वर लिहिला. त्याचें वैभव आणि त्याच्या दरबाराची शोभा ह्यांस त्या काळीं किंवा कोणत्या काळीं उपमा मिळावयाची नाहीं. त्यानें **मथुरा** व **कनोज** एथील देवालयें पाहून **गजनी** एथें संगमरवरी पाषाणांची मोठी भव्य शोभायमान अशी मशीद बांधिली; ती पाहून त्याच्या दरबारी लोकांनींही मोठमोठाल्या हवेल्या उठविल्या; त्यांहींकरून त्याची राजधानी फार सुशोभित दिसूं लागली. त्याचें द्रव्य इतकें होतें कीं, कोणी एका पूर्वींच्या राजाजवळ सात मापें भरावयापुरतीं रत्नें होतीं अशी कोणी त्याला गोष्ट सांगितली, त्यावेळीं तो बोलला कीं, ईश्वरानें मजवर कृपा करून शंभर मापें जवाहिर मला दिलें आहे.

१३. महमुदाजवळ इतकें द्रव्य असून तो मोठा कृपण होता. **फरदुसी** ह्यानें त्याचे आज्ञेवरून **शाहानामा** म्हणून ग्रंथ केल्यावर त्यास तो अगदीं थोडें द्रव्य देऊं लागला; तेव्हां त्या कवीनें त्रासून **तूस** एथें आपल्या घरीं जाऊन महमुदावर निंदापर एक काव्य केलें, त्यांत त्याचे वास्तविक दोष लिहिले आहेत. दुसरी **महमुदाच्या** लोभाची गोष्ट अशी लिहिली आहे कीं, त्यानें मरावयाच्या पूर्वीं आपलें सर्व द्रव्य पाहाण्याकरितां आणवून पुढें रचवून ठेविलें. त्याकडे एकाग्रचित्तानें पाहात असतां हें सर्व द्रव्य सोडून लौकर आपणास जावें लागेल असा मनांत विचार येऊन त्याच्या डोळ्यांतून अश्रु आले;

परंतु त्यांतून आपल्या जवळच्यांस कांहीं न देतां त्यानें प्राण सोडिला.

१४. महमूद स्वभावानें उल्हासी होता; त्याचें शरीर साधारण उंच होतें, व त्याचा बांधा मजबूत होता. परंतु त्याच्या आंगावर देवीचे वण होते, त्यांचें लहानपणीं त्यास लांछन वाटून आपल्या कुरूपपणास पराक्रमाचें भूषण करण्याकरितां तो प्रथम साहसास प्रवृत्त झाला असेल असा संभव आहे.

---

## प्रकरण ५.

### महमुदाचे वंशज गजनवी राजे ह्यांचें वर्तमान.

इ० स० १०३० पासून ११८६ पर्यंत.

१. महमुदाच्यामागें गजनवी वंशांत विशेष वर्णावयाजोगे पराक्रमी राजे झाले नाहींत. महमूद ह्यास दोन मुलगे होते; एकाचें नांव मसाऊद, आणि दुसऱ्याचें नांव महंमद; त्यांतील धाकटा महंमद, हा बापानें ठरविल्याप्रमाणें त्याच्या मागें गादीवर बसला. पुढें लौकरच मसाऊद ह्यानें आपल्या सुभ्याहून परत येऊन सैन्य वश करून घेतलें; त्याचे कुमकेनें त्यानें आपल्या भावास गादीवरून उठवून त्याचे डोळे काढून कैद करून ठेविलें आणि आपण सिंहासनारूढ झाला.

इ० स० १०३०.

२. मसाऊद राज्य करूं लागल्यापासून सल्जुकी

ह्या नांवाचे तातार लोक त्यास उपद्रव देऊं लागले. त्याचें भय प्रथम चार वर्षेंपर्यंत **मसाउदास** विशेष वाटत नव्हतें, तो **मकरान, मांझिंदरान**, वगैरे इराण देशाच्या प्रांतांमध्यें आपला अमल बसवीत होता. इ० स० १०४०. पुढें **सल्जुकी** लोकांचें प्राबल्य विशेष होऊन ते आपल्या राज्यांत लूट करूं लागले, असें पाहून त्यानें स्वतां त्यांजवर स्वारी केली, आणि त्याचें व **सल्जुकी** लोकांचा सरदार **तोग्रलबेग** ह्याचें युद्ध **मर्व** शहराजवळ झालें, तेव्हेळीं **मसाउदाचे** फौजेपैकीं तुर्की लोक त्यास सोडून गेल्यामुळें त्याचा पराजय झाला, आणि **गज्नी**-मध्यें बखेडा चालला होता तो मोडावयास पुरे इतकी फौज जमा होईना म्हणून तो तिकडे जाण्याचें टाकून **हिंदुस्थाना**कडे चालला. त्याचे फौजेनें फितूर होऊन त्याचा खजिना लुटला, आणि त्यास गादीवरून काढून त्याचा आंधळा भाऊ **महंमद** ह्यास राज्याधिकार दिला. त्यानेंही आपल्या हातून कारभार निभावेना म्हणून सर्व राज्य आपला मुलगा **अहंमद** ह्यांच्या स्वाधीन केलें. त्यानें आपला पदच्युत केलेला चुलता **मसाऊद** ह्याचा जीव घेतला, हा पहिला पराक्रम केला.

३. **मसाउदानें** दहा वर्षें राज्य केलें, तितक्यांत मोठ-मोठाल्या इमारती बांधून आणि विद्वान लोकांस आश्रय देऊन आपण **महमुदाच्या** मागें त्याच्या गादीवर बसाव-यास योग्य असें त्यानें करून दाखविलें.

४. **मसाऊद** मारला गेला तेव्हेळीं त्याचा मुलगा

मोदूद हा बल्क एथें होता. तेथून त्यानें
इ० स०
१०४९. परत त्वरेनें येऊन आपले प्रतिस्पर्धी ह्यांस
मारून राज्य स्वाधीन करून घेतलें. पुढें
त्याच्या भावानें बंड केलें तें मोडून सल्जुकी लोक
पश्चिमेकडील प्रांत घेत चालले होते, त्यांच्या कोणेका
सरदाराच्या कुळांत सोयरीक करून, त्यानें कांहीं वेळ-
पर्यंत त्यांचा स्नेह संपादिला. परंतु पुढें लौकरच ते
त्याजबरोबर कलह करूं लागले. त्यांत गुंतल्यामुळें
त्यास हिंदुस्थानाकडे लक्ष ठेवणें न झालें; ह्यास्तव
दिल्लीच्या हिंदुराजानें पंजाब प्रांतांतील कांहीं प्रदेश
घेतला, त्याच्या बंदोबस्ताकरितां मोदुदानें तिकडे जावें
इतक्यांत तो मरण पावला.

५. नंतर त्याचा भाऊ अबुल्हसन ह्यानें त्याच्या
मुलास मारून सिंहासन बळकाविलें; परंतु
इ०स०
१०५१. ह्या गोष्टीस दोन वर्षें झालीं नाहींत इत-
क्यांत त्याचा चुलता, अबदुलरसीद, हा
त्यास पदच्युत करून गादीवर बसला.

६. नव्या बादशाहानें पूर्वींच्या राज्यांत गेलेला
इ० स० पंजाब प्रांत स्वाधीन करून घेतला. नंतर
१०५२. तोग्रल्बेग म्हणून त्याचा कोणी सरदार ह्यानें
येऊन गजनीमध्यें त्याचा पराजय केला. तो तोग्रल्-
बेग ह्यास व सीस्तानांतून आपल्या हातीं सांपडलेले
गजनवी वंशाचे इतर सर्व शाहाजादे ह्यांस मारून आपण
राज्य करूं लागला; परंतु चाळीस दिवसांनंतर तो
मारला गेला, व गजनवी वंशांतील कोणी सुलतान

**फरुखजाद** हा तक्ताचा अधिपति झाला. त्यानें सल्जुकी लोकांनीं घेतलेलें राज्य परत हस्तगत करण्याकरितां यत्न केला; तो बराच सिद्धीस गेला होता, इतक्यांत तो बादशाहा मरण पावला. इ० स० १०५८

७. नंतर **फरुखजाद** ह्याचा भाऊ **इब्राहिम** राज्य करूं लागला, तो मोठा विरक्त व देवभोळा असे. त्यानें एकतीस वर्षेंपर्यंत राज्य केलें, तितक्यांत विशेष लढाया केल्या नाहींत, सल्जुकी लोकांनीं मागितलेला मुलूक त्यांस देऊन त्याशीं तह केला, आणि आपलें आयुष्य **कुराणाच्या** प्रती करण्यांत व धर्माचरणांत घालविलें. तो मेला तेव्हेळीं त्यास चाळीस मुलगे व छत्तीस मुली होत्या. इ० स० १०८९

८. **इब्राहिम** बादशाहाचा मुलगा **मसाऊद** ह्याचे वेळेस मुसलमानांनीं पराक्रम करून **गंगानदीच्या** अलिकडील तीरापर्यंत मुलूक घेतला. त्यानें राज्याच्या बंदोबस्ताकरितां कांहीं चांगले कायदे केले होते. त्याचे वेळेस दरबार कांहीं वर्षेंपर्यंत **लाहोर** एथें होतें. इ० स० १११४.

९. **मसाऊद मेल्यानंतर** त्याचा मुलगा **अरसलान** हा आपल्या भावास कैद करून राज्य करूं लागला. तेव्हेळीं त्याचे आईस संताप येऊन तिनें आपला भाऊ **सुल्तान संजर** सल्जुकी ह्याजकरवीं आपला दुसरा मुलगा **बहिराम** ह्यास गादीवर बसविलें. इ० स० १११८.

१०. तो **बहिराम बादशाहा** बराच प्रतापी होता, आणि त्यास विद्येचें व्यसन फार होतें. त्याच्या दरबारांत **निजामी** म्हणून मोठा कवि होता, त्यानें **बहिरामाच्या** आश्रयानें कितीएक ग्रंथ केले. ह्या बादशाहाचें राज्य बहुत वर्षेपर्यंत निर्वेध चाललें; पुढें त्याचा जांवई **कुतुबुद्दीन** गोरी ह्याशीं त्याची कांहीं कलागत झाल्यामुळें त्यानें त्यास बोलावून मारविलें. त्या रागानें **कुतुबुद्दीनाचा** भाऊ **सैफुद्दीन** हा **गजनीवर** स्वारी करून, **बहिराम** ह्यास पळवून, थोडे दिवसपर्यंत **गजनी** एथें आपण गादीवर बसला; परंतु लौकर दरबारच्या लोकांनीं फितूर होऊन **बहिराम** ह्यास सूचना पाठविल्यावरून तो परत आला, आणि तो व **सैफुद्दीन** ह्या उभयतांची लढाई झाली, तीमध्यें **सैफुद्दीनाची** फौज सर्व पळाल्यामुळें त्याचा पराजय होऊन तो कैदेंत पडला. नंतर **बहिरामानें धिंड** काढल्याप्रमाणें त्याची अप्रतिष्ठा व हाल हाल करून त्यास मारिलें, व त्याच्या वजिराचाही प्राण घेतला.

११. हें वर्तमान मेलेल्या बादशाहाचा भाऊ **अल्लाउद्दीन** ह्यास कळतांच त्यानें अतिशयित **क्रुद्ध** होऊन **गजनीवर** स्वारी केली; आणि तहाचें बोलणें आलें तें न ऐकतां, आणि **सुलतान बहिराम** ह्याची फौज आपल्यापेक्षां फार आहे हें मनांत न आणितां, मोठ्या दृढ निश्चयेंकरून युद्ध केलें आणि **बहिरामाचें** सैन्य सर्व मारून त्यास एकट्यास पळण्याचें प्राप्त केलें. नंतर सात दिवसपर्यंत **गजनी** शहरामध्यें आग लावून

देऊन तें लुटण्याची व उद्वस्त करण्याची पराकाष्ठा केली. सैय्यद वगैरे संभावित लोक हे त्यानें बहुत करून ठार मारिले; आणि महमूद, मसाऊद, व इब्राहिम ह्यांशिवाय बाकीच्या सर्व राजांच्या कबरा व दुसऱ्या मोठ्या मोठ्या इमारती मोडून जमीनदोस्त केल्या. असा त्या अल्लाउद्दीनानें क्रोधांध होऊन मोठा प्रळय केला त्यामुळें त्याची अपकीर्ति सर्वदा राहून इतिहासामध्यें त्याच्या नांवास जहांसोज, म्हणजे पृथ्वी जाळणारा, असें विशेषण जोडलें गेलें.

१२. बहिराम हिंदुस्थानाकडे पळत असतां ह्या अनर्थाचें वर्तमान समजल्यामुळें व वाटेचे श्रम आणि विपत्ति ह्यांमुळें त्याच्या शक्ति क्षीण होऊन तो मरण पावला. इ० स० ११५२.

१३. त्याचा मुलगा खुषरू हा लाहोरास पोंहो-चल्यावर तेथील रयतेनें त्याचा जयजयकार-पूर्वक मोठा आदर केला, आणि त्यानें त्या ठिकाणींच राजधानी स्थापून सात वर्षेंपर्यंत राज्य केलें. इ० स० ११६०. नंतर त्याचा मुलगा खुषरू मलिक् सिं-हासनावर बसला. त्यानें आपल्या राहिलेल्या प्रांतांमध्यें सत्तावीस चांद्र वर्षेंपर्यंत राज्य केल्यावर शेवटीं गोरी वंशाच्या मुसलमानांनीं त्याचें राज्य घेऊन गजनवी वंशाची समाप्ति केली. इ० स० ११८६.

# प्रकरण ६.

## गोरी वंशाच्या राजांचें वर्तमान.

### इ० स० ११८६ पासून १२०६ पर्यंत.

१. गोरी वंशाचा मूळपुरुष कोण, व त्याची मूळ-
पीठिका कशी, ह्याचा निश्चय नाहीं. त्या
इ० स० ११७६. वंशाचे राजे आणि त्यांच्या प्रजा हे सर्व
**अफगान** होते. त्यांचा राजा **अल्लाउद्दीन**
ह्यानें **गजनी** एथें लोकांचा फार संहार केला, त्याचा
पुतण्या **ग्यासुद्दीन** राज्य करीत असतां त्या-
इ० स० ११७८. चा भाऊ **महंमद शहाबुद्दीन** ह्यानें **पंजाब,**
**गुजराथ,** व **सिंध,** एथें दोन तीन वेळ स्वाऱ्या
घातल्या, व **खुस्रू मलिक्** ह्याचा पराजय करून त्याचा
मुलगा ओलीस घेतला. नंतर **मलिक्**
इ० स० ११८४. ह्यानें फौज जमवून **शहाबुद्दीन** ह्याचा एक
किल्ला परत घेतला. त्या वेळीं **शहाबुद्दीन**
ह्यानें तह करण्याची इच्छा दाखवून **मलिक्** ह्याचा मुलगा
परत पाठविला, त्यास तो **मलिक्** भेटावयास येत असतां
**शहाबुद्दीनानें** एकाएकीं आडवाटेनें निवडक स्वारां-
निशीं जाऊन त्यावर हल्ला केला. त्यानें त्यास व
त्याच्या कुटुंबांतील माणसांस कैद करून आपल्या भावा-
कडे पाठविलें, तेथें तीं कांहीं वर्षांनीं राज्या-
इ० स० ११८६. च्या बखेड्यांत प्राणास मुकल्यावर **गजनवी**
वंश लयास पावला.

२. त्यावेळीं हिंदुस्थानांत दिल्ली एथें तुवारवंशाचे
रजपूत राजे राज्य करीत होते. तसेच अजमीर एथें
चव्हाण, कनोज एथें राठोर, आणि गुजराथेंत चालु-
क्यांच्या मागून वागले ह्या नांवाचे रजपूत सत्ताधारी
होते; आणि दिल्लीचा तुवार राजा ह्यानें मरते वेळेस
आपला नातू अजमीरचा पृथुराजा ह्यास राज्याचा
अधिकारी केल्यामुळें तुवार आणि चव्हाण, ह्या दोनही
वंशांचा मुख्य पुरुष एकच झाला.

३. ह्या पृथुराजावर शहाबुद्दीन ह्यानें प्रथम
हल्ला केला, त्यावेळीं पानिपतच्या मैदानांत
त्याचा पराजय होऊन त्याच्या फौजेची इ० स० ११९२.
वाताहत झाली, आणि हिंदूनीं वीस कोस-
पर्यंत त्याच्या मागून पाठलाग केला; परंतु शहाबुद्दीन
लढाईंतून परत स्वदेशास गेला; तो तेथें फार दिवस
न राहतां आफगान लोकांची मोठी फौज घेऊन परत
हिंदुस्थानांत आला, आणि त्यानें मोठें युद्ध
केलें. त्यांत बहुत हिंदु सरदार पडले, इ० स० ११९३.
आणि पृथुराजा शत्रूंच्या हातीं सांपडून
त्यांनीं त्यास ठार मारिलें. नंतर शहाबुद्दीन निघून
परत स्वदेशास गेल्यावर त्याचा सरदार कुतबुद्दीन ह्यानें
दिल्ली प्रांत हस्तगत केला. पुढें शहाबुद्दीन कितीएक
वेळां हिंदुस्थानास परत आला. तो व त्याचे सरदार
कुतबुद्दीन व महंमद बखत्यार ह्यांनीं कनोज, अयोध्या,
बहार व बंगाला, हे प्रांत अनुक्रमें जिंकून घेतले.
नंतर तो परत स्वदेशास जाऊन आपला भाऊ ग्यासु-

दीन हा मेल्यावर त्याचे जागीं तकाचा अधिपति झाला.

इ० स० १२०२. शहाबुद्दीन ह्यानें **हिंदुस्थानांतील** युद्धामध्यें कितीएक प्रसंगीं फार निर्दयपणा केला. त्यानें **अजमीर** घेतलें तेव्हेळीं आपणास अडथळा करणारे शेंकडों लोक धरून ठार मारिले, आणि बाकीचे गुलाम केले.

४. **शहाबुद्दीन** स्वदेशीं गेला त्यामुळें, व तिकडे इ० स० १२०६. त्याच्या फौजेचा नाश झाल्याचें वर्तमान आल्यामुळें, जिकडे तिकडे बंडें झालीं होतीं; त्यांचा बंदोबस्त त्यानें परत येऊन आपला सरदार **कुतुबुद्दीन** ह्याच्या साहाय्यानें केला; नंतर **शहाबुद्दीन** पश्चिमेकडील प्रांतांकडे जात असतां **सिंधुनदाच्या** कांठीं **गकर** नांवाच्या लोकांनीं त्याच्या डेऱ्यांत शिरून त्यास ठार मारिलें. शहाबुद्दीन ह्याच्या मरणसमयीं **माळवा** व कांहीं जवळचा प्रांत शिवाय करून बहुतेक उत्तर **हिंदुस्थान** त्याचे सत्तेखालीं आलेलें होतें.

५. त्याचा पुतण्या **महंमद** ह्यास राज्य आवरेना म्हणून इ० स० १२१५. त्याच्या बापाच्या वेळचा सरदार **कुतुबुद्दीन**, जो **हिंदुस्थानांत** स्वतंत्रपणें सत्ता करूं लागला होता, त्यास त्यानें राजा असा किताब पाठवून दिला. नंतर कांहीं दिवसांनीं त्याचें **सिंधुनदाच्या** पश्चिमेकडील राज्यही गेलें, आणि कोणी एके युद्धप्रसंगीं तो प्राणास मुकून, गोरी वंशाची समाप्ति झाली.

# भाग २.

## अर्वाचीन इतिहास.

## प्रकरण १.

### गुलामराजांचें वर्तमान.

इ० स० १२०६ पासून १२८८ पर्यंत.

१. **कुतुबुद्दीन** लहानपणीं **निशापूर** एथें कोणा एकाचा खरीद केलेला गुलाम होता. तो पुढें योग्यतेस येऊन वर लिहिल्या प्रकारें- इ० स० १२१०. करून **हिंदुस्थानाचें** राज्यपद पावला, म्हणून त्याच्या वंशजांस गुलाम असें म्हणतात. हा **कुतुबुद्दीन** गादीवर बसावयाच्या पूर्वीं वीस वर्षेंपर्यंत त्या मुलखांत अमल करीत होता, त्यानें चार वर्षेंपर्यंत बादशाहाचा अधिकार करून आपल्या नीतीची आणि सदाचरणाची अक्षय्य कीर्ति मागें ठेविली.

२. त्याचा मुलगा आराम त्याच्या मागें गादीवर बसला, त्यामध्यें कांहीं मोठे गुण न्हवते. त्यास बारा महिन्यांच्या आंत त्याचा मेहुणा इ० स० १२११. अल्तमष ह्यानें मारिलें.

३. **अल्तमष** हा **कुतुबुद्दीनानें** प्रथम गुलाम खरेदी केला होता; तो पदवीस चढतां चढतां, शेवटीं त्याच जांवई होऊन त्याच्या मागें गादीवर बसला.

४. **अल्तमष** राज्य करीत असतां **जंघिसखान** नामक मोंगल लोकांचा सरदार ह्यानें **इराण** व **काबुल** ह्या देशांत येऊन बहुत लोकांचा संहार केला. तो **कंदहार** एथील राजाचा पाठलाग करीत **सिंधुनदापर्यंत** आला होता; परंतु तेथून परत इराणाकडे गेला. हें **हिंदुस्थानच्या** लोकांचें भाग्य म्हणावें. त्या वेळेचे मोंगललोक मुसलमान नव्हते, आणि लोकांनीं त्यांचा धर्म घ्यावा म्हणून ते त्यांस उपद्रव करीत असें नाहीं; केवळ मनुष्यांचा नाश करावा आणि त्यांस दुःख द्यावें ह्यांतच ते सुख मानीत असें दिसतें.

५. **अल्तमष** ह्यानें **सिंधदेश** हस्तगत केला. तसाच **बंगाल**, **बहार** व **माळवा**, ह्या प्रांतांत आपला अमल पुर्त्तेपणें बसविला. त्याचा वजीर व त्याच्या आश्रयाखालचे विद्वान् लोक मोठे संभावित होते. **दिल्लीजवळ** **कुतुबमीनार** म्हणून एकशें साठ हात उंच, शोभिवंत, व नकशीदार मनोरा आहे तो ह्या राजाच्या राज्यांत तयार झाला. त्या मनोऱ्याच्या जवळ एक अपुर्ती सर्वोत्कृष्ट मशीद आहे, तिच्या वरील लेख पाहातां ती **शहाबुद्दीन** गोरि ह्याच्या वेळीं झाली असें वाटतें.

६. ह्या बादशाहानंतर त्याचा मुलगा **रुक्नुद्दीन** गादीवर बसला. तो कळावंतिणी, गवई, व छचोरलोक ह्यांस मनस्वी पैका देऊं लागला, आणि त्यानें राज्याचा कारभार आपले आईचे स्वाधीन केला, तिनें जुलूम व क्रूर कर्में करण्याचा आरंभ केला, त्यामुळें सर्व लोकांनीं त्रासून

इ० स० १२३६.

सात महिन्यांनीं त्यास पदच्युत केलें, व त्याची बहीण **रजियाबेगम** हिला सिंहासनावर बसविलें. ही बेगम कांहीं गुणी व विद्वान होती, आणि आरंभीं एक दोन बंडें मोडण्यांत तिनें आपलें शौर्य व हुशारी प्रगट केली, परंतु पुढें तिनें एका हलक्या मनुष्यावर प्रीति केल्यामुळें अमीर लोकांस तिजविषयीं तिरस्कार येऊन तिला त्यांनीं धरून कैदेंत ठेविलें. तेथें ती ज्याच्या प्रतिबंधांत होती, त्या **अल्तुनिआ** सरदारास वश करून तिनें त्याशीं लग्न केलें आणि राज्य घेण्याकरितां फौज जमविली. नंतर ती आणि मानकरी ह्यांच्या दोन मोठ्या लढाया झाल्या; आणि ती व तिचा नवरा ह्या दोघांस कैद करून मानकऱ्यांनीं ठार मारिलें. इ० स० १२३७.

७. पुढें **रुकुद्दीनाचा** भाऊ **मवज्जुद्दीन** बादशाहा झाला. त्यानें दोन वर्षें दोन महिने राज्य केल्यानंतर फौजेनें त्यास कैद केल्यावर तो मेला. नंतर **रुकुद्दीन** ह्याचा मुलगा **अल्लाउद्दीन मसाऊद** ह्यानेंही तितकेंच राज्य करून तशीच अवस्था करून घेतली. इ० स० १२४१. ह्या दोन राजांच्या कारकिर्दींत मोंगल लोकांनीं **पंजाबावर** एक, व **बंगाल्यावर** एक, अशा दोन स्वाऱ्या केल्या, परंतु त्या लोकांचा पराजय, विशेष आयास न लागतां झाला.

८. **मसाउदाच्या** मागें **अल्तमषाचा** नातू **नासरुद्दीन महमूद** तक्ताचा अधिपति झाला. त्यानें यमुनेच्या कांठीं व **बुंदेलखंडांत**, व **मेवात**, **चितूर**, **चांदेरी**,

इत्यादि प्रांत ह्यांत जेथें पूर्वी बखेडा झाला होता, तेथें आपला अमल बसविला. तसेंच पंजाबांत मोंगलांनीं एकदोन वेळ हल्ले केले, ते त्याचा सुभेदार शीरखान ह्यानें परत लाविले. त्यास गकर वगैरे लोकांनीं मदत केली होती, त्यांचें पारिपत्य केलें, आणि सिंध वगैरे प्रांतांत बंडें झालीं होतीं त्यांचा बंदोबस्त केला. ह्या राजाच्या राज्यांत जंघिसखानाचा नातू होलाखुखान ह्याजकडून वकील आले होते. त्या वकिलांच्या बहुमानार्थ दरबारामध्यें मोठी शोभा केली होती, तिचें व त्या वेळच्या वैभवाचें वर्णन बहुत विस्तारेंकरून केलें आहे. ह्याप्रमाणें वीस वर्षेंपर्यंत राज्य करून नासरुद्दीन मरण पावला.

इ०स० १२६६.

९. हा नासरुद्दीन बादशाहा आपल्या खासगत संसारांत दर्वेशाप्रमाणें वागत असे. इतकें वैभव असतां तो आपण स्वहस्तेंकरून पुस्तकें लिहून त्यांहींकरून उत्पन्न झालेल्या द्रव्यावर चरितार्थ चालवी. तो इतर राजांप्रमाणें स्त्रीलंपट नव्हता, त्याची एकच बायको होती, तिजकडून तो स्वत: रोज स्वयंपाक करवीत असे. कोणा एका दिवशीं तिचा हात भाजून ती तें गाऱ्हाणें सांगावयास आली, आणि आपणास एक दासीची नेमणूक करून द्यावी म्हणून बोलली. त्या बोलण्यावर त्यानें उत्तर केलें कीं, मी राज्याचा जामदार आहें, मला निरर्थक खर्च करण्यास सत्ता नाहीं. ह्या राजास विद्येचें व्यसन होतें. तबकातिनासरी म्हणून इराण देशाची तवारीख म्हणजे बखर त्याच्या दरबारांत झालेली प्रसिद्ध

आहे. नासरुद्दीन इतका भला असे कीं; त्यानें लिहिलेल्या ग्रंथांत कोणी एका अमीरानें कांहीं अशुद्धें काढिलीं, तीं त्यानें त्याच्या देखत फिरवून तो गेल्यानंतर पूर्ववत् होतीं तशीं केलीं, त्याचें कारण त्यास कोणी विचारिलें तेव्हां तो बोलला कीं तीं अशुद्धें नव्हतीं हें मला ठाऊक होतें, परंतु त्याच्या संतोषाकरितां मीं त्या वेळेस फिरविलीं.

१०. नासरुद्दीनाच्या मागें ग्यासुद्दीन बुल्बुन बादशाहा झाला. हा लहानपणीं गुलाम असून अल्तमष ह्याच्या दरबारांत वाढला होता. मागील राज्यांच्या सर्व बखेड्यांत वागून शेवटीं नासरुद्दीनाच्या वेळेस हा वजिराचा अधिकार पावला, आणि मध्यें कांहीं वेळपर्यंत त्याच्या इतराजीखालीं येऊन कामांतून दूर झाला असतां, ह्याला पुनः आपल्या कामावर बोलावणें बादशाहास प्राप्त पडलें. इ० स० १२६६.

११. बुल्बुनाच्या राज्यांत आरंभींच मेवातेमध्यें व इतर प्रांतांमध्यें लुटारू लोकांनीं बंडें केलीं, त्यांचा त्यानें चांगला बंदोबस्त करून, सर्वत्र ठाणीं घातलीं. मेवातेमध्यें त्यानें एक लक्ष लोक मारिले, आणि तेथील रान तोडून पूर्वीं चोरांस राहावयाच्या ज्या जागा होत्या त्या वस्ती व लागवड व्हावयाजोग्या केल्या. तसेंच दुसरें बंड बंगाल्यांत झालें. तें असें कीं, तेथील सुभेदार तोग्रल्खान खंडणी पाठवावयाची ती न पाठवितां आपणास बादशाहा म्हणवूं लागला. त्याच्या बंदोबस्ताकरितां पाठविलेल्या इ० स० १२७२.

दोन फौजा त्यानें पळविल्या. तेवेळीं बादशाहानें स्वतः त्यावर स्वारी करून तो पळूं लागला असतां त्याचा पाठलाग बहुत दूरपर्यंत केला. शेवटीं त्याच्या फौजेची वाताहत होऊन तो **तोग्रलखान** नदींतून घोड्यावर बसून पोंहत जात असतां बुडून मरण पावला.

१२. बुलबुनाचा मुलगा **महंमद** मोठा शूर होता, त्यानें इराणचा मोंगल बादशाहा **अर्घूनखान** ह्याच्या फौजेस दोनवेळ हटवून
इ० स०
१२८६.
मोंगलांनीं घेतलेला मुलख परत हस्तगत केला; परंतु ह्यांतून दुसऱ्या लढाईमध्यें तो शाहाजादा पडला, व त्याच्या प्रीतींतील **अमीरखुस्रू** ह्या नांवाचा कोणी एक कवि धरला गेला. त्या प्रसंगीं सैन्यांतील सर्व लहान मोठ्या लोकांच्या डोळ्यांतून अश्रु आले, आणि बादशाहास परम दुःख होऊन पुढें तो लौकरच मरण पावला.

१३. हा **बुलबुन** राजा शूर व मसलतदार होता, त्याच्या दरबारचें वैभव आणि त्याचें औदार्य ह्यांची कीर्ति फार होऊन मोगलांनीं काढून दिलेले राजे पंधरा त्याचे आश्रयास येऊन राहिले होते; आणि त्याचा मुलगा **महंमद** हा गुणी व विद्येचा अभिमानी होता. त्याच्या पदरीं बहुत कवि होते, परंतु ह्या बादशाहामध्यें क्रूरपणा हा मोठा दोष होता. कोणी बंड केलें असतां त्यास व त्याच्या जवळच्या सर्व माणसांस तो ठार मारीत असे, आणि कोणीं सुभेदारानें अपराध केला असतां त्यास आपल्या समक्ष प्राण जाईपर्यंत कोरड्यांचा मार देववीत

असे. बंगालचें सुभेदाराचें पारिपत्य करण्याकरितां प्रथम फौज गेली तिचा जय झाला नाहीं, म्हणून तिच्या सरदारास त्यानें फांशीं दिलें.

१४. **महमद** ह्याचा मुलगा **कैखुस्रू** ह्यानें आपल्यामागें राज्य करावें असें **बुल्बुनानें** ठराविलें असतां तें एकीकडे ठेवून, **बकाराखान** म्हणून जो बुल्बुनाचा दुसरा मुलगा **बंगाल**चा सुभेदार होता, त्याचा मुलगा **कैकुबाद** ह्यास दरबारांतील लोकांनीं गादीवर बसविलें. तो अठरा वर्षांच्या वयाचा होता, व ख्यालीखुशालींत निमग्न असे, त्यामुळें राज्यांतील सर्व कारभार त्याचा वजीर **निजामुद्दीन** हा करूं लागला, व त्यानें आपणास राज्य प्राप्त व्हावें ह्या हेतूनें **कैखुस्रू** ह्यास मारेकरी घालून मारविलें असें वर्तमान ऐकून बादशाहाचा बाप **बंगाल्याहून** बंदोबस्ताकरितां आला असतां वजिराच्या सांगण्यावरून युद्धाचे तयारीनें **कैकुबादपुढें** गेला; परंतु ज्या वेळीं पितापुत्रांची भेट झाली, आणि **बकाराखान** आपल्यापुढें मुजरा करीत आहे आणि अश्रूंनीं त्याचे डोळे भरले अहेत, असें बादशाहानें पाहिलें, त्या वेळीं पूर्वींच्या मसलतींची विस्मृति होऊन त्यानें जाऊन आपल्या बापाच्या गळयास मिठी मारिली, आणि पुढें त्याचा फार बहुमान करून त्यास ठेवून घेतलें, परंतु वजिरापुढें आपलें कांहीं चालत नाहीं असें पाहून **बकाराखान** परत **बंगाल्यास** गेला. नंतर बादशाहा ह्यानें किंचित् सावध होऊन आपल्या वजिरास विषप्रयोगेंकरून मारविलें. तो बादशाहा विषयासक्ती-

इ० स० १२८८.

मुळें त्या तरुण वयांतच रोगी व दुर्बळ झाला. तेव्हां तो राज्यास उपयोगी नाहीं असें ठरवून गिलची फौजेनें त्यास मारिलें, आणि आपला सरदार **जलालुद्दीन** ह्यास सिंहासनावर बसविलें.

---

## प्रकरण २.

### गिलची अथवा खिलजी वंशाच्या राजांचें वर्तमान.

इ० स० १२८८ पासून १३२१ पर्यंत.

१. **जलालुद्दीन** सिंहासनारूढ झाला तेवेळेस त्याचें वय सत्तर वर्षांचें होतें.

२. ह्या बादशाहानें सात वर्षेंपर्यंत राज्य केलें, त्यांत प्रथम **बुल्बुन** ह्याचा पुतण्या **मलिकज्याजु** ह्यानें **करा** शहर एथें सुभ्यावर असतां बंड करून **दिल्लीवर** स्वारी केली. तीमध्यें त्याचा पराभव झाला, परंतु बादशाहानें त्यास कांहीं शिक्षा न करितां नेमणूक करून देऊन **मुलतानास** पाठविलें त्याप्रमाणेंच **पंजाबांत मोंगलांनीं** स्वारी केली होती, त्यावर जाऊन त्यानें त्यांचा पराजय केला, परंतु त्यांशीं क्रूरपणानें न वागतां तह करून घेतला. त्यांतून ३००० लोक त्याच्या लष्करांत चाकरीस राहिले; आणि पुढें ते लोकरच मुसलमान झाले. त्यांस त्यानें राहावयास **दिल्लीच्या** बाहेर जागा नेमून दिली. तीस अद्यापि **मोंगलपुरा** असें नांव प्रसिद्ध आहे.

३. **माळव्यामध्यें** बंदोबस्ताकरितां **जलालुद्दीनानें** दोन वेळ स्वाऱ्या केल्या, परंतु त्याच्या शांतपणामुळें तेथें अमल पुरता बसला नाहीं. पुढें त्याचा पुतण्या **अल्लाउद्दीन**

हा करा व अयोध्या ह्या प्रांतांचा सुभेदार मोठा शूर आणि धैर्यवान् होता, त्यानें ८००० निवडक स्वारांसहित वऱ्हाडांतून जाऊन इलिचपुरापर्यंत बंदोबस्त केला. नंतर पश्चिमेकडेस नर्मदा नदी उतरून देवगिरी म्हणजे दौलताबाद एथील राजा रामदेव ह्याच्या मुलग्यास पराजित करून त्याकडून इलिचपूर वगैरे प्रांत व बहुत द्रव्य घेऊन परत आपल्या सुभ्यास आला. त्यावेळीं अल्लाउद्दीन ह्याचें लक्ष्य आपणास राज्य मिळण्याकडे आहे असें बादशाहास बहुत लोकांनीं समजाविलें असतां त्यास तें खोटें वाटून तो अल्लाउद्दीनास भेटावयास थोड्या लोकांसहित भागीरथीच्या पलिकडे गेला. त्या उभयतांचे भेटीचे वेळेस बादशाहा प्रीतीनें अल्लाउद्दीनाच्या गालावरून हात फिरवितो आहे, इतक्यांत त्यानें माऱ्यांस खूण केली, त्यांनीं तत्क्षणीं बादशाहाचा प्राण घेतला. त्याचें डोकें भाल्यास टोंचून अल्लाउद्दीनानें शहरांत व लष्करांत सर्वत्र फिरविलें.

४. जलालुद्दीन फार सात्विक व सौम्य होता. त्यास राज्याधिकार प्राप्त झाल्यावरही तो आपल्या जुन्या मित्रांस बोलावून त्यांशीं पहिल्याप्रमाणें जेवण खाण वगैरे व्यवहार ठेवीत असे. तो  इ॰ स॰ १२९५. आपल्या शत्रूंस आणि अपराध्यांसही क्षमा करीत असे, त्यामुळें राज्यांत बंडें व चोरांचा उपद्रव होत चालला होता तथापि कोणास देहांतदंड करावा असें त्याच्या मनांत येईना. ह्या बादशाहानें बुल्बुनाच्या लहान मुलास कैदेंत ठेवून

पुढें त्याचा जीव घेतला असे लेख आहेत, परंतु ह्याविषयीं निश्चय नाहीं. ह्या शिवाय जलालुद्दीनाविषयीं दुसरी एक लिहावयाजोगी गोष्ट आहे. शिद्दीमौला म्हणून एक दर्वेशी दिल्लीमध्यें दान धर्म बहुत करीत असे. त्याजवळ परीस आहे, असें वर्तमान बादशाहास कळल्यावरून आणि तो राज्य घेण्यास पाहतो, असें कोणीं राजाजवळ बोलल्यावरून त्यानें त्या दर्वेश्यास व त्याच्या जवळच्या लोकांस आपलेजवळ आणून ठार मारविलें, त्यावेळेस त्या दर्वेश्यानें बादशाहास शाप दिला. त्याप्रमाणें तेव्हांच वाव्हटळ सुटून बादशाहास चिंता उत्पन्न झाली. पुढें त्याचा वडील मुलगा वारला, पर्जन्य गेला, व दुष्काळ पडला. नंतर कांहीं दिवसांनीं बादशाहाही प्राणास मुकला. हे सर्व अनर्थ दर्वेश्याच्या शापानें झाले, असें लोक बोलूं लागले.

५. अल्लाउद्दीनानें तक्तावर बसतांच मागील बादशाहाचे दोन मुलगे ठार मारिले, व त्याच्या राणीस कैद करून ठेविलें.

६. पुढें लौकरच बादशाहाचा भाऊ अलीफखान व वजीर नुसरतखान ह्यांनीं जाऊन गुजराथ प्रांत घेतला. तेथील राजा बागलाणांत पळून गेला. त्या सरदारांस मिळालेली लूट सरकारास द्यावयाविषयीं जबरी केल्यामुळें लष्करांत मोठा भयंकर बखेडा होऊन बादशाहाचा पुतण्या प्राणास मुकला. पुढें त्या बंडाचा बंदोबस्त झाला, परंतु त्याच्या संबंधानें बहुत लोक मुलांलेंकरांसुद्धां मरण पावले. बाकीचे रतनभोर एथील राजाच्या

आश्रयास जाऊन राहिले होते; पुढें जेव्हां तीन वर्षांनीं तो किल्ला हस्तगत झाला, तेव्हां अल्लाउद्दीनानें त्या लोकांस तेथील राजा व त्याचें कुटुंब ह्यांसहित ठार मारिलें.

७. रतनभोर एथें बादशहाची स्वारी होती तेवेळीं, त्याचा पुतण्या ह्यानें एका दिवशीं बादशाहा शिकार करीत असतां, कितीएक मोंगलांकरवीं त्यास मारण्याचा प्रयत्न केला; (म्हणजे तो जसा आपल्या चुलत्यास मारून गादीवर बसला होता तसा) परंतु मारेकऱ्यांच्या बाणवृष्टींतून बादशाहा वांचला, आणि तो शाहाजादा व त्याचे मदतगार हे मात्र प्राणास मुकले. त्याच्या दुसऱ्या दोन पुतण्यांनीं बदायून एथें बंड केलें, त्यांसही त्यानें धरून प्रथम त्यांचे डोळे काढून मग शिरच्छेद केला. तसाच दिल्लीमध्यें हाजीमौला नामें एक गुलाम ह्यानें लोक जमवून बंदिवान सोडण्याचा व खजीना वांटण्याचा आरंभ केला होता. इतक्यांत तेथील कामदारानें त्याच्या लोकांस घालवून देऊन त्यास ठार मारिलें. पुढें त्याचा धनी होता तो व त्याच्या कुटुंबाचीं माणसें ह्यांजकडे कांहीं अपराध नसतां तीं सर्व बादशाहानें मारविलीं.

८. ह्या बादशाहाच्या राज्यांत मोंगलांनीं बहुत वेळ हल्ले केले, त्यांत एक हल्ला कुतुलघखान ह्यानें जो दिल्लीवर केला त्यापासून बादशाहास प्रथम मोठें भय प्राप्त झालें होतें, आणि उभयपक्षीं सैन्यही फार जमलें होतें; परंतु शेवटीं तुमुलयुद्ध होऊन बादशाहाचा सरदार जफरखान ह्याच्या पराक्रमाच्या योगें करून बादशाहास जय मिळाला. त्यावेळीं लढायांत जे मोंगल सांपडत त्यांस

**दिल्लीस** पाठवून, त्यांतील सरदारांस हत्तीच्या पायीं बांधीत असत, व इतरांस तोडतोडून त्यांचे प्राण घेत असत. पुढें बादशाहानें आपल्या चाकरींतून सर्व मोंगल दूर केल्यामुळें त्यांनीं बंड केलें, तेव्हेळीं त्यांतून १५००० लोकांची कत्तल करून त्यांचीं मुलें लेंकरें विकून टाकिलीं.

९. **अल्लाउद्दीन** ह्यानें **मेवाडावर** स्वारी करून **चितूर** नामें किल्ला घेतला, आणि तेथील
इ० स० १३०३. राजा ह्यास कैद करून कांहीं वेळपर्यंत तेथील अधिकार आपल्या वडील मुलास सांगितला. पुढें तो किल्ला **माळवदेव** नामक रजपुताच्या स्वाधीन केला. ह्याच वेळेस **वरंगूळ** घेण्याकरितां एक लष्कर **तैलंगणांत** रवाना झालें, त्या-
इ० स० १३०६. च्या हातून किती एक वर्षेपर्यंत कांहीं पराक्रम घडला नाहीं. पुढें **मलिक्काफूर** ह्यानें **देवगड** जिंकून **तैलंगणांत** स्वारी केली, आणि **वरंगूळच्या** राजाचा पराजय करून त्यानें खंडणी द्यावी असें ठरविलें.

१०. पुढील वर्षीं **काफूर** ह्यानें **देवगडाचे** वाटेनें **पैठणाजवळ गोदावरी** नदी उतरून **करना-**
इ० स० १३०९. **टकांत** स्वारी केली. तो **द्वारसमुद्रनामें** राजधानी घेऊन, तेथील **बल्लाळ** राजाचें राज्य मल्याळापासून **रामेश्वरापर्यंत** हस्तगत करून, व बहुतद्रव्य घेऊन परत **दिल्लीस** आला. नंतर आणखीं एकवेळ दक्षिणेंत स्वारी **रामदेव जाधवाचा** मुलगा **देवगडचा** राजा त्यानें ठार मारिला, व सर्व **महाराष्ट्र** आ-

णि करनाटक देश घेऊन तेथील राजांवर खंडणी बस-
विली. परंतु पुढें **अल्लाउद्दीन** वृद्ध आणि
इ० स० १३१२. अशक्त झाला ह्यामुळें दरबारांत अव्यवस्था
झाली. ह्यास्तव **गुजराथेंत** बंड झालें; **राणा हम्मीर** ह्यानें **चितूर** परत घेतलें आणि **रामदेवाचा** जांवई **हरपाळ** ह्यानें दक्षिणेंत मोठा फितूर करून मुसलमान किल्लेदारांस हांकून दिलें. नंतर लौकरच **अल्लाउद्दीन** मरण पावला. त्यास **काफूर** ह्यानें विषप्रयोग केला असें वर्तमान तेवेळेस प्रसिद्धींत आलें.

११. **अल्लाउद्दीनाचा** स्वभाव निर्दय आणि घातकी
होता, हें त्याचीं जीं कर्में वर लिहिलीं त्यांव-
इ० स० १३१६. रून स्पष्टच आहे. तो सिंहासनारूढ होई-
पर्यंत त्यास लिहितां वाचतां येत नव्हतें, तथापि माझ्या इतका कोणी शाहाणा नाहीं असा त्यास अभिमान होता. त्यानें जसें राज्य बहुत मिळविलें तसाच त्या राज्याचा बंदोबस्तही मोठ्या युक्तीनें राखिला होता. लोकांजवळ द्रव्य अधिकउणें झाल्यामुळें शेतकरी ह्यांजवळ अमुकपर्यंत जमीन असावी, व गवळ्यांनीं अमुक गुरें बाळगावीं, असा निर्बंध ठराविला, नेमणुकी कमी केल्या; सरकारदेणें वाढविलें; तसाच कोणी मातबर झाला असतां त्याची मिळकत जप्त करण्यास आळस केला नाहीं. ह्याच रीतीनें लोकांच्या कल्याणार्थ सरकारतर्फेनें कोठारें केलीं होतीं, आणि दाणा मुलकांत यावा, बाहेर जाऊं नये, व कोणीं एकदम घाऊक खरेदी करूं नये, असा बंदोबस्त राखिला होता.

१२. अल्लाउद्दीनाच्या मागें त्याचा सरदार **काफूर** ह्यानें त्याच्या दोन वडील मुलांचे डोळे काढून तिसरा मुलगा **मुबारीक** ह्याचा जीव घेण्यास मारेकरी पाठविले; परंतु त्यांला दया येऊन त्यांच्या हातून तें काम झालें नाहीं. पुढें काफूर ह्यास प्रयत्न करण्यास अवकाश मिळण्याच्या पूर्वी बादशाही हुजूर पाहाऱ्याच्या लोकांनीं त्यास ठार मारून **मुबारीक** ह्यास गादीवर बसविलें.

इ० स० १३१७.

१३. ह्या बादशाहानें **गुजराथेंत** अमल बसविण्या-करितां फौज पाठविली, आणि **हरपाळास** कैद करून त्याच्या आंगाचें कातडें सोलून काढिलें; तसाच त्याचा वजीर **खुसरूखान** ह्यानें एक वर्षपर्यंत युद्ध करून **मलबार** प्रांत हस्तगत केला, आणि तिकडून बहुत संपत्ति दिल्लीस आणिली.

१४. राज्याच्या आरंभींच पूर्वी जप्त केलेल्या जमिनी **मुबारिकानें** सोडिल्या, कर माफ केले, आणि एकदांच १७००० बंदिवान सोडून दिले, परंतु ह्या चांगल्या कृत्यापेक्षां बहुत अविचार करून आणि कळावंतिणी बरोबर प्रसिद्धपणें नाचण्याच्या आणि मद्यप्राशन करण्याच्या छंदांत पडून राज्याची काळजी सोडिली, आणि मोठमोठ्या कितीएक अमीर लोकांस ठार मारिलें. तेवेळेस त्याचा वजीर **खुसरू** ह्यानें संधि साधून त्यास व त्याच्या मुलां माणसांस मारून आपण गादीवर बसला. परंतु **पंजाबचा** सुभेदार **गाजीखान** ह्यानें आपल्या हाताखालचें अनेक युद्धप्रसंग

इ० स० १३२१.

पाहिलेलें लष्कर बरोबर आणून खुसरू ह्याचा पराजय करून त्याचें आयुष्य व त्याचें राज्य ह्यांची एकेकाळीं समाप्ति केली.

१५. त्यावेळेस प्राचीन राजवंशाचा कोणी गादीवर बसवावा असा गाजीखान ह्यानें आपला अभिप्राय जाहिर केला; परंतु पूर्वींच्या राजवंशांतील कोणी पुरुष जिवंत राहिला नाहीं, असें पाहून सर्वांनीं गाजीखान ह्यासच सिंहासनावर स्थापिलें. त्यानें ग्यासुद्दीन तघलख हा किताब धरिला. इ० स० १३२१ आगस्त ता० २२

---

## प्रकरण ३.

### तघलख वंशाचे राजांचें वर्तमान.

### इ० स० १३२१ पासून १४१२ पर्यंत.

१. ग्यासुद्दीन तघलख हा बुल्बुनाचे दासाचा पुत्र, ह्यानें जसें निर्दोष रीतीनें राज्य मिळविलें, तसाच त्याचा उपभोगही शांतपणानें यथान्याय केला.

२. त्याचा मुलगा यूनाखान ह्यानें प्रथम तैलंगणावर स्वारी केली, ते वेळेस तो उद्योग सिद्धीस नजातां २००० स्वारांसहित तो परत आला, परंतु दुसरे स्वारींत त्यानें वरंगूळ घेऊन तेथील राजास कैद करून दिल्लीस आणिलें. इ० स० १३२२.

३. ह्या बादशाहाच्या बापाच्या यजमानाचा मुलगा म्हणजे पूर्वींच्या कैकुबाद राजाचा बाप बकाराखान, हा पहिल्यापासून त्यावेळापर्यंत बंगाल्याच्या सुभ्याच्या कामावर होता, त्यास बाद- इ० स० १३२३.

शाहाची स्वारी तेथें गेली, तेव्हां त्या अधिकारावर कायम करून राजचिन्हें धरण्यास मोकळीक दिली, आणि सोनारगांव म्हणजे धाका, ह्या प्रांताचा बंदोबस्त करून व तिर्हूत एथील राजास कैदी करून बादशाहाची स्वारी मागें फिरली.

४. वाटेंत शाहाजादा यूनाखान ह्याची गांठ पडली, तेवेळीं भेटीकरितां जो डेरा दिला होता, इ० स० १३२५. तो अकस्मात् खालीं पडून बादशाहा मरण पावला. त्या प्रसंगीं यूनाखान तेथें नव्हता, आणि बादशाहाच्या आवडींतला दुसरा मुलगा तो बापाबरोबर मेला, ह्या संदर्भावरून पाहतां डेरा पाडण्याची युक्ति युनाखानानें बुद्ध्या केली असेल असें अनुमान होतें.

५. दिल्ली एथील तघलखाबाद गढी ग्यासुद्दीन ह्याचे वेळची बांधलेली आहे.

६. यूनाखान सुलतान महंमद ह्या नांवानें सिंहासनारूढ झाल्यानंतर, त्यानें प्रथम तैमूरशीनखान म्हणून मोंगल लष्करासहित पंजाबांत शिरला होता त्यास मनस्वी खंडणी देऊन परत घालविलें, आणि दक्षिणेमध्यें आपली सत्ता चालू केली.

७. परंतु पुढें त्यानें फार जुलूम व जबरदस्ती करण्याचा आरंभ केला, त्यामुळें लोक पळून इ० स० १३३८ जाऊं लागले असतां त्यानें कनोज वगैरे ठिकाणीं लष्कराचा वेढा देऊन हजारों निरपराध माणसें पशूंसारखीं ठार मारिलीं. ह्या कारणास्तव राज्यांत अनेक ठिकाणीं बंडें झालीं. त्यांपैकीं माळवा

एथें बादशाहाच्या पुतण्यानें जें बंड केलें होतें, व पंजाबांत मलिकबैराम ह्यानें जें केलें होतें, त्या दोहोंचीही शांति लौकरच करून त्यांतील मुख्यांस ठार मारिलें. परंतु बंगाल्यांत कोणी मुसलमानानें जें बंड केलें होतें, व पूर्व समुद्राच्या कांठीं जें दुसरें एक बंड झालें होतें, त्या दोहोंचा बंदोबस्त झालाच नाहीं. ती अव्यवस्था पाहून करनाटकच्या बल्लाळ राजानें तुंगभद्रेच्या कांठीं विजयनगरांत एक नवी राज्याची गादी स्थापिली, आणि तैलंगणाच्या राजानें वरंगूळ एथील लष्कर हांकून देऊन तेथें आपली राजधानी केली.

इ० स० १३४४. (line 3)

इ० स० १३४४. (line 8)

८. आणखीही दक्षिणेंत व इतर प्रांतांत कितीएक मोठमोठीं बंडें झालीं, त्यांचा बंदोबस्त बादशाहानें करून आपला जांवई इमादुल्मुल्क ह्यास दक्षिणेंतील सुभ्याचें काम सांगितलें. इ० स० १३४७. इतक्यांत माळव्यांतील नव्या सुभेदारानें सत्तर मोंगल अमीर ठार मारल्यामुळें त्यालोकांनीं गुजराथेंतील फौजेस अनुकूळ करून घेऊन त्या प्रांतांत मोठी धुमाळी आरंभिली. तिचा बंदोबस्त बादशाहानें स्वतां करून शत्रूंच्या राज्याप्रमाणें खंबायत व सुरत हीं दोनही शहरें लुटलीं.

९. गुजराथेंतील कितीएक बंडवाल्यांस दाक्षिणेंतील मोंगल अमीरांनीं आश्रय दिल्याचें वर्तमान बादशाहास समजून त्यानें त्यांच्या पारिपत्याविषयीं हुकूम केल्यामुळें

तेथें एक मोठें बंड होऊन शेवटीं ब्राह्मणी वंशाची बादशाही स्थापित झाली*.

१०. ह्या दक्षिणेंतील बंडाचा पुरा बंदोबस्त होण्याच्या पूर्वीं **महंमद** बादशाहास **गुजराथेंत** जाणें प्राप्त पडलें, तेथून बंडवाल्याचा पाठलाग करीत तो पुढें **सिंधेमध्यें** जात असतां त्यास दुखणें येऊन तो ठठ्ठा शहरांत मरण पावला.

११. हा बादशाहा आरबी व फारशी ह्या भाषांमध्यें मोठा निपुण, विद्यांमध्यें व शास्त्रांमध्यें
इ० स० १३५१ प्रवीण, वैद्यकामध्यें कुशल, युद्धामध्यें शूर, आणि देवभक्तीमध्यें नैष्ठिक असा होता. ह्यानें राज्यामध्यें सर्वत्र धर्मशाळा, व सदावर्तें घातलीं होतीं; आणि मोठ्या मोठ्या नेमणुका करून देऊन विद्वान् जवळ ठेवून घेतले होते. ह्या गुणाच्या योगें त्याचा सर्व लोक चमत्कार मानीत होते.

१२. परंतु ह्यामध्यें अविचार हा मोठा दोष होता; त्यामुळें ह्यानें विलक्षण आणि अशक्य अशीं कार्यें बहुत आरंभून तीं सिद्धीस न नेल्यामुळें मागें आपल्या उपहासास मात्र कारणें करून ठेविलीं. प्रथम **इराण** घेण्याची मसलत करून बहुत फौज जमविली, तिनें, त्याचा खजीना संपविल्यावर सर्वत्र पसरून मुलुखाचें वाटोळें केलें. दुसरी १,००,००० फौज ह्यानें तयार करून

---

* ह्या बादशाहीच्या आरंभींचा प्रकार व पुढील कथा हीं मराठ्यांचे बखरेंत प्रथमप्रकरणीं पाहावीं.

हिमालयाच्या पाहाडांतून चीन घेण्यास पाठविली, तिचा चिनई लोकांनीं पराजय करून तिला मागें हटविलें. ती परत येत असतां पर्जन्यकाळ, अन्नाचा तोटा, इकडे नद्या भरलेल्या व घोर अरण्य, व मागून शत्रु पाठलाग करीत आहेत, इतक्या अडचणी त्या लष्करास भोगाव्या लागून शेवटीं सोबत्यांचें वर्त्तमान सांगावयास त्यांतून एकही माणूस परत आला नाहीं. कांहीं लोक किल्यांवरून रखवालीस ठेविले होते, त्यांस बादशाहानें रागानें ठार मारिलें. जसें काय ती स्वारी फसण्यास तेच कारण झालें, म्हणून त्यांस तो दंड केला.

१३. चिनेमध्यें पैक्याच्या ऐवजीं चिठ्या चालतात असें ऐकून महंमद तघलख ह्यानें रुपायांच्या ठिकाणीं तांब्याचे तुकडे चालवावयाचा आरंभ केला. तो बेत त्याच्या बळात्कारानेंही सिद्धीस गेला नाहीं. परंतु त्यामुळें व्यापारी लोकांचें आणि प्रजेचें मोठें नुकसान होऊन शेवटीं त्याचा खजीना रिकामा पडण्याचा प्रसंग आला. त्याच रीतीनें देवगडाची जागा त्यास फार चांगली वाटून त्यानें त्यास दौलताबाद असें नांव दिलें. पुढें दिल्ली ओस पाडून सर्व लोकांनीं तेथें जावें ह्याविषयीं दोन तीन वेळां त्यानें मोठा प्रयास केला, आणि जे न जातील त्यांस ठार मारावें असें ठरविलें; परंतु तो बेत सिद्धीस गेला नाहीं. वाटेच्या श्रमामुळें आणि दुष्काळामुळें हजारों लोक मेले, आणि दिल्लीमध्यें कांहीं वेळपर्यंत घुबडें आणि लांडगे ह्यांची वस्ती होण्याचा प्रसंग आला.

१४. ह्या बादशाहानें कारभाराचे सोईकरितां मुल-

त्याचे साठ साठ मैलांचे चौरस विभाग करण्याची तजवीज आरंभिली होती; तसेंच मिसर देशांतील खलीफा ह्याजकडून आपणास वस्त्रें आणवून पूर्वींच्या ज्या राजांस वस्त्रें मिळालीं नव्हतीं त्यांचीं नांवें राजावळींतून काढण्याविषयीं हुकूम केला, आणि असे दुसरे अविचार बहुत केले. तो समयविशेषीं असा स्वच्छंदानें वागत असे कीं, देवगडास जात असतां त्याचा एक दांत पडला, तो त्यानें मोठ्या समारंभानें पुरून त्यावर कबर बांधिली.

१५. ह्या बादशाहाच्या दरबारांत आफ्रिकेंतील एक विद्वान् अरब इबनभतूता म्हणून कांहीं वर्षेंपर्यंत होता, त्यानें ह्या राजाची व्यवस्था पाहिली त्याप्रमाणेंच यथास्थित वर्णिली आहे.

१६. महमद तघलख मेल्यावर लष्कराच्या सरदारांनीं त्याचा पुतण्या फिरूजुद्दीन ह्यास सिंहासनावर बसविलें. त्यानें सिंध प्रांताचा बंदोबस्त करून, व मागील राजाच्या मुलाच्या नांवानें बंड झालें तें मोडून, बंगाल्यावर स्वारी केली, परंतु तो प्रांत हस्तगत झाला नाहीं. पुढें तिकडून व दक्षिणेंतून तहाचें बोलणें आल्यावरून त्यानें बंगाल्याच्या बादशाहाचा व ब्राह्मणी बादशाहाचा स्वतंत्रपणा कबूल केला. नंतर लौकरच बंगालच्या बादशाहाचा मुलगा शिकंदर जो बापाच्या जागीं गादीवर बसला होता, त्यावर स्वारी केली. तथापि शेवटीं त्याची मुखत्यारी फिरूज ह्यास कबूल करणें प्राप्त झालें.

इ० स० १३५१.

इ० स० १३५३.

इ० स० १३५६.

पुढें कांहीं वर्षांनीं बंडें मोडण्याकरितां बादशाहास सिंध व गुजराथ ह्या प्रांतांत आणखी एक वेळ स्वारी करणें प्राप्त झालें.

१७. शेवटीं कांहीं वर्षांनीं बादशाहा वृद्ध आणि अशक्त झाल्यामुळें त्याच्या वजिरानें प्रबळ होऊन त्याचा वडील मुलगा नासरुद्दीन ह्यास मारण्याची मसलत केली. तेवेळीं तो शाहाजादा धीटपणानें जनानखान्यांत शिरला, आणि बापाच्या मनांत ममता उत्पन्न करून आपल्या प्राणाचें रक्षण करिता झाला. पुढें त्यानें वजिराचें पारिपत्य करून एक वर्षपर्यंत कारभार केला. नंतर तो आणि त्याचे दोघे चुलत बंधु ह्यांशीं वांकडें पडून तो सरमोर एथील पाहाडांकडे पळून गेल्यावर पुढें त्याच्या त्या प्रतिस्पर्द्ध्यांनीं बादशाहाचा नातू ग्यासुद्दीन ह्यास गादीवर बसविण्याची बादशाहाची मर्जी आहे असें प्रगट करून त्यास राज्याधिकार दिला. नंतर थोड्या दिवसांनीं फिरूज मरण पावला, त्यावेळेस त्याचें वय ९० वर्षांचें होतें.

इ० स० १३७२.

१८. ह्या बादशाहाची कारभार करण्याची रीति शाहाणपणाची होती. त्यानें त्रासदायक कर व शिवाय बाबती होत्या त्यांतून बहुतेक सोडून दिल्या; आणि सरकारी देण्याची शिस्त कायम ठरावून वसूल करणारे कामदार ह्यांच्या हातीं जुलूम ज्यास्ती करण्याचें कांहीं ठेविलें नाहीं. तसेंच कोणाच्या शरीरास इजा देणें किंवा हातपाय वगैरे

इ०स०१३८८ आकटोबर.

तोडणें ह्याची मनाई केली; आणि देहांतदंडही फारसा न व्हावा असा कायदा ठरविला.

१९. त्यानें शेतांची लागवड वगैरे होण्याकरितां नद्यांस ५० बांध घातले, ५० मशिदी बांधल्या, ३० शाळा चालू केल्या, तशाच १०० धर्मशाळा, ३० तळीं, १०० दवाखाने, १०० हमामखाने म्हणजे स्नानाच्या जागा, आणि १५० पूल इतकीं कामें करून त्यांची नेहमी दागदुजी राहाण्याकरितां जमिनीच्या नेमणुकी करून दिल्या. ह्या बादशाहानें लोकोपकारार्थ केलेल्या कामांपैकीं कांहीं अद्यापि आहेत, त्यांतून एक कालवा यमुनेपासून कर्नाळ, हांशी, व हिसार, ह्या शहरांवरून गागर नदीस नेला होता. त्याची बहुत दिवस अव्यवस्था झाली होती, परंतु इंग्रेज सरकारानें अलिकडे दागदुजी करून तो शेतकीच्या व व्यापाराच्या उपयोगीं पडावयाजोगा केला आहे.

२०. ग्यासुद्दीन तघलख ह्याचें आणि तो ज्याच्या आश्रयानें राजा झाला होता त्याचें भांडण होऊन पांच महिन्यांच्या आंत तो पदच्युत होऊन प्राणास मुकला.

२१. नंतर फिरूज ह्याचा दुसरा नातू अबूबकर ह्यानें एक वर्षपर्यंत राज्य केलें. इतक्यांत
१०४० त्याचा वडील चुलता नासरुद्दीन ह्यानें परत
१३८९. येऊन कितीएक वेळां उभयतांचे जय पराजय झाल्यावर अबूबकर ह्यास कैद करून नासरुद्दीन दुसऱ्यानें गादीवर बसला. त्यानें चार वर्षेपर्यंत राज्य

केलें. इतक्यांत गुजराथेमध्यें व यमुनेपलिकडे एक दोन बंडें झालीं व तीं मोडलीं गेलीं.

२२. नासरुद्दीनाचा पुत्र हुमायून हा बापाचे मागें गादीवर बसला, मग तो पंचेताळीस दिवसांनीं मरण पावल्यावर त्याचा भाऊ महमूद तघलख हा राज्य करूं लागला. तेव्हां तो वयानें लहान होता. त्याचा अप्रौढपणा, आणि राज्यांतील अव्यवस्था, ह्या दोन कारणांमुळें गुजराथ प्रांतांत मुजफरखान हा स्वतंत्र राजाप्रमाणें वागूं लागला. तशींच माळवा व खानदेश ह्या प्रांतांत बंडें झालीं, आणि जवानपूर एथें त्याच्या वजिरानें स्वतंत्र बादशाही स्थापिली.

२३. ह्या बादशाहाचे कारकिर्दींत तैमूरलंग म्हणून कोणी एक तुर्क सरदार ह्यानें रशिया देशापासून सिंधु नदापर्यंत देश जिंकून हिंदुस्थानावर स्वारी केली. त्यानें आपले जातीच्या स्वभावाप्रमाणें तुलंब, अजुदीन, भटणेर, सामान, इत्यादि शहरें जीं वाटेनें लागलीं तीं लुटून व जाळून तेथील लोकांस ठार मारिलें. ह्याप्रमाणें संहार करीत तो दिल्लीजवळ आला; आणि धरून आणलेले लोकांपैकीं तेथें त्यानें १९ वर्षांपेक्षां प्रौढ असे सुमारें एक लक्ष लोक ठार मारिले. दिल्लीच्या दरबारांत दुफळी पडून महमूद बादशाहाचे फौजेचा पराजय झाला, आणि ती शहरांत जाऊन राहिली; महमूद गुजराथेंत पळून गेला. त्यावेळेस तैमूर ह्यानें अभयवचन दिल्यावरून दिल्ली शहर तेथील किल्लेकऱ्यांनीं त्याच्या स्वाधीन केलें. तैमूर ह्यानें

ई० स० १३९८.

प्रसिद्धपणें हिंदुस्थानचा बादशाहा ही पदवी घेतली. पुढें बादशाहाच्या मनांत विश्वासघात करण्याचें असो, किंवा फौजेमध्यें बेकैद झाल्यामुळें असो, परंतु शहरामध्यें लूट आणि बलात्कार हीं चालू झालीं. त्यांचा प्रतिबंध करण्यास लोकांनीं शस्त्रें घेतलीं, ह्यामुळें फौजेस आवेश येऊन मोठी कत्तल चालली. रस्त्यांत प्रेतांच्या राशी पडल्यामुळें जाण्यास मार्ग नाहींसा झाला, आणि दरवाजे फोडून सर्व मोंगली फौज आंत शिरली. तिनें जो अनर्थ केला तो विस्तारें लिहिल्यावांचूनही ध्यानांत येईल.

२४. पांच दिवसपर्यंत शहर जळत होतें व लूट होत होती, ती तैमूर ह्यानें स्वस्थपणानें पाहिली. मग फौज जेव्हां मनुष्यांचे जीव घेतां घेतां कंटाळली, आणि लुटायास कांहीं राहिलें नाहीं, तेव्हां त्यानें परत जाण्यास कूच करण्याची आज्ञा केली. तो जाण्याच्या दिवशीं यमुनेच्या कांठीं फिरूजशाहा ह्याचे काश्मिरी दगडाचे मशिदींत निमाज पढला, आणि तेथून असंख्य द्रव्य आणि अगणित दासदासी घेऊन निघाला. तो भागीरथी उतरून पलिकडे पाहाडांतून जात असतां हिंदुलोकांशीं त्याला कितीएक वेळ लढाई करणें प्राप्त झालें. तेवेळेस तैमूर ह्याचें वय ६३ वर्षांचें असतां तो त्या लढायांत फार शौर्य करून आणि आपण जातीनें पराकाष्ठेचे श्रम सोसून शेवटीं आलेले वाटेनें तातार देशास निघून गेला.

इ० स० १३९८.

२५. तैमूर गेल्यावर दिल्लीमध्यें दोन महिनेपर्यंत

केवळ अंधाधुंदी होऊन अधिकाराविषयीं सरदार लोकांत कलह चालला; शेवटीं कोणी एक एकबाल नांवाचा सरदार ह्याच्या हातीं अधिकार आला. पुढें तो सरदार मेल्यावर बादशाहा जो गुजराथेंतून परत आला होता, तो फिरून गादीवर बसला, ती त्यानें मरेपर्यंत अनुभविली. इ० स० १४०५.

२६. महमूदाच्या मागें दौलतखान लोदी ह्यानें १५ महिनेपर्यंत राज्य केल्यावर त्यास पंजाबचा सुभेदार खिजरखान ह्यानें राज्यपदावरून काढून दिलें. इ० स० १४१२.

---

# प्रकरण ४.

## सय्यद व लोदीवंश.

### इ० स० १४१४ पासून १५२६ पर्यंत.

१. तघलेख वंशाचे समाप्तीनंतर २६ वर्षेंपर्यंत साऱ्या देशावर अधिकार चालावयाजोगा राज्याचा बंदोबस्त नव्हता. खिजरखान ह्यानें सात वर्षेंपर्यंत तैमूर हा धनी व आपण त्याचा सेवक अशा प्रकारानें राज्य केलें. त्यास दिल्ली घेतेवेळेस मुलूक अगदी थोडा मिळाला. आणि मुळींच पंजाब देशांत बंड झालें होतें तें, त्याच्या मागून सय्यद मुबारक, सय्यद महंमद, आणि सय्यद अल्लाउद्दीन, ह्या नांवांचे बादशाहा झाले, त्या तिघांच्याही राज्यांत केवळ मोडलें नाहीं. शेवटीं बादशाहाचा हुकूम राजधानी शहराच्या तटापासून पांच साहा कोसांबाहेर न चाले असें इ० स० १४५०.

होऊन अल्लाउद्दीन ह्यास अधिकार सोडून मुदाबून एथें जाण्याचें प्राप्त पडलें. त्यावेळेस बहिलोलखान लोदी नामें कोणीएक सरदार राजपद धारण करिता झाला.

२. बहिलोलखान लोदी ह्यानें पंजाबांत बखेडा झाला होता तेथें अमल बसवून, मुलतान प्रांतांतही स्वतंत्र अधिकार चालू झाला होता त्याचा बंदोबस्त करण्याचें आरंभिलें. इतक्यांत जवानपूर एथील मुसलमान राजानें दिल्लीवर हल्ला केल्यामुळें त्याशीं युद्धाचा आरंभ करणें प्राप्त झालें. तें युद्ध २६ वर्षेंपर्यंत चालून शेवटीं जवानपूर बादशाहाच्या स्वाधीन झालें. नंतर दाहा वर्षेंपर्यंत राज्य करून बहिलोलखान मरण पावला. त्यावेळीं पूर्वेस काशी, दक्षिणेस बुंदेलखंड, आणि उत्तरेस हिमालय, एथपर्यंत राज्याची सरहद्द होती.

इ० स० १४५२.
इ० स० १४७८.
इ० स० १४८८.

३. बहिलोलखान ह्याच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा शिकंदर हा गादीवर बसला. त्याच्या अधिकाराविषयीं विवाद करणारे त्याचे बंधु वगैरे कितीएक होते, त्यांस त्यानें क्षमा करून त्यांवर पहिल्याप्रमाणें प्रीति ठेविली, आणि राज्याचा बंदोबस्त न्यायानें आणि सावधपणानें राखिला, तसेंच पूर्वेसही बंगाल्यापर्यंत, व दक्षिणेस बुंदेलखंडापलीकडे कांहीं प्रदेशापर्यंत, राज्य घेतलें. परंतु ह्या बादशाहास धर्माभिमान बहुत होता, त्यामुळें त्यानें हिंदूंचीं बहुत देवालयें मोडून नदीतीरीं त्या लोकांस स्नानसंध्यादि कर्में करण्यास प्रतिबंध केला होता. कोणा एका प्रसंगीं एक ब्राह्मण कोणताही धर्म मनापासून आच-

रला असतां ईश्वरास मान्य होतो असें प्रसिद्धपणानें बोलतो, हें वर्तमान समजल्यावरून बादशाहानें त्यास बोलावून आणून बारा विद्वान् काजी ह्यांकरवीं त्याजबरोबर वाद करविला. शेवटीं तो आपलें म्हणणें न सोडी असें पाहून त्यास ठार मारिलें.

४. **शिकंदर** हा विद्वानाचा पक्षपाती व जात्या कवि होता, तो २८ वर्षें राज्य करून **आग्रा** एथें मृत्यु पावला. इ० स० १५१६.

५. शिकंदर ह्याचा मुलगा **इब्राहिम** ह्यानें गादीवर बसतांच आपणाशीं विरोध करणारे असे जे प्रांतांतील सुभेदार, आणि इतर संभावित मनुष्य होते, त्यांस ठार मारिलें. कितीएकांस केवळ संशयामुळें कैदेंत ठेविलें, आणि आपल्या भावांतून एकाचा प्राण घेतला, बाकीच्यांस प्रतिबंधांत ठेविलें. अशा क्रूर कर्मामुळें **इब्राहिम** हा सर्वांच्या मनांतून उतरला.

६. त्यावेळीं तैमूर ह्याचा वंशज **बाबर**, **काबूल** एथें राज्य करीत होता. त्यानें पूर्वीं एकवेळ **पंजाब**प्रांतावर स्वारी केलीच होती. त्यास **दौलतखान** म्हणून लाहोरचा सुभेदार ह्यानें आपलें संरक्षण व्हावयाकरितां पुनः **पंजाबांत** येण्याविषयीं सांगून पाठविलें. ही गोष्ट दुसऱ्या सरदारांस न आवडून त्यांनीं सुभेदारास पिटून लावून बाबराशीं युद्ध करण्याची तयारी केली. तेवेळीं **बाबर** ह्यानें **हिंदुस्थानांत** येऊन लाहोरच्या लोकांचा पराजय केला, आणि तें शहर जाळून भस्म केलें. **बाबर** ह्यास **दौलतखाना**- इ० स० १५२४.

विषयीं संशय उत्पन्न झाला असतांही त्यानें त्यास व त्याच्या मुलास जाहागीर दिली. तथापि त्यानें हा उपकार न स्मरून बाबर ह्याचा ठेवणाईत पंजाबचा सुभेदार अल्लाउद्दीन ह्यास लौकरच काढून दिलें. पुढें अल्लाउद्दीन बाबराच्या आज्ञेनें ४०,००० फौज घेऊन हिंदुस्थानांत आला. त्याची व इब्राहिमाची लढाई दिल्लीजवळ झाली, तींत अल्लाउद्दीन पराभव पावला. मागून बाबरही १२००० लोकांसहित पंजाबांत आला; तेव्हां दौलतखान त्यास शरण गेला. पुढें बाबर हिंदुस्थानांत पोहोंचल्यावर त्यावर एक लक्ष फौज व हजार हत्ती इतक्यांसहित इब्राहिम गेला असतां उभयतांची पानिपताजवळ लढाई होऊन इब्राहिम ह्याच्या फौजेंतलि पंधरा सोळा हजार लोक मरण पावले, व इब्राहिम हाही समरांगणीं पडला. नंतर बाबर हा दिल्ली आणि आग्रा हीं शहरें हस्तगत करून राज्याधिकारी झाला.

इ० स० १५२६.

# प्रकरण ५.

## मोंगली* वंश.

### इ० स० १५२६ पासून १५३० पर्यंत.

१. बाबर हा तैमूरलंग ह्यापासून साहावा पुरुष. हा लहानपणीं अनेक अडचणी भोगून व अनेक वेळ जय पराजय अनुभवून शेवटीं समरकंद व बुखारा, ह्या प्रांतांचें स्वामित्व पावला; परंतु पुढें तीन वर्षांनीं त्याचें तें राज्य सर्व जाऊन बल्क प्रांत मात्र राहिला. इ० स० १५११.

२. वर लिहिल्याप्रमाणें हिंदुस्थानचें राजपद त्यास मिळाल्यावर एक वर्षाच्या आंत धोलपूर ग्वाल्हेरी वगैरे प्रांत त्याच्या स्वाधीन झाले. जवानपूर एथील संस्थान त्याचा मुलगा हुमायूद ह्यानें घेतलें, आणि मारवाड व जयपूर, एथील रजपूत राजांचा प्रमुख, मेवाडचा राजा, संग, ह्यावर स्वारी करून बाबर त्याचा पराजय करिता झाला. त्यावेळेस नेवातचा राजा हसनखान व दुसरे मोठे सरदार पडले. पुढील वर्षी बाबरानें चांदेरी एथील रजपूत संस्थानी मेदिनीराय ह्यावर स्वारी करून चांदेरी घेतली. तेवेळीं किल्लेकरी इ० स० १५१४. इ० स० १५२७.

---

* मुसलमान वास्तविक ज्यांस मोंगल म्हणत त्यांचा बाबर ह्यास फार तिरस्कार असे आणि तो तुर्की भाषा बोलत असे; परंतु त्याचे पूर्वज मोंगल होते, आणि हिंदुस्थानचे लोक इराणाकडील सर्व मुसलमानांस मोंगल म्हणतात, म्हणून बाबराच्या वंशास मोंगली वंश असें नांव पडलें.

आपल्या सर्व नायकांस ठार मारून मोठ्या आवेशानें बाहेर येऊन तटावरून मुसलमान चढत होते त्यांस काढून देऊन युद्ध करीत असतां शौर्यानें मरण पावले. तसेच आंत दोन तीनशें लोक जे मेदिनीरायाच्या वाड्याच्या रखवालीकरितां राहिले होते, तेही, मी पूर्वी मरेन, मी पूर्वी मरेन, असें म्हणत म्हणत, कितीएक आपल्या हातानें, किती एक परस्परांच्या हातांनीं असे मरण पावले. अशीं शौर्याचीं उदाहरणें रजपुतांच्या इतिहासांत बहुत आहेत.

इ० स० १५२८.

३. नंतर बाबर ह्यानें भागीरथीच्या दक्षिणेकडील बहार प्रांत सर्व जिंकिला; आणि बंगाल्यावर स्वारी करून तेथील राजा अनुकूळ करून घेतला. पुढें कितीएक महिनेपर्यंत त्यांची प्रकृति क्षीण होत चालली आणि शेवटीं त्याचा वजीर, खलीफा, ह्यानें आपल्या जांवयास पुढें राज्याधिकार देण्याच्या मतलबानें बादशाहाजवळ कोणी जाऊं येऊं नये, असा बंदोबस्त केला. त्यास फार दिवस न झाले इतक्यांत बाबर आग्रा एथें मरण पावला. त्यावेळेस त्याच्या वयास ५० वर्षें होतीं. त्याचें प्रेत त्यानें सांगून ठेविल्याप्रमाणें काबूल एथें नेऊन पुरलें. तेथें त्याच्या कबरेच्या दर्शनास गांवचे लोक सणावाराच्या दिवसीं अद्यापि जात असतात.

इ० स० १५३० डिसेंबर २६.

४. बाबर ह्यानें प्रथम दिल्ली प्रांत घेतला, त्यावेळेस बहुत लोक मेले खरे; आणि त्याची त्यावेळेस फौज कमी होती त्यामुळें त्यास समयविशेषीं कठोरपणा

करावा लागे, परंतु त्याचा मूळचा स्वभाव निर्दय नव्हता, त्यानें आपल्या जन्मकर्माचा वृत्तांत तुर्की भाषेत आपण लिहिला आहे. त्या ग्रंथाची शैली सुबोध आणि सरळ असून त्यामध्यें त्यानें जे जे देश किंवा लोक किंवा पदार्थ आपण पाहिले त्यांच्या स्थिति रीति ह्यांचें यथातथ्य निरूपण केलें आहे. त्यावरून पाहिलें असतां शेवट-पर्यंत त्याची प्रीति त्याचा देश व त्याचीं कुटुंबाचीं माणसें आणि स्नेही ह्यांवर पहिल्याप्रमाणें होती. आणि राज्याच्या मोठ्या वडामोडींमध्येंही त्यांजकडे त्याचें लक्ष होतें, असें दिसतें.

५. त्याचें सर्व आयुष्य युद्धाचे खटपटींमध्यें गेलें, त्यामुळें त्यास कधींही विश्रांति झाली नाहीं. त्याच्या मागें इतकी खटपट असे कीं त्यानें अकरा वर्षांपासून रमजानाचीं दोन उपोषणें कधीं एका ठिकाणीं केलीं नाहींत. युद्धाच्या खटपटींतून सांपडलेल्या अवकाशामध्यें तो शिकारीचा वगैरे उद्योग करीत असे. त्याचें शरीर इतकें सुदृढ होतें कीं, त्याची प्रकृति क्षीण होऊं लागल्यावरही तो एकवेळ काल्पीहून आग्र्यास, म्हणजे सुमारें ८० कोश, घोड्यावर बसून दोन दिवसांत गेला, आणि वाटेनें भागीरथी पोंहून उतरला. शरीराप्रमाणें त्याचें मनही सर्वकाळ व्यासंगांत गुंतलें असे. पाण्याचे नळ, तलाव वगैरे बांधणें, दूरदेशींचीं झाडें व पदार्थ उत्पन्न करणें, इत्यादिकांकडे नेहमीं त्याचें लक्ष असे. आणि इतकेंही करून त्यास फारसी व तुर्की ह्या भाषेंत काव्यें करण्यास वेळ मिळत असे.

# प्रकरण ६.

## हुमायून.

इ० स० १५३० पासून १५५६ पर्यंत.

१. बाबर ह्यास मुलगे चार होते त्यांचीं नांवें, हुमायून, कामरान, हिंदाल, आणि मिर्झा अस्करी, अशीं होतीं. ह्यांतून कामरान ह्याकडे काबूल व कंदहार ह्या सुभ्यांचें काम होतें, तेच प्रांत हुमायून ह्यानें त्याचे स्वाधीन केले. संबळचा सुभा हिंदाल ह्यास सांगितला, आणि मेवात प्रांत मिर्झा अस्करी ह्याच्या स्वाधीन करून बाकीचें राज्य हुमायून आपण करूं लागला.

इ० स० १५३०.

२. जवानपूर एथें आफगाण लोकांनीं बंड केलें होतें, तें मोडून आणि शीरखान नामेंकरून एक सरदार चुनारगड किल्ला घेऊन बसला होता; त्यास वशकरून, गुजराथचा अधिकारी बाहादुरशाहा ह्याजवर हुमायून स्वारी करिता झाला.

इ० स० १५३२.

३. ही स्वारी करण्याचें कारण असें होतें कीं, हुमायून ह्याचा एक फितूरखोर मेहुणा बाहादुरशाहा ह्याच्या आश्रयास जाऊन राहिला होता, त्यास तो स्वाधीन करीना; आणि खानदेश, वराड व नगर एथील राज्यांवर आपला श्रेष्ठपणा स्थापून पूर्वींच्या राजवंशांतील अल्लाउद्दीन लोदी, ह्यास आपलें राज्य परत घेण्याकरितां द्रव्य आणि फौज ह्यांची त्यानें कुमक केली होती.

४. वर सांगितलेला लोदी ह्याचे फौजेचा पराजय

आग्रा एथें करून हुमायून दक्षिणेकडेस
इ० स० १५३४. आला. त्या वेळेस बाहादुरशाहा मंडलेश्वर एथें त्याशीं युद्ध करण्याकरितां छावणींत सिद्ध होता, त्या छावणीसभोंवता खंदक होता, परंतु अन्नपाण्याचा तोटा पडल्यामुळें त्याचा उपाय चालेना. असें होऊन तो फार थोड्या लोकांसहित रात्रीस पळून गेला. तो चंपानेराचे वाटेनें खंबायतेस येऊन दिव एथें निघून गेला. तो पळतांच त्याचे फैजेची वाताहत झाली, आणि पुढें हुमायून ह्यानें चंपानेर किल्ला घेऊन साऱ्या गुजराथ प्रांतांत आपला अमल बसविला. नंतर तेथें आपला भाऊ मिर्झा अस्करी ह्यास अधिकारी करून ठेवून हुमायून परत आग्रा शहरास गेला.

५. पुढें लौकरच त्यानें ठेविलेल्या लोकांत अव्यवस्था होऊन बाहादुरशाहा ह्यास गुजराथ व मा-
इ० स० १५३६ ळवा हे प्रांत परत घेण्यास संधि सांपडली.

६. हुमायून आग्र्यास फार दिवस न राहातां, बंगाला व बहार हे प्रांत शीरखान नामें कोणी सरदार घेऊन बसला होता त्याच्या पारिपत्याकरितां निघाला; तो चुनारचा किल्ला घेऊन गौड शहरापर्यंत मुलूक हस्तगत करीत गेला; परंतु पर्जन्यकाळामुळें लढाई तहकूब होऊन त्याची फौज त्यास सोडून देऊं लागली. त्याचा भाऊ हिंदाल, हा बहार प्रांताच्या उत्तरेस कामावर होता, तो तेथून निघून गेला. नंतर शीरखान ह्यानें कनोजपर्यंत ठाणीं बसविलीं असें पाहून हुमायून आग्र्यास परत येण्यास निघाला; वाटेनें शत्रूच्या

फौजेनें मोनगीर एथें पराजय केला. पुढें जवानपूर एथून शीरखानानें एकाएकीं येऊन बकसर एथें त्यास गांठलें. तेव्हांपासून सुमारें दोन महिनेपर्यंत त्या दोघांचीं सैन्यें गंगेच्या कांठीं छावणी करून व भोंवतालीं खंदक खणून तशींच राहिलीं होतीं. शेवटीं एके दिवशीं रात्रीस शीरखान ह्यानें अकस्मात् बादशाहाचे फौजेवर हल्ला करून ती सर्व अस्ताव्यस्त केली. त्यावेळीं हुमायून एकटा घोड्यावर बसून मोठ्या आयासानें नदींतून पोंहत जात असतां त्याचा घोडा बुडून तो मोठ्या संकटानें एका पखालजीच्या मदतीनें पार पडला. तो थोड्या लोकांसहित काल्पीस जाऊन तेथून आग्र्यास जाता झाला. त्या गडबडींत त्याची राणी शत्रूंच्या हातीं सांपडली, परंतु शीरखान ह्यानें तिचा बहुमान करून तिला लौकर निर्भयस्थानीं नेऊन पोहोंचविलें. हा अनर्थ सन १५३९ जून महिन्याचे २६ वे तारिखेस झाला. त्याच्या पूर्वींच शीरखान आपणास बादशहा म्हणवावयास लागला होता.

७. अशा अडचणीच्या संधीस बादशाहाचा भाऊ हिंदाल ह्यानें एक बंड माजविलें, व त्याचा दुसरा भाऊ कामरान हाही आपला मतलब साधण्याकरितां काबुलाहून आला. परंतु बादशाहा परत आल्यावर त्या तिघां भावांचें एक मत होऊन तो शत्रूवर पुनः जाण्याकरितां तयारीच्या उद्योगास लागला.

८. ही तयारी होण्यास आठ नऊ महिने लागले.

इ० स० १५४० मे ता० १६. शेवटीं **कामरान** ह्यानें **लाहोरास** जातेवेळेस ३००० लोक बादशाहाचे कुमकेस दिले, ते घेऊन बादशाहाची स्वारी निघाली. त्याची आणि **शीरशाहा** ह्याची **कनोज** शहराजवळ गांठ पडली, तेवेळीं आपल्या फौजेंतील सरदार शत्रूंकडे निघून जाऊं लागले, असें पाहून बादशाहानें नांवांच्या पुलावरून उतरून युद्धप्रसंग केला. त्यामध्यें बादशाहाचा केवळ मोड झाला, आणि तो एकटा हत्तीवर बसून नदी उतरला, आणि पलीकडल्या कांठीं दोन शिपाई होते, त्यांनीं पागोट्याचा एक पदर त्याजकडे टाकून दिला, तो धरून मोठ्या प्रयासानें तिकडच्या तीरास चढून गेला. पुढें त्याचे बंधु, **हिंदाल** व **मिर्झा अस्करी** हे दोघे कांहीं थोड्या सैन्यासहित येऊन त्यास मिळाले. त्यांस व कांहीं खजिना व बायका ह्यांस घेऊन तो **दिल्लीच्या मार्गानें लाहोरास** गेला, परंतु तेथें त्याचा भाऊ **कामरान** हा त्यास कांहीं आश्रय नदेतां उलटा शत्रूंशीं तह करून, त्यांस पंजाब प्रांत देऊन आपण **काबुलास** निघून गेला.

९. ह्या प्रकारें सर्व आशा कुंठित झाल्यावर बादशाहा ह्यानें दीड वर्षपर्यंत सिंध घेण्यासाठीं प्रयत्न केला. तो निष्फळ झाल्यावर तो **जोदपूर** एथील राजाचा आश्रय मिळण्याकरितां तेथें गेला. परंतु त्या राजाचें लक्ष्य आपणाविषयीं प्रतिकूळ जाणून तेथून अन्नपाणी मिळण्यास परम संकट अशा वाटेनें कितीएक दिवसपर्यंत मजला करून व

इ० स० १५४३.

फार श्रम पावून शेवटीं तो अमरकोटास पोंहचला. तेथील राजा राणाप्रसाद ह्याच्या मदतीनें पंधरा हजार फौजेसहित त्यानें सिंधेवर दुसऱ्यानें हल्ला केला. परंतु तोही सिद्धीस न जातां त्यास येथून चाळीस पन्नास लोकांसहित कंदहाराच्या वाटेनें इराणास पोहोंचण्यास मोठा प्रयास पडला.

१०. हुमायून दुसऱ्या लढाईकरितां सिंध प्रांताकडे निघाल्यावर मागें दुसऱ्या दिवशीं त्याची राणी, हमीदा, ही अकबर नामें पुत्र प्रसवली. तें वर्तमान बादशाहास समजलें तेव्हेळीं आपणाजवळ दुसरें कांहीं द्यावयास नाहीं, असें पाहून त्यानें एक कस्तूरीची कुपी उघडून ती कस्तूरी जवळच्या मंडळीस वांटली, आणि म्हटलें कीं, ह्या मुलाची कीर्ति ह्या कस्तूरीच्या सुगंधाप्रमाणें प्रसृत होवो.

११. हा मुलगा पुढें लौकरच कंदहार एथील अधिकारी मिर्झा अस्करी ह्याच्या हातीं सांपडला, त्याला त्यानें प्रतिबंधांत ठेविलें. त्याचा बेत हुमायून ह्यास धरावयाचा होता, परंतु तो साधला नाहीं.

१२. हुमायून राज्य सोडून गेल्यावर त्याचा शत्रु शीरशाहा ह्यानें सर्व राज्य लागलेंच हस्तगत केलें, आणि दुसऱ्या वर्षी माळवा प्रांत घेतला. नंतर त्यानें ८०००० सैन्य बरोबर घेऊन जोदपूरचा राजा, माळवदेव, ह्यावर हल्ला केला. परंतु त्या राजावर ह्याचा पराक्रम व फितूर ह्यांचा उपाय चालला नाहीं. तेथून परत आल्यावर त्यानें चितूर घेतलें व कालिंजरास वेढा दिला, तेथें तो मोर्चे

इ० स० १५४२.

बांधण्याच्या तयारींत असतां एके दिवशीं त्याच्या दारूखा-न्यावर तोफेचा गोळा पडून त्याचें आंग भाजलें, तेणें-करून तो कांहीं वेळानें मरण पावला.

१३. हा शीरशाहा शाहाणा आणि पराक्रमी होता. त्यानें बंगाल्यापासून सिंधु नदापर्यंत मोठा रस्ता केला; आणि त्यावर जागोजागीं धर्मशाळा व विहिरी बां-धिल्या, झाडें लाविलीं, व अन्नसत्रें घातलीं. परंतु लो-भापुढें तो समय विशेषीं न्याय अन्याय पाहत नसे. रायसिन एथील किल्लेकरी लोक त्यानें आपणास सुरक्षित जाऊं द्यावें अशा करारानें शस्त्रें ठेवून बाहेर निघाले असतां त्यानें विश्वासघात करून निष्कारण त्यांचे प्राण घेतले.

१४. ह्या बादशाहाची कबर सहसिराम एथें एके तलावाच्या मध्यभागीं आहे.

१५. शीरशाहा मेल्यानंतर त्याचा वडील मुलगा अदिलखान ह्यास राज्य करण्याचें सामर्थ्य
इ० स० १५५३. नाहीं असें पाहून सरदार लोकांनीं त्याचा धाकटा भाऊ जलालुद्दीन ह्यास सलिमशाहा असा किताब देऊन राज्यावर बसविलें. त्याच्या वडीलभावास परत आणण्याविषयीं एक दोन बंडें झालीं तीं मोडण्याचें व त्या बंडांत सामील होते त्या लोकांचें पारिपत्य करण्याचें त्यास प्राप्त झालें. हा राजा नऊ वर्षें राज्य करून मरण पावला. ह्यानें दिल्लीच्या राजमहालाचा एक चौक बांधला. ह्या बादशाहाचे वेळेस कोणीएक शेख अलाई म्हणून नवीन मताचा स्थापणारा झाला. सर्व दुराचारी

लोकांस ठार मारण्यास आपणास अधिकार आहे असें त्याचे शिष्य प्रसिद्धपणें बोलूं लागले; त्याकाळीं आपल्या दरबारांतील मुल्लयांच्या आग्रहामुळें त्या शेखास मरेपर्यंत कोरड्यांचा मार देण्यास बादशाहानें आज्ञा केली. त्यांत तिसऱ्या कोरड्यास त्याचा प्राण गेला.

१६. सलीमशाहा मेला तेव्हेळीं त्याचा मुलगा बारा वर्षांचा होता; त्यास सलीम ह्याचा
इ० स० १५५६ नोवेंबर ता० ५. भाऊ महंमद शाहासूर आदिली ह्यानें मारून आपण तीन वर्षें राज्य केलें. त्यामध्यें अतिशयित उधळेपणा करून खजीना रिकामा केला, आणि मोठमोठ्या सरदारांच्या जाहागिरी परत घेऊन आपल्या प्रितींतील अयोग्य जनांस देण्यास आरंभ केला. त्यामुळें सर्वत्र बंडें होऊन, दिल्ली व आग्रा हे प्रांत प्रथम त्याच्या घराण्यांतील इब्राहिम ह्यानें हस्तगत करून घेतले. नंतर त्यापासून त्याचा चुलतबंधु शिकंदर ह्यानें ते घेतल्यामुळें महंमदशाहा पूर्वेकडील प्रांतांत जाऊन राहिला होता, त्यावर इब्राहिम ह्यानें स्वारी केली. तेथें बादशाहाचा वजीर हेमू ह्यानें त्याचा पराजय केला. इतक्यामध्यें बंगाल्यांत व माळव्यांत बंडें झालीं, त्यांचा बंदोबस्त झाला नाहीं, तों हुमायून ह्यानें परत येऊन दिल्ली व आग्रा हीं हस्तगत करून घेतलीं. त्याजवर हेमू स्वारी करीत असतां हुमायून बादशाहा मृत्यु पावला, आणि अकबर गादीवर बसला. त्या संधीस हेमू ह्यानें आग्रा व दिल्ली हीं परत घेऊन अकबराच्या लष्करावर स्वारी केली. त्याची आणि अकबराचा वजीर बहिरा-

मखान ह्याची पानिपत एथें लढाई होऊन हेमू ह्याचा पराजय झाला, आणि तो कैदेंत सांपडला. पुढें लौकरच महंमद आदिली हा बंगाल्यांतील एका बंडवाल्याशीं युद्ध करीत असतां लढाईंत पडून मृत्यु पावला.

१७. हुमायून इराणांत पळून गेला म्हणून वर सांगितलें; तेथें तो दोन तीन वर्षेंपर्यंत राहिला. तेथील बादशाहा तमस्प, ह्यानें चौदा हजार स्वार त्याच्या स्वाधीन केले, त्यांसहित कंदाहारावर स्वारी करून तें शहर त्यानें आपला भाऊ मिर्झा अस्करी ह्याजपासून घेतलें, आणि तें कबूल केल्याप्रमाणें इराणाच्या बादशाहाचा मुलगा मुराद मिर्झा ह्यास काहीं वेळपर्यंत दिल्यासारिखें केलें. शेवटीं तो मेल्यावर हुमायून ह्यानें इराणी लोकांतून बहुतांस मारिलें व बाकीच्यांस परत त्यांच्या देशीं जाऊं दिलें. नंतर त्याचा भाऊ कामरान ह्याच्या स्वाधीन काबुलप्रांत व त्याचीं मुलें माणसें होतीं, त्यांशीं सुमारें साहा वर्षेंपर्यंत युद्ध करून कितीएक वेळ काबूल प्रांत हस्तगत करून व कितीएक वेळ तो गमावून शेवटीं त्यानें कामरान ह्यास धरून त्याचे डोळे काढिले. नंतर तो कामरान मक्केचे यात्रेस गेला, तेथें तो लौकरच मरण पावला. इकडे हुमायून पंधरा हजार स्वारांसहित जाऊन पंजाब, दिल्ली व आग्रा हे प्रांत हस्तगत करून पुढें उद्योग चालवीत आहे, इतक्यांत जिन्यावरून पडून तो मरण पावला. तो राज्यांतून १६ वर्षेंपर्यंत परागंदा होता, त्यासुद्धां त्यानें २६ वर्षें राज्य केलें. इ० स० १५५६.

# प्रकरण ७.

## अकबर ह्याचे वेळेस हिंदुस्थानांत स्वतंत्र राज्यें होतीं त्याविषयींचें वर्तमान.

१. **महंमद तघलख** ह्याचेवेळेस **हसनगंगू** ह्यानें दक्षिणेंत ब्राह्मणी राज्य स्थापिलें, तें तेरा पिढ्यांपावेतों, म्हणजे १७१ वर्षेंपावेतों, त्याच्या वंशांत चाललें. पुढें त्या राज्यांतील सरदार **युसुफ आदिल** ह्यानें **विजापूर** एथें **आदिलशाहीनामाचें** राज्य स्थापिलें. तसाच **अहंमदनगर** एथें **अहंमद निजामशाहा** ह्यानें निजामशाहीचा पाया घातला. **कुतुबशाहा** ह्यानें **गोंवळकोंडें** एथें कुतुबशाही राज्य छापिलें; आणि **अमीरबरीद** हा **बेदर** एथें राजा असें पद धरून बरीदशाहीचा मूळ पुरुष झाला. ह्यांतून **विजापूरच्या** मुसलमान राजांनीं **तालिकोटाजवळ** कृष्णेच्या कांठीं मोठ्या लढाईमध्यें **विजयनगरच्या रामराजाचे** फौजेचा पराजय करून त्याला धरून ठार मारिलें; परंतु **तुंगभद्रेचे** दक्षिणेचा बहुतकरून सर्व मुलूख त्याच्या राज्याखालीं होता, तो मुसलमानांचे परस्पर स्पर्द्धेमुळें विजापूरकरांस प्राप्त झाला नाहीं. तेथें लहान लहान जमीदार व पाळेगार लोक सत्ता करूं लागले. **गोंवळकोंड्याच्या** बादशाहानें **वरंगूळ** हस्तगत करून घेऊन **तैलंगण** व **पेनार** नदीपर्यंत **करनाटक** इतका मुलूख जिंकिला.

२. **गुजराथेंतील** बादशाहीचीही **अहमद तघलख** ह्याचे वेळेसच स्थापना झाली. ह्या राज्यांतील मुलूख

लहान असून त्याच्या सभोंवार डोंगर आणि रानें होतीं, आणि त्यांत लुटारू लोकांची वस्ती होती. **गुजराथच्या** राजांत जे मोठे पराक्रमी झाले, त्यांनीं **मेवाडच्या** रजपूत संस्थान्यांचा कितीएक वेळां पराजय करून त्यांची राजधानी **चितूर** हें घेतलें; **खानदेश**, **अहंमदनगर**, व **वराड**, एथील राजांवर खंडणी बसविली; एक दोन वेळ **सिंधुनदाच्या** पलीकडे आपली फौज नेली; पोर्टुगीस लोकांशीं समुद्रामध्यें युद्धें केलीं; आणि **माळव्याच्या** राजांचा एक दोन वेळ पराजय करून शेवटीं तें राज्य घेतलें.

३. ह्याशिवाय **खानदेश**, **बंगाला**, **जवानपूर**, **सिंध** व **मुलतान** ह्या प्रांतांत मुसलमानांचीं वेगळीं वेगळीं स्वतंत्र राज्यें होतीं.

४. तसेच त्यावेळेस **राजस्थानामध्यें** रजपूत संस्थानी राज्य करीत होते, त्यांचीं नांवें—१ उदेपूरचा राणा ह्याच्या वंशाचा मूळपुरुष **राम.** ह्या वंशांतील कोणी **अयोध्येहून** येऊन **गुजराथेंत** राहिला, अशी दंतकथा आहे. पुढें **गुजराथेंतून** निघून **ईदर** एथें प्रथम कांहीं काळपर्यंत राज्य करून, पुढें ह्या वंशांतील राजे **चितुरास** आपली राजधानी स्थापून, इसवी सन १३०० पासून विशेष प्रख्यात होऊं लागले. ह्या वंशांतील राजांनीं **अल्लाउद्दीन** व **बाबर** ह्यांच्यावेळेस पराक्रम केले. तेव्हां जरी त्यांचा पराजय झाला, आणि ते **दिल्लीच्या** बादशाहास कर देऊं लागले, तरी **अकबर** राज्य करूं लागला ते वेळीं ते स्वतंत्रपणानें वागत होते. ह्या वंशास पूर्वीं घेलोटी असें म्हणत असत, पुढें **ससोदी**,

असें म्हणूं लागले. २ रजपूत वंश राहटोर ह्या नांवें करून जोदपूर एथें राज्य करीत होता. ह्यांतील पुरुष पूर्वीं कनोज एथें राज्य करीत असतां इ० स० ११९४ च्या पूर्वीं शाहाबुद्दीन ह्यानें तें राज्य जिंकून घेतलें. तेवेळीं राजकुळांतील कोणीएक मनुष्य मारवाडांत येऊन तेथील जुने राहणारे जाट लोक ह्यांस वश करून घेऊन तेथें राज्य करूं लागला. जोदपूरचा राजा मालवदेव ह्यानें पूर्वीं शीरशाहा ह्याजबरोबर युद्ध केलें म्हणून लिहिलें, तो मालवदेव, अकबर सिंहासनारूढ झाला तेवेळीं जिवंत होता. ३. ह्याच राहटोर वंशांतील कोणी एका पुरुषानें इ०स० १४५९ मध्यें बिकानीर एथें स्वतंत्र राज्य स्थापिलें. ४ भाटी ह्या नांवाचा तिसरा रजपूतवंश जसलमीर एथें राज्य करीत होता. ह्या वंशाची उत्पत्ति कृष्णापासून असें राजावळींत आहे; परंतु इ० स० ७३१ च्या सुमारें हे राजे सिंधुनदाच्या जवळ तानोत एथें राज्य करूं लागले, तेव्हांपासून मात्र त्यांची वंशावळ सविस्तर लिहिली आहे. त्यांनीं इ० स० ११५६ त आपली राजधानी जसलमीर एथें नेली. त्यांचा आणि मुसलमानांचा युद्धप्रसंग अकबराच्या कारकिर्दीच्या पूर्वीं कधीं विशेष झाला नव्हता. ५ जयपूर एथील कच्च वंशाचे राजे पूर्वीं अजमिराखालचे मांडलिक असे वागत होते. त्यांच्या वंशांतील एका राजाच्या मुलीशीं अकबर लग्न करीपर्यंत तो वंश प्रख्यात नव्हता. ६ हारावती एथील हार वंशाचे राजेही पूर्वीं अजमिराखालचे मांडलिक,

त्यांनीं इ० स० १३४२ मध्यें बुंदी हें शहर आपली राजधानी केली. हे राजे उदेपूरच्या दरबारास कांहीं कर वगैरे देत असत. त्यांस हुमायुनाच्या कारकिर्दींत रतनभोर हा किल्ला मिळाल्यापासून ते योग्यतेस पावले. ७ शिवाय, पार्कर एथील चव्हाण, व अमरकोटचे सोदराजे, हे मारवाडच्या वैराण प्रांतापलीकडे असल्यामुळें त्यांस कोणी मुसलमान उपद्रव करीत नसत; परंतु शिरोही, झालोर, वगैरे संस्थानें अजमीर व गुजराथ ह्यांच्यामध्यें होतीं, ह्या कारणामुळें त्यांवर ते वारंवार हल्ले करून खंडणी घेत असत. ८ तसेंच पूर्वेकडील मेवात, ग्वालेर, नारवाड, चांदेरी इत्यादि जागच्या राजांस बाबर व शेरशाहा ह्यांचे वेळेपासून दिल्लीच्या दरबाराकडेस खंडणी द्यावी लागत असे, परंतु काश्मीरापासून बंगाल सरहद्दीपावेतों हिमालयांतील संस्थानें पूर्वींपासून स्वतंत्र होतीं.

---

# प्रकरण ८.

## अकबर बादशाहा.

### इ० स० १५५६ पासून १५९२ पर्यंत.

१. अकबराचा बाप मेला त्यावेळीं अकबर तेरा वर्षें चार महिने इतक्या वयाचा होता. असें असतां, पूर्वीं सांगितल्याप्रमाणें सुलतान आदिली ह्याचा सरदार

हेमू ह्यास जिंकून कैदी करून जेव्हां त्याच्या पुढें आणिलें, आणि त्याचा वजीर बहिरामखान ह्यानें हा धर्मबाह्य आपला शत्रु ह्यास स्वहस्तानें मारून गाजी असा किताब मिळवावा असा त्यास आग्रह केला, तेव्हां युद्धांत जखमी झालेल्या शत्रूवर मी प्रहार करणार नाहीं, असें अकबर धैर्यानें म्हणाला. तेवेळीं बहिरामानें संतापून स्वतः हेमूचा शिरच्छेद केला.

२. पूर्वींच्या राजवंशांतील शिकंदरसूर हा कांहीं दिवसपर्यंत मानकोट एथें ठाणें घालून होता. पुढें उपाय चालेना असें झाल्यामुळें बादशाहास शरण जाऊन बंगाल्यांत निघून गेला, आणि दिल्लीच्या सभोंवतालचा प्रांत व पंजाब हे दोनही बादशाहाच्या स्वाधीन झाले. परंतु राज्याचा सर्व अधिकार बहिरामखान हा चालवीत असे, व तो अकबराचा वारंवार अपमान करीत असे. त्यानें बाबराचा सोबती व हुमायून ह्यास फार उपयोगीं पडलेला असा तरदीबेग, दिल्लीचा माजी सुभेदार, ह्यानें तेथील ठाणें शत्रूच्या हातीं लागूं दिलें, असें त्यावर निमित्त ठेवून, बादशाहास नकळवितां त्यास ठार मारिलें. दुसऱ्या एका मानकऱ्यास कांहीं लहानशा अपराधावरून तीच शिक्षा केली. बादशाहाचा गुरु पीरमहंमद ह्यास ती शिक्षा माफ करून त्यानें मक्केच्या यात्रेच्या निमित्तानें बाहेर काढून दिलें. आणखीही बहुत प्रकारें अकबराचा अपमान केला, आणि तो त्याचा हुकूम कांहीं चालूं देईना. ह्या कारणास्तव अकबरानें शिकारीस गेल्याचें निमित्त करून अकस्मात् परत

येऊन जाहीरनामा लाविला कीं आजपासून माझें मी राज्य चालविणार, प्रजांनीं माझ्यावांचून कोणाची आज्ञा मानूं नये.

३. तेव्हां बहिरामाचे डोळे उघडून बादशाहाची कृपा आपणास पुनः प्राप्त होणार नाहीं असा त्याचा निश्चय झाल्यावर तो मक्केचे यात्रेच्या हेतूनें गुजराथेकडेस गेला, आणि नागोराहून बावटे, नगारे वगैरे सर्व राजचिन्हें बादशाहाकडे पाठवून एकटा पुढें चालला; परंतु पुनः त्याची बुद्धि फिरली, आणि त्यानें मोठें सैन्य जमवून पंजाबावर हल्ला केला. त्यापासून कांहीं निष्पन्न न होतां अकबरानें पाठविलेले एके टोळीनें त्याचा पराजय करून त्यास धरून हुजूर आणिलें. तेवळीं त्यानें पूर्वीं आपल्या बापावर केलेले उपकार स्मरून अकबरानें तो येऊन पायां पडला तेव्हां त्यास आपल्या हातानें उठवून पोषाक देऊन कोणत्या एका सुभ्याचें काम करावें, किंवा दरबारांत मोठ्या अधिकारावर राहावें, अथवा मक्केस जावें, ह्या तिहींतून जें उचित वाटेल तें करावें अशी परवानगी दिली. त्याप्रमाणें मक्केस जाण्याकरितां तो निघून गुजराथेकडे जात असतां त्यानें पूर्वीं लढाईंत मारलेल्या कोणी एका अफगाणाच्या मुलानें येऊन त्याचा प्राण घेतला.

इ० स० १५६०

४. वर लिहिलेल्या चार वर्षांच्या आंत, अजमीर व ग्वालेर हीं राज्यें युद्धावांचून अकबराच्या स्वाधीन झालीं, आणि त्यानें लखनौ एथून व भागीरथीच्या

कांठावरील प्रांतांतून अफगाण लोकांस काढून देऊन जवानपुरापर्यंत घालविलें.

५. पुढें खानजमान म्हणून कोणी सरदार ह्यानें बंड केलें, आणि माळवा प्रांतांत पूर्वींचा अफगाण अधिकारि बाजबाहादूर, ह्याच्या बंदोबस्ताकरितां पाठविलेला अबदुल्लाखान, हा निघून जाऊन गुजराथच्या बादशाहापाशीं राहिला, व त्याच्या पक्षास मिळालेले आणखी कितीएक सरदार हुकूम न मानीत असे होऊन त्यांनीं अयोध्या व प्रयाग हे प्रांत घेतले. त्या सर्वांचें पारिपत्य करण्याच्या उद्योगांत सुमारें दोन वर्षें मोडलीं. शेवटीं अकबरानें पावसामध्यें त्यांजवर स्वारी करून त्यांस भागीरथीच्या पलिकडे हांकून लाविलें. तेथें ते निर्भय असतां एके दिवशीं मोठी मजल करून दोन हजार माणसें घोडे हत्ती ह्यांवर बसवून त्यांसुद्धां गंगेच्या पुरांतून पोंहून जाऊन, बंडवाले ह्यांचा पराजय करून त्यानें त्यांची वाताहत केली. त्या लढाईंत खानजमान पडला, तेव्हांपासून तें बंड मोडून गेलें.

६. अकबराचा भाऊ शाहाजादा हाकीम ह्याजवळ काबूल प्रांताचा अधिकार बाप मेल्यापासून होता. त्यानें येऊन पंजाब मुलूख घेतला, परंतु त्यास लौकरच बादशाहानें हांकून दिलें. त्याच वर्षीं संबल एथें सुलतान मिर्झा नामक सरदाराचे चार मुलगे हुकूम न मानीत असे झाले; त्यांचें पारिपत्य लौकरच बादशाहानें केलें; परंतु ते पळून जाऊन गुजराथेंतील बादशाहाच्या आश्रयास राहिले.

इ० स० १५६६.

७. **जयपूरचा राजा बहारमल्ल** ह्याच्या मुलीशीं **अकबरानें** लग्न केलें, आणि तो व त्याचा मुलगा **भगवानदास** ह्यांस लष्करामध्यें मोठे अधिकार दिले. ह्या राणीशिवाय त्याची रजपूत राज्याच्या वंशांतील एक राणी होती, आणि त्याच्या वडील मुलाचें जयपूरचे एके राजकन्येशीं लग्न झालें होतें. ह्याप्रमाणें ते वेळेस बादशाहाच्या कुळांत मुलगी देण्यापासून स्वार्थ पाहून रजपूत राजे त्यांत प्रतिष्ठाही मानूं लागले.

८. **राणासंग** ह्याचा मुलगा **चितूरचा राजा उदयसिंग** ह्याजवर **अकबरानें** स्वारी केली, तेवेळीं तो निघून **गुजराथेच्या** पलिकडील डोंगरी देशांत गेला. त्याचा **जयमल्ल** नामें कोणी सरदार **चितूर** किल्ल्यावर बळकट फौजेसहित होता, त्यामुळें **अकबरास** बाहेर खंदक वगैरे खणून सुरुंग पाडून एकाएकीं किल्ला घेण्याचा उपाय करणें प्राप्त झालें. सुरुंग उडाले, तेणेंकरून बादशाहाचेच लोक कितीएक मेले; त्यामुळें तो प्रयत्न सिद्धीस गेला नाहीं. पुढें रात्रीस **जयमल्ल** आपल्या मोरच्या जवळ मशालीच्या उजेडानें कांहीं हुकूम देत आहे असें पाहून **अकबरानें** आपल्या हातानें त्यावर गोळी टाकिली; ती बिनचूक त्यास लागून तो मेला. त्यावेळीं किल्लेकरी हतवीर्य होऊन त्या जयमल्लाचें प्रेत व किल्ल्यांतील सर्व बायका ह्यांस एकदांच जाळून आपण बाहेर आले. त्यांतून ८००० हुशार लोक मुसलमानांच्या हातांनीं मरण पावून किल्ला त्यांच्या स्वाधीन झाला. परंतु तेथील राजा ह्यानें शरण न येतां

इ० स० १५६८.

कितीएक वर्षें अरण्यांत काढिलीं. पुढें त्याचा मुलगा **राणाप्रताप** ह्यानें युक्तीनें प्रयत्न करून अकबर मरावयाच्या पूर्वीं आपलें बहुतकरून सर्व राज्य परत घेतलें, आणि उदेपूर ही नवी राजधानी वसविली. ह्या उदेपूरकरांच्या घराण्यांतील राजांनीं मुसलमानाशीं कधीं शरीरसंबंध केला नाहीं. ह्यास्तव ते आपणास इतर सर्व रजपुतांपेक्षां श्रेष्ठ मानितात.

९. **अकबरानें** दुसऱ्या वर्षीं **रतनबोर** व **कलंजर** हीं घेतलीं. पुढें एका प्रसंगीं तो जोदपूरच्या सरहद्दीवर पोहोंचला असतां तेथील राजानें आपण जातीनें भेटीस नयेतां आपल्या दुसऱ्या मुलग्यास पाठविलें, म्हणून **अकबराचा** त्यावर प्रथम क्रोध झाला; परंतु पुढें राजा मेल्यावर त्याचा मुलगा शरण गेला तेव्हां **अकबरानें** त्याचा बहुमान करून त्यावर कृपा केली.

१०. **गुजराथेंतील** राज्यांत कितीएक वर्षेंपर्यंत फार बखेडा झाला होता. शेवटीं तेथील

इ० स० १५७३.

कारभारी **ऐतिमादखान** ह्यानें त्या राज्याचा कारभार करावयास लागून कलह मोडण्याविषयीं **अकबरास** लिहून पाठविलें. त्याप्रमाणें बादशाहाची स्वारी **पट्टणास** गेली असतां **गुजराथचा** बादशाहा तिसरा **मुजफर** ह्यानें आपलें तक्त त्याच्या स्वाधीन केलें. नंतर त्या प्रांतांतील सरदारांस जिंकून बादशाहा परत **आग्र्यास** गेला. पुनः एकवेळ **मिर्झा हुसेन** ह्या नांवाच्या कोणी एका सरदारानें **गुजराथेंत** बंड केल्याचें वर्तमान ऐकून बादशाहा त्यावेळेस पर्जन्य-

काळ असतां मोठमोठ्या मजला करून नऊ दिवसांत तेथें जाऊन पोहोंचला. आणि त्या बंडाचा बंदोबस्त करून व त्या बंडवाल्यांस मारून परत राजधानीस आला. ह्या दोनही प्रसंगीं अकबरास युद्धामध्यें थोड्या लोकांसहित मोठ्या फौजेवर जाण्याचा प्रसंग पडला; आणि एकवेळ त्याचा प्राण कसा वांचेल ह्याविषयींही भ्रांति उत्पन्न झाली; परंतु त्याचें शौर्य आणि जयपूरचा राजा भगवानसिंग वगैरे त्याचे रजपूत सरदार ह्यांचे प्रयत्न ह्यांहीं करून त्याच्या जिवास धक्का न लागतां त्यास जय प्राप्त झाला.

११. बंगाल्यामध्यें दाऊदखान म्हणून कोणीएक बादशाहा राज्य करीत होता, त्यावर अकबरानें स्वारी करून बहारपर्यंत मुलूख घेतला; मग तेथून तो आपण परत गेला. (इ० स० १५७५.) पुढें तोडरमल्ल वगैरे त्याचे सरदार आणि दाऊद ह्यांचा कितीएक वेळ युद्धप्रसंग होऊन शेवटीं तह ठरला. पुन: कलह होऊन पुढील वर्षी दाऊद ह्याचा पराजय होऊन तो मृत्यु पावला, आणि बंगाला व बहार हे प्रांत हस्तगत झाले. पुढें बादशाहाची फौज त्या प्रांतांत होती तिजमध्यें फितूर होऊन आणखी एकवेळ ते प्रांत गेले. (इ० स० १५७६.) आणि बंडवाल्यांचे तीस हजार लोक जमा झाले, परंतु अकबरानें प्रथम तोडरमल्ल व त्याच्या मागून आणखी कितीएक सरदार त्यांवर पाठवून कितीएकांस लांच देऊन व कितीएकांस जाहागिरी देऊन तें बंड मोडलें. त्या प्रां-

तांत कुतूनामें कोणी अफगाण सरदार ह्यानें फिरून बंड केलें, आणि तें कांहीं वर्षेंपर्यंत चाललें. शेवटीं अकबराचा सरदार मानसिंग ह्यानें जाहा-
इ० स० १५९०. गिरी वगैरे देऊन ह्याचा बंदोबस्त केला. तरी फिरून इ० स० १५९२ ह्यांत एक व पुनः इ० स० १६०० ह्यांत एक, अशीं दोन बंडें झालीं, त्यांचा बंदोबस्त झाल्यावर पुनः तिकडे कोणीं बंडवाल्यानें अमल चालविला नाहीं.

१२. वर लिहिल्याप्रमाणें बंगाल्याचा बंदोबस्त सरदार लोक करीत असतां, अकबराचा
इ० स० १५८१. भाऊ काबूल एथील अधिकारी मिर्झाहकीम ह्यानें पंजाबावर हल्ला करून तेथील सुभेदार मानसिंग ह्यास पळविलें. त्यावर अकबरानें स्वारी करून त्याचा पराजय केला, आणि सिंधुनदाच्या पलिकडे जाऊन काबूलही घेतलें. पुढें कांहीं वेळानें मिर्झा हकीम हा शरण आल्यावर त्यास तो सुभा परत देऊन पंजाब एथील कामावर जयपूरचा राजा भगवानदास ह्यास ठेवून आपण परत आग्र्यास येता झाला. ह्या स्वारींत त्यानें सिंधुनदाच्या कांठावर किल्ला बांधला, तो अटक ह्या नांवानें अद्यापि प्रसिद्ध आहे.

१३. वर लिहिलेला गुजराथचा मुजफरशाहा कांहीं दिवसपर्यंत प्रतिबंधांत राहिल्यावर
इ० स० १५८९. बादशाहानें दिलेल्या जाहागिरीचा उपभोग करून इ० स० १५७३ पासून १५८१ पर्यंत होता. नंतर गुजराथेंतील बंडवाल्यांचें बोलावणें

आल्यावर तो तिकडे निघून गेला, आणि बखेडा करूं लागला. त्याच्या बंदोबस्ताकरितां **बहिरामखान** ह्याचा मुलगा **मिर्झाखान** हा त्या प्रांतीं गेला. त्यानें एकवेळ त्यास हांकून देऊन **गुजराथ** हस्तगत केली; परंतु **मुजफर** ह्यानें कितीएक वर्षें दक्षिणेंतील राजाचा आश्रय करून एक मोठी लढाई केली. पुढें चार वर्षांनीं तो धरला गेला, आणि **आग्र्यास** जात असतां आपला गळा वस्त्र्यानें कापून घेऊन प्राण देता झाला. इ० स० १५९३.

१४. **काश्मीर** प्रांतांत पूर्वीपासून बहुतकरून, हिंदु व मध्यें मध्यें कांहीं तातार राजे राज्य करीत असत. तेथें चवदाव्या शेंकड्याच्या प्रारंभीं कोणी एक आगंतुक मुसलमान सरदार येऊन तिकडील गादीचा धनी झाला. पुढें कोणी मुसलमान राजा राज्य करीत असतां **मिर्झा-हकीम** मेल्यामुळें **काबूल** घेण्यास **अकबराची** स्वारी **अटक** एथें गेली. तेथून आपला मेहुणा जयपूरकर **भगवानदास** व **मिर्झासुलेमान** ह्याचा मुलगा **शाहारोखमिर्झा** ह्या दोन सरदारांस मोठ्या सरंजामासहित त्यानें **काश्मीर** प्रांत घेण्यास पाठविलें. इ० स० १५८६. ते पहिल्यावर्षीं हींव फार व अन्नपाण्याचा तोटा ह्या कारणामुळें तेथील राजाकडून **अकबराचें** स्वामित्व मात्र कबूल करवून तह ठरवून परत आले. परंतु दुसऱ्या वर्षीं **अकबरानें** फौज पाठविली त्यावेळीं तेथील फौज आपसांतल्या कलहामुळें कांहीं इकडे मिळाली व कांहीं निघून गेली. नंतर लौकरच राजा शरण

आला; त्याचें नांव बादशाहानें दिल्लीच्या मानकऱ्यांच्या यादींत घालून त्यास बहार प्रांतांत जाहागीर दिली.

१९. काबूल प्रांताच्या लगत ईशानीकडेस अफगाण लोक राहत असत, त्यांमध्यें आपणांस पैगंबर म्हणविणारा बायजीद नामें कोणी झाला. त्यानें एक नवें मत प्रवृत्त केलें;

इ० स० १५८६.

आणि आपले शिष्य रोषनये, म्हणजे ज्ञानेंकरून प्रकाशित झालेले, ह्यांस सर्व पृथ्वीचें राज्य प्राप्त होईल म्हणून वर देऊन, पाहिजे त्याचें राज्य घ्यावें अशी परवानगी दिली होती. ह्या लोकांचा जलाल नामें कोणीएक सरदार काबुलच्या सरहद्दीवर उपद्रव करूं लागल्यामुळें बादशाहानें आपला दूधभाऊ जैनखान, व राजा बिर्बल ह्यांस सैन्य देऊन तिकडे पाठविलें. त्यांचा त्या पाहाडी मुलुखांत प्रथम कांहीं उपाय चालेना, आणि पुढें बादशाहाकडून आणखी कुमक आल्यावर लष्कर पुढें जात असतां एका घाटामध्यें कोणाएका प्रसंगीं अफगान लोकांची गांठ पडून तुमुल युद्ध झालें. त्यांत बादशाहाच्या फौजेस पळ सुटला, तेव्हेळीं बिर्बल हा प्राणास मुकला, आणि जैनखान ह्याचे छावणीवर रात्रीं छापा येऊन त्याचेही बहुत लोक पाडाव झाले व बहुत मेले, आणि तो मात्र एकटा काळोखांतून पायीं निघून अटकेस आला. त्याचीं भेट बादशाहानें घेतली नाहीं, व बिर्बल ह्याच्या मरणाचें वर्तमान ऐकून तो फार खेद पावला. पुढें राजा मानसिंग व तोडरमल्ल ह्यांस, जलाल ह्याच्या बंदोबस्ताकरितां पाठविलें, त्यांचे व जलाल ह्याचे वर्ष दोन वर्षपर्यं-

त युद्धप्रसंग होऊन शेवटीं जलाल ह्याचा केवळ पराजय झाला. परंतु पुढें बहुत वर्षेंपर्यंत तो बखेडा करीतच होता. शेवटीं सन १६०० मध्यें त्यानें गजनी शहर घेतल्यावर त्याचा पराजय होऊन तो पळत असतां वाटेमध्यें तो शत्रूंच्या हातीं सांपडल्यावर त्यांनीं त्यास ठार मारिलें, परंतु त्या युसुफजई अफगाण लोकांचा पुरता बंदोबस्त झाला नाहीं; ते स्वतंत्र राहिले, आणि ते अद्यापि तसेच आहेत.

१६. सिंध देशांत मुसलमान वंशाचा कोणी राजा राज्य करीत होता. त्यावर अकबरानें दोन वेळ फौज पाठवून शेवटीं त्यापासून तो प्रांत जिंकून घेतला; व आपल्या सांप्रदायाप्रमाणें त्या राजास मानकरी मंडळींत ठेवून घेतलें. पोर्तुगिस लोकांचे शिपाई आणि फिरंग्यासारखे पोषाक केलेले २०० काळे शिपाई व कांहीं अरबलोक ह्या राजाच्या चाकरींत होते असें अकबरनाम्यांत लिहिलें आहे. कवाईतवाले शिपाई ह्यांविषयीं वखरेंत हा पहिला लेख पाहाण्यांत येतो. इ० स० १५९२.

१७. ह्या राज्याच्या आरंभीं कंदहार इराणी लोकांनीं घेतलें होतें, तेथें त्यांमध्यें आंतल्या आंत कलह होऊन तें शहर व तो प्रांत हीं दोनही आपोआप अकबराच्या स्वाधीन झालीं. इ० स० १५९४.

# प्रकरण ९

## अकबर बादशाह.

### इ० स० १५९२ पासून १६१५ पर्यंत.

१. वर लिहिल्याप्रमाणें नर्मदेचे उत्तरेकडील बहु-
तकरून सर्व प्रांतांत आपली सत्ता चालूं ला-
इ०स० १५९५. गल्यावर अकबरानें दक्षिणेकडील राज्याचे
व्यवस्थेकडे मन घातलें. अहंमदनगरचा चौथा राजा मुर्तिजा निजामशाहा हा मेल्यावर त्याचा भाऊ बुऱ्हाण हा कांहीं वर्षेंपर्यंत अकबराच्या आश्रयानें राहून शेवटीं इ०स०१५९२ यांत तेथील गादीवर बसला; मग तो पुढें तीन वर्षांनीं मेला. नंतर अहंमदनगर एथील दरबारांत चार फळ्या पडल्या, आणि त्यांतून अधिक प्रबळ पक्षाकडून बोलावणें आल्यावरून अकबराचा मुलगा मुराद हा गुजराथेंतून सैन्य घेऊन तिकडे गेला. इतक्यांत तेथें उलटापालट होऊन बाहादुर निजामशाहा म्हणून कोणी मुलगा गादीवर बसला, आणि राज्याचा कारभार त्याची आत चांदबिबी करूं लागली. तिनें विजापूरकर राजाशीं स्नेह केला, आणि आपल्या संस्थानांत अनेक फळ्या होत्या त्या मोडण्याची खटपट आरंभिली. तिचें सांगणें ऐकून नेहंग नामें कोणी हबशी सरदार एके फळीचा मुख्य होता तो तिचे कुमकेस आला. इकडे मुराद ह्यानें शहरास वेढा देऊन खालून दोन सुरुंग पाडिले. इतक्यांत आंतून लोक सुरुंग

पाडिताहेत, व चांदबिबी आपण काम करवीत आहे, असें त्याच्या दृष्टीस पडलें. नंतर आंतील लोकांकडचा पुरा बंदोबस्त होण्याच्या पूर्वीं मुरादाचा तिसरा सुरुंग पेटून आंतील सुरुंग उडाला. तेव्हेळीं किल्लेकरी लोक पळण्याचा प्रसंग पाहून चांदबिबी आंगांत चिलखत घालून तोंडावर बुरखा व हातांत नागवी तरवार घेऊन तट फुटला होता तेथें आली. त्यामुळें पुनः लोकांची जमाजम होऊन आंतून बाण, तोफांचे गोळे, दगड इत्यादि जें काय सांपडलें त्याची बाहेरच्या लोकांवर वृष्टि करून संध्याकाळपावेतों किल्लेकऱ्यांनीं शत्रूंचें कांहीं चालूं दिलें नाहीं; आणि रात्रीचे रात्रींत तट नीट करण्याचें काम इतकें आकारास आणिलें कीं दुसऱ्या दिवसीं किल्ल्यांत प्रवेश होण्यास नवे सुरुंग पाडल्यावांचून उपाय नाहीं, असें पाहून मुराद ह्यानें तिशीं तह केला. त्यांत अहंमदनगरच्या राजांनीं वराड प्रांत आलिकडे जिंकून घेतला होता, तो अकबरास द्यावा असें ठरलें. परंतु पुढें लौकरच वराड प्रांताच्या सरहद्दीविषयीं तंटा पडला, व चांदबिबी हिचा पेशवा महंमदखान ह्यानें कपट करून तिच्या नाशाकरितां मुराद ह्यास बोलावणें पाठविलें. त्यावरून तो येऊन गोदावरीच्या कांठीं मोठी लढाई झाली. त्या लढाईंत मुराद ह्याचे कुमकेस खानदेशचा बादशाहा होता, व गोंवळकोंडें आणि विजापूर एथील बादशाहा हे चांदबिबिच्या पक्षास होते. ह्या उभयतांचा युद्धप्रसंग मोठा होऊन मुराद ह्याचा जय

झाला; परंतु तो शाहाजादा व **खानखानान**
इ०स० १५९६. ह्या दोघांमध्यें वैमनस्य पडल्यामुळें पुढें उद्यो-
ग चालला नाहीं. त्या कामावर **अकबरा**-
नें आपला वजीर **अबुलफजल** ह्यास सरदार करून
पाठविलें. त्याच्या हातूनही कांहीं झालें नाहीं. शेव-
टीं **अकबर** बादशाहा स्वतः **पंजाबांतून** दक्षिणेंत आला.
तो येण्याच्या पूर्वींच त्याच्या लष्करानें **दौलताबाद** वगैरे
किल्ले घेतले होते. बादशाहा **बऱ्हाणपुरास** पोहोंचल्या-
वर तेथून त्यानें आपला मुलगा **दानियाल अहंमदनगरा**-
वर पाठविला. त्यानें त्या किल्ल्यास वेढा घातला,
तेव्हेळेस हबशी **नेहंग** व दुसरे सरदार व **चांदबिबी** ह्यांचा
कलह होऊन युद्ध करण्याचा उपयोग दिसेना म्हणून
**बिबी** तहाचें बोलणें करीत असतां कितीएक फितूर
शिपायांनीं तिच्या महालांत जाऊन तिला ठार मारिलें.
पुढें थोड्या दिवसांनीं किल्ला घेऊन बादशाही लोकांनीं
आंतील किल्लेकऱ्यांची कत्तल करून टाकि-
इ०स० १६००. ली; आणि राजा कैदी करून ग्वालेरच्या
किल्ल्यावर पाठविला. पुढें दुसरा एक ना-
मधारी राजा गादीवर बसला. त्याची व राज्याची
समाप्ति **शहाजहान** ह्याचे कारकिर्दींत इ०स० १६३७ त
झाली.

२. **अहंमदनगर** घेतल्यानंतर कांहीं दिवसां-
नीं **अशीरगडही** जिंकून घेऊन बादशाहानें **खान**-
**देशच्या** राज्याची समाप्ति केली; आणि आपला मुलगा
**दानियाल** ह्यास तो प्रांत व **वराड** ह्या दोहोंचा सुभेदार

नेमून त्याजवळ मसलत सांगण्यास खानखानान ह्यास ठेविलें. नंतर विज्ञापूर, आणि गोंवळकोंडें एथील राजांकडून नजराणे घेऊन त्यांचे वकील आले होते त्यांच्या द्वारें त्या राजांशीं स्नेह करून आपण हिंदुस्थानांत परत गेला.

३. बादशाहा दक्षिणेंतून परत जाण्याचें मुख्य कारण असें झालें कीं, त्याचा वडील मुलगा सलीम हा कांहीं शाहाणा असतां अफू व मद्य ह्या दोहोंच्या व्यसनामुळें कांहींसा भ्रांत झाला होता. त्याचे मर्जीस्तव त्याचे इतराजींतील अबुलफजल ह्यास बादशाहानें दक्षिणेंत पाठविलें असतां, व आपल्या मागें त्यानें राज्य करावें असें ठरविलें असतां, द्वेष विशेष वाढून बादशाहा दक्षिणेंत होता त्या काळीं त्यानें प्रयाग, अयोध्या व बहार हे प्रांत घेतले, आणि तेथील खजिन्यापैकीं सुमारें तीस लक्ष रुपये हस्तगत करून तो आपणास राजा म्हणवूं लागला.

४. आपल्या पुत्रानें वर लिहिल्याप्रमाणें केलेली वर्तणूक ऐकून अकबरास परम दुःख झालें; तथापि त्यानें त्यास प्रीतीनें उपदेशाचें पत्र पाठविलें. नंतर हिंदुस्थानांत पोहोंचल्यावर युक्तीनें त्याची समजूत घालून त्यास बंगाला व उडिया हे प्रांत द्यावे व त्यानें आपले आज्ञेंत वागावें असें ठरविलें. परंतु सलीम ह्याच्या मनांतील कपट गेलें नाहीं, आणि अबुलफजल दक्षिणेंतून येत असतां बुंदेलखंडांतील नरसिंगदेव राजा ह्यानें सलीम ह्याच्या सांगण्यावरून

इ० स० १६०२.

त्यावर छापा घालून त्याच्या सर्व लोकांस त्यासुद्धां ठार मारिलें; व अबुलफजल ह्याचें डोकें शाहाजादा ह्याजकडे पाठविलें. हें ऐकिल्यावर बादशाहानें परम खिन्न होऊन दोन दिवसपर्यंत अन्न व झोंप सोडून त्यासाठीं शोक केला, आणि आपला नेहमींचा दयालु स्वभाव सोडून नरसिंगदेव ह्यावर फौज पाठवून त्याचें कुटुंब व राज्य ह्यांचा नाश करविला. परंतु आपल्या मुलाचें अंग अबुलफजल ह्यास मारण्यांत होतें हें बादशाहास कळलें नाहीं, म्हणून त्यानें सलीम ह्याजवळ आपल्या राणीस मध्यस्थ घालून त्याची व आपली एकी केली.

५. नंतर सलीम ह्यावर विशेष प्रीतीचें लक्षण दाखविण्याकरितां अकबरानें त्यास राजचिन्हें धरण्याची आज्ञा देऊन मोठ्या सैन्यासहित उदेपूरच्या राण्यावर स्वारीस पाठविण्याचा निश्चय केला. परंतु तिकडे जाण्याची त्याची इच्छा नाहीं असें पाहून त्यास प्रयागास जाऊन राहाण्याची मोकळीक दिली. त्या ठिकाणीं असतां सलीम हा अतिशयित व्यसनाक्रांत होऊन तो व त्याचा वडील मुलगा खुषरू ह्या उभयतांमध्यें कलह उत्पन्न झाला.

इ० स० १६०३.

त्यामुळें मानसिंग ह्याची बहीण, खुषरू ह्याची आई, हिला वाईट वाटून तिनें विष खाऊन आपला प्राण दिला. ह्यावरून सलीम ह्यास बुद्धिभ्रंश झाल्याप्रमाणें होऊन तो फार क्रौर्य आणि अविचार करूं लागला.

६. हें वर्तमान ऐकल्यावरून अकबर प्रयागास जाण्याकरितां निघाला, परंतु आपले आईची अवस्था

आहे असें समजल्यावरून तो परत आग्न्यास गेला. तेथें त्याची आणि तिची दृष्टिभेट होऊन ती मरण पावली. पुढें सलीम आपणच दरबारास आला, तेथें कांहीं दिवस त्यास प्रतिबंधांत ठेवून औषधी उपचार करून बादशाहानें त्यावर कृपा केली. तथापि तो व त्याचा मुलगा खुषरू ह्या उभयतांमध्यें कलह झाला, आणि सलीम ह्याचा तिसरा मुलगा खुरम ह्यावर त्याची व अकबराची फार प्रीति होती, म्हणून खुषरू ह्यास विशेष वाईट वाटायास कारण झालें.

७. ह्याच्यापूर्वीं कितीएक वर्षांवर अकबराचा दुसरा मुलगा मुराद हा वारला होता, आणि तिसरा मुलगा दानियाल ह्यासही मद्याचें व्यसन अतिशयित लागलें होतें, त्यापुढें कांहीं उपाय न चालतां तो मरण पावला. त्याचा अकबरास मोठा शोक झाला, व आणखी कितीएक जिवलग मित्र मेले त्यांचें दुःख त्यास सोसणें प्राप्त झालें ह्या कारणांमुळें त्याची प्रकृति उत्तरोत्तर क्षीण होत चालली.

८. शेवटीं अकबराचा जठराग्नि केवळ मंद होऊन त्याचा अंतकाळ समीप आला असें दिसूं लागलें. तो दाहा दिवस बिछान्यावर पडून राहिला. इतक्यांत सलीम ह्यास एकीकडे ठेवून त्याचा मुलगा खुषरू ह्यास गादीवर बसविण्याची मसलत कितीएक सरदारांनीं केल्यामुळें वाड्यामध्यें कांहीं बखेडा झाला, आणि सलीम हा बादशाहास भेटावयास येण्याविषयीं अनमान करूं लागला; ई० स० १६०५.

परंतु आपल्या मागें सलीम ह्यानें राज्य करावें ह्याविषयीं अकबराचा दृढनिश्चय होता, आणि त्यासच बहुतकरून सर्व सरदार अनुकूळ होते त्यावरून सलीम ह्याची खातरी होऊन तो त्याचे भेटीस गेला. तेव्हां आपले सर्व उमराव ह्यांस जवळ बोलावून अकबरानें सलीम ह्यास आपल्या सरदारांशीं स्नेहानें वागण्याविषयीं व बायका व आश्रित व जुने स्नेही ह्यांस अंतर नदेण्याविषयीं अनेक प्रकारें बोध केला, आणि आपली आवडती तरवार आपल्यासमक्ष त्याचे कमरेस बांधविली. इतकें केल्यावर त्यानें एक मुल्ला बोलावून आणविला, आणि त्याच्या समक्ष मुसलमानाच्या रीतीप्रमाणें निमाज पढून तो मरण पावला. (अक्टोबर ता० १३.)

९. अकबर शरीरानें सुदृढ, स्वरूपानें सुंदर, आणि स्वभावानें शूर, उद्योगी, आणि मनमिळाऊ होता. लहानपणीं त्याचें लक्ष्य शरीरसुख व मद्यादि विषय ह्यांजकडे होतें, परंतु पुढें लौकरच तो त्यापासून विरक्त झाला. त्यानें मांसभक्षण अमुक अमुक दिवसीं करूं नये असा नेम केला होता; ते दिवस मिळून वर्षांत सुमारें तीन महिने होत असत. त्यास झोंप फार नव्हती, आणि विद्यादिकांविषयींच्या वादाची त्याला अतिशयित आवड होती. त्यांत तो कधीं कधीं रात्रीच्या रात्री घालवीत असे. त्यास इतका युद्धाचा उद्योग असतां आणि राज्यकारभारसंबंधें मोठमोठ्या मसलती करावयाच्या असतांही तो आपल्या वेळाची इतकी व्यवस्था राखीत असे कीं, विद्येच्या व्यासंगाकडे व करमणुकीकडे खर्चण्यास त्यास वेळ मिळत असे.

त्यास हत्ती वाघ इत्यादिकांच्या शिकारीची मोठी आवड होती, आणि शरीरास श्रमाचा व संकटांचा अभ्यास व्हावा इतक्याच हेतूनें तो कधीं कधीं मोठमोठ्या मजला करीत असे. एकवेळ तो **अजमिराहून आग्र्यास**, म्हणजे ११० कोश, घोड्यावरून दोन दिवसांत गेला, आणि समयविशेषीं पायीं पंधरा वीस कोस जात असे. इतकेंही असून त्यास युद्धाचा मोठा उत्साह होता असें नाहीं. कारण पडेल तेव्हां तो युद्धप्रसंग करी, परंतु त्याचा अभिप्राय सिद्धीस गेला म्हणजे शत्रूंचा अधिक नाश करीत नसे. **दिल्लीच्या** सभोंवताल्या प्रांतांशिवाय बाकीच्या राज्यावर त्याच्या सारिखा अमल पूर्वींच्या राजांतून कोणाचा बसला नव्हता, म्हणून सर्व **हिंदुस्थानाचा** बादशाहा ही पदवी प्रथम त्यासच योग्य होय.

१०. विद्या आणि धर्म ह्यांविषयीं **अकबर** निष्पक्षपाती होता. त्याच्या संग्रहीं त्याचा वजीर **अबुलफजल** ह्याचा भाऊ **फैजी**नामें विद्वान् पुरुष होता; त्यानें आणखी कितीएक विद्वानांच्या मदतीनें **वेद**, **भारत**, **रामायण**, **लीलावती**, बीज, इत्यादि संस्कृत ग्रंथांचे तरजुमे फारसी भाषेमध्यें केले. तसाच कोणीएक विद्वान् क्रिस्ती पाद्री **गोंव्याहून** बोलावून आणून त्याकरवीं **अकबरानें** कितीएक मुलांस विद्याभ्यास करविला, आणि त्यांकडून पुढें ग्रीक भाषेंतून फारसींत ग्रंथ करण्याचा उद्योग केला. क्रिस्ती बैबल ह्याचा तरजुमा करण्याचें काम त्यानें **अबुलफजलास** सांगितलें होतें. त्याच्या दरबारांत बहुत विद्वानांची मंडळी होती. आणि त्याचे सरदार **अजीज**, व

**खानखानान** वगैरे, हे युद्धाच्या कामांत इतके प्रवीण असून ग्रंथ करणारे होऊन गेले. त्यांच्या वेळचा **तानसेन** गवई ह्याचें नांव तर प्रसिद्ध आहे.

११. **अकबर** ह्याचा विश्वास मुसलमानी धर्मावर नव्हता, व त्याला आपल्या लोकांचे बहुत सांप्रदाय आवडत नव्हते. त्यानें शक व महिने ह्यांचीं नांवें फिरविलीं; सलाम अलेकुम म्हणणें, जपमाळ धरणें व दाढी वाढविणें वगैरे सांप्रदाय मोडण्याविषयीं प्रयत्न आरंभिला; आणि धर्माविषयीं सरकारची जबरी होती ती कमी केली. ज्याच्या मनास जसें येईल तसें त्यानें वागावें, आणि कोणी मुलाचें वय बारा वर्षांचें होऊन त्यास समजूं लागे तोंपर्यंत त्याची सुंता करूं नये, असे त्यानें नेम केले. ह्याच रीतीनें हिंदूमध्यें दिव्य, लहान मुलीचें लग्न, व होमाकरितां पशुवध हीं करण्याची मनाई केली; सती जाणें झाल्यास खुशी असल्याविना जाऊं नये आणि खुशी असल्यास पुनर्विवाह करावा असा बंदोबस्त केला. ह्या बादशाहास कोणत्या धर्माचा अभिमान नव्हता, म्हणून तो फौजेवरील व राज्यांतील दुसरे अधिकार भेद न करितां हिंदु व मुसलमान ह्यांस सांगत असे; आणि कोणत्याही रीतीनें देवास भजण्याविषयीं कोणास प्रतिबंध करूं नये असा त्याचा अभिप्राय होता, म्हणून पूर्वीं हिंदु लोकांपासून **जजिया** नामें जो कर घेत असत, तो व यात्रेकऱ्यावरचें देणें हें त्यानें आपल्या राज्याच्या आरंभींच मना केलें.

१२. **अकबराच्या** कारकिर्दीच्या पूर्वीं सुमारें शंभर

वर्षांपासून कबीरपंथी मत प्रवृत्तींत आलें होतें, त्यांतील सिद्धांताप्रमाणें त्याचा सिद्धांत होता. तो असा कीं, पैगंबर म्हणून कोणी आजपर्यंत झाला नाहीं, व ईश्वरेच्छा समजणें ती मनुष्यास आपले बुद्धीच्या योगें समजती. अकबर ह्याच्या अशा मनामुळें आणि त्यानें मुसलमान धर्मास सरकारी मदत देण्याचें मना केल्यामुळें मुसलमान त्यास नास्तिक म्हणून त्याची अद्यापि निंदा करितात.

१३. अकबर बादशाहानें देशाचे एक कोटि दाम म्हणजे अडीच लक्ष रुपये वसुलाचे तालुके केले. तसेच एकंदर स्वाधीन झालेल्या मुलखाचे मोठे १९ सरसुभे ठरवून एकेकावर सिपाहसालार, ह्या नांवाचा एकेक सरसुभेदार ठेविला. सार्‍या प्रांतामध्यें पाहणी करून जमिनीच्या प्रती लावून उत्पन्नाच्या तिजाईच्या सुमारें रोकड सरकार देणें ठरविलें; आणि तालुक्याचे मक्ते देण्याची पहिली चाल होती ती मोडून तहशीलदार ह्यांनीं जमीदार वगैरे लोकांचा संबंध न ठेवितां रयतेशींच काय ठराव करणें तो करावा, असे हुकूम केले. ऐनाजिनसाचा पैका आकारणें तो एकुणीस वर्षांच्या बाजार निरखांची सरासरी करून त्या दरानें आकारावा असें ठरविलें; आणि ह्या देण्याशिवाय कर, पट्या, व कामदारांच्या बाबती होत्या; त्या बहुतेक माफ केल्या. हा राज्याच्या जमाबंदीचा बंदोबस्त करण्यांत अकबरास तोडरमल्ल नामें कोणी निर्लोभी आणि मोठा शाहाणा पुरुष मसलत सांगणारा होता. त्यानें केलेल्या बंदोबस्ताविषयीं तपशीलवार सर्व हकीकत अईन अकबरी

नामें ग्रंथ ह्यांत आहे. ह्याशिवाय अकबर ह्यानें कामदारांस केलेले हुकूमही आहेत, त्यांत शहाणपणा व प्रजांच्या कल्याणाची इच्छा हींच बहुधा दृष्टीस येतात.

१४. प्रतिप्रांतांतील चोरांचा वगैरे बंदोबस्त करणारे व मुलकी शिबंदीची व्यवस्था राखणारे लष्करी सरदार फौजदार ह्या नांवाचे होते. न्याय मनसुबी करण्याचें काम काजी व मीर अद्लनामें सरकारी कामदार ह्यांजकडेस होतें, आणि गांवगंनाचा बंदोबस्त करणारे कोतवाल होते. खोड्यांत घालण्यापासून देहांत दंडापर्यंत शिक्षा करण्यास त्यांस मोकळीक होती.

१५. फौजेमध्यें दाहा स्वारांचे सरदारापासून दाहा हजार स्वारांचे सरदारांपर्यंत जे कामदार असत त्यांस मनसबदार हें नांव होतें. त्यांतून ५००स्वारांपेक्षां अधिक स्वारांची सरदारी शाहाजादे व रजपूत राजे ह्यांजकडेस मात्र असे. हे मोठे सरदार सुमारें३०होते. त्यांसुद्धां दोनशें स्वारांच्या सरदारांपर्यंत एकंदर सरदार ४५० ह्यांचे आंत होते; आणि त्यांतून एकेका सरदारानें स्वारांच्या निमेनें पायदळ ठेवावें, आणि त्या पायदळाच्या लोकांमध्यें एक चतुर्थांश लोक बंदुकवाले व बाकीचे तिरंदाज असावे, अशी व्यवस्था होती. ह्याशिवाय अहदी म्हणजे एकांडे स्वार होते; त्यांतून सिंधुनदाच्या पलिकडच्यांस दरमाहा रुपये २५ व हिंदुस्थानांतील लोकांस २० असे होते. बंदुकवाल्यांस ६, तिरंदाजांस २।। अशा नेमणुका होत्या. असे सर्व लोक मिळून एकंदर फौज किती होती हें समजत नाहीं, परंतु मुलकी शिबंदी ४४,००,००० होती

असें अबुलफजल ह्यानें लिहिलें आहे. पुढें औरंगजेबाच्या राज्यांत सरकारचा पगार खाणारे २,००,००० स्वार होते.

१६. अकबर ह्यानें अटकचा किल्ला बांधला म्हणून वर लिहिलें, ह्याशिवाय त्यानें फत्तेपूर शिकरी नामें शहर वसविलें, आणि आग्रा व प्रयाग एथें किल्ले, तट, खंदक, घुमट वगैरे मोठ्यामोठ्या इमारतींचीं कामें केलीं.

१७. त्याच्या फौजेमध्यें डेरे, राहुट्या, कनातीं वगैरे ह्यांची शोभा अद्वितीय होती, आणि नवरोजचा सण, व त्याचा जन्मदिवस इत्यादि सणांचे प्रसंगीं मोठा उत्साह होत असे. तेवेळेस मखमली बैठका व रेशमी किनखापी पडदे ह्यांहींकरून सुशोभित अशा दिवाणखान्यामध्यें सिंहासनावर बादशाहा बसत असे; सभोंवतें रत्नखचित शिरपेंच लावलेले मानकरी उभे असत; आणि राजवाड्यापुढें माणकांनीं व पाचांनीं जडित पिंपळवणें, बांधलेले हत्ती, व त्यांच्या मागून मोत्यांच्या कलग्या लावलेले घोडे, व त्यांवर भरगच्ची पोषाकांचे स्वार ह्यांच्या रांगा चालत. बादशाहा द्रव्याच्या तुळा करून तें गरिबांस वांटी, आणि सोन्यारुप्याचीं केलेलीं बदामें व दुसरीं फळें आपल्या हातानें उडवी.

१८. इतकेंही वैभव असतां अकबराचा साधेपणा वर्णावयाजोगा असे. त्याच्या दरबारची व्यवस्था दोन इंग्रज मनुष्यांनीं डोळ्यांनीं पाहिली, त्यांनीं लिहिलें आहे कीं तो इतर राजांप्रमाणें डौल न करितां इनसाफ करण्यास सिंहासनाच्या खालीं बसतो; सर्वांशीं बोलतो;

आणि तेजस्वी असून समयीं दया करितो, समयीं कठोरपणा करितो. त्यास बंदुका व तोफा करण्याचें काम समजतें; तो मितभोजन करितो; प्रतिदिवसांत प्रहरभर मात्र निजतो; सर्वकाळ उद्योग करितो; कोणी गरीब माणूस कांहीं नजर घेऊन आला असतां त्याशीं बोलून तो त्याचा बहुमान करितो. त्याच्या प्रजा त्यावर प्रीति करून त्याची दहशतही बाळगितात, आणि शत्रु त्यास थरथर कांपतात.

---

## प्रकरण १०.

### जहानगीर बादशाहा.

#### इ० स० १६०५ पासून १६२७ पर्यंत.

इ० स० १६०५. अकटोबर.

१. अकबराच्या मरणानंतर लागलाच सलीम हा जहानगीर, म्हणजे पृथ्वी जिंकणारा, असा किताब धरून सिंहासनावर बसला. तो प्रथम कांहीं काळपर्यंत आपला पूर्वीचा दुष्टस्वभाव सोडून न्यायानें व शांतपणानें कारभार करूं लागला. कोणी फिर्यादी आला असतां त्याची दाद लौकर लागावी म्हणून वाड्याचे भिंतीस त्यानें एक सांकळ लाविली होती; ती फिर्यादी लोकांनीं हालविली म्हणजे आंत घांट वाजून त्यास कळत असे.

२. जहानगीर गादीवर बसल्यावर चार महिन्यांच्या सुमारें त्याचा मुलगा खुषरू ह्यानें प्रतिबंधांतून सुट-

न आग्रा आणि दिल्ली ह्यांच्या वाटेनें पंजाबांत जाऊन १०,००० लोक जमविले; परंतु तो लाहोर शहर फितुरानें घेऊन तेथील किल्ला हस्तगत करण्याच्या उद्योगांत असतां बादशाहाच्या फौजेनें जाऊन त्याचा पराजय केला. नंतर तो होडींतून पळून जात असतां त्यास धरून बादशाहापाशीं आणिलें, व त्याचे ७०० लोक कैद केले. बादशाहानें ह्या लोकांस ओळीनें उभे करून त्यांचे हाल हाल करून त्यांस सुळीं दिलें, आणि खुषरू ह्याची अप्रतिष्ठा करून त्यास कैद करून ठेविलें.

३. दक्षिणेंत अहंमदनगरचें राज्य पूर्वी अगदीं मोडकळीस येऊन तें बहुतेक दिल्लीच्या सरदारांनीं हस्तगत केलें होतें. परंतु तेथें जमाबंदीच्या शिस्तीविषयीं ज्याचें चातुर्य प्रसिद्ध, असा जो मलिकंबर नामें सरदार, त्यानें सांप्रतच्या औरंगाबाद शहरच्या जागीं नवी राजधानी वसवून अहंमदनगर परत घेतलें, आणि जहानगिराचा सरदार खानखानान ह्याचा पराजय केला; त्यास सैन्यासहित ब्ऱ्हाणपुरास जाणें प्राप्त झालें. पुढें जहानगीर ह्यानें आपला मुलगा परवीज व खानजहान लोदी व राजा मानसिंग ह्यांनीं मलिकंबरावर खानदेश व व्ऱ्हाड ह्या प्रांतांकडून हल्ला करावा, व अबदुल्लाखान, गुजराथचा सुभेदार, ह्यानें तिकडून त्यावर जावें, असा हुकूम केला. त्यांतून अबदुल्लाखान पूर्वी जाऊन पोहोंचला. त्यास दाणा वैरणीचा तोटा पडून त्याची छावणी वारंवार लुटून मलिकंबरानें इतकें हैराण केलें कीं

इ० स० १६१२.

त्यास निघून जाणें प्राप्त झालें, मग तो जात असतां मलिकंबरानें त्याच्या फौजेवर हला करून त्याचे पिछाडीचे लोकांस मारिलें, पुढें बागलाणांतील जंगलाचे वाटेनें गुजराथेंत जाऊन पोहोंचण्याचें त्यास मोठें संकट पडलें. ही त्याची अवस्था पाहून बाकीचे सरदारही बऱ्हाणपुर एथें छावणी करून राहिले.

४. ह्या राज्याच्या आरंभींच शाहाजादा परवीज ह्यानें उदेपूरच्या राण्याशीं तह ठरविला होता, परंतु पुनः त्याशीं इ० स० १६०७ तांत लढाई चालू होऊन बादशाहा ह्यानें मोहबतखान ह्यास सैन्य देऊन उदेपुरावर रवाना केलें. त्यानें एकवेळ राण्याचा पराजय केला, आणि पुढें अबदुल्लाखान ह्यानेंही एकवेळ जय मिळविला. नंतर बादशाहाचा तिसरा मुलगा खुरम, ह्यानें २०,००० सैन्यासहित तेथें जाऊन तो राणा हीनबळ केला, आणि तो शरण आल्यावर त्याचा बहुमान करून त्याचीं शस्त्रें त्यास परत देऊन सर्व राज्य त्याच्या स्वाधीन केलें. त्याच्या मुलग्यासही बादशाहानें सरदारीचा मोठा अधिकार दिला. हा पराक्रम पाहून बादशाहा खुरमावर बहुत संतोष पावला, आणि सर्व लोकांत त्याची कीर्ति झाली. पुढें कांहीं वर्षांनीं बादशाहानें त्यास शाहाजहान असा किताब दिला, आणि तिघां मुलांत तो वयानें लहान असतां आपल्या मागें तोच राज्याधिकारी ठरविला.

इ० स० १६१४.

५. वर दोन कलमांत लिहिलेलीं युद्धें होत असतां राजा मानसिंग दक्षिणेंत मरण पावला. काबूल एथें

रोशनये लोक ह्यांनीं इ० स० १६११ ह्या वर्षीं बंड केलें होतें, त्यांतील मुख्य अहदाद, हा मरून तें समाप्तीस गेलें. **अबदुल्लाखान** गुजराथचा सुभेदार ह्याजवर बादशाहाची गैरमर्जी होऊन त्यास धरून हुजूर पाठवावें म्हणून बादशाहाचा हुकूम झाला होता; तो पायीं येऊन शरण आला. त्याविषयीं **शाहाजहान** ह्यानें रदबदली केल्यावरून बादशाहानें त्यावर पुनः कृपा केली.

६. पुढें **शाहाजहान** ह्यानें अजमीराहून दक्षिणेंत स्वारी करून विजापूरच्या बादशाहास
वश करून तो **मलिकंबर** ह्याच्या स्नेहांतून इ० स० १६१७.
फोडिला; त्यामुळें आणि आपल्या हाताखालच्या सरदारांशीं वैमनस्य पडल्यामुळें **मलिकंबर** हा आपला नांवाचा धनी जो **निजामशाहा** त्याच्या तर्फेनें बादशाहास शरण गेला, आणि **नगरचा** किल्ला व सभोंवतालचा प्रांत जो त्यानें पूर्वीं परत घेतला होता तो सोडून देता झाला. हा जय संपादून **शाहाजहान** आपल्या बापाच्या भेटीस **मांदु** एथें गेला. उभयतां एक वर्षपर्यंत गुजराथेंत राहिले, नंतर बादशाहा **शाहाजहान** ह्याजकडे **गुजराथेचें** काम सांगून परत
पंजाबास गेला; व तेथें एक बंड झालें होतें तें इ० स० १६१८.
मोडून **काश्मिरास** गेला.

७. त्या प्रांतांत बादशाहा असतां **मलिकंबर** ह्यानें आपल्या सरदारांस हटवून **बऱ्हाणपुरांत** घाल-
विलें असें त्यास वर्तमान कळलें. त्यावरून इ० स० १६२१.
**शाहाजहान** ह्यास मोठें सैन्य व बहुत द्रव्य

देऊन त्यानें दक्षिणेंत पाठविलें. तो येऊन पोहोंचण्याचे पूर्वीं **मलिकंबर** ह्यानें **नर्मदा** उतरून **मांदु** शहर जाळलें होतें, आणि **शाहाजहान** येत असतां त्याच्या लष्करावर छापे घालण्याचा व दाणा वैरणीचा तोटा पाडण्याचा उपाय केला होता; परंतु **शाहाजहान** ह्यानें शेवटीं लढाई जुंपली तेव्हेळीं **मलिकंबराचा** पराजय केला, आणि पुढें त्यापासून द्रव्य व मुलूख घेण्याचा करार ठरवून त्याशीं तह केला.

८. ह्याच वर्षीं बादशाहास श्वासाचा उपद्रव होऊन तो फार दिवस वांचणार नाहीं असें भय पडलें. त्याच्या मरणाची संधि साधण्याकरितां त्याचा मुलगा **परवीज** हा दरबारास गेला होता; परंतु बादशाहानें त्यावर रागें भरून त्यास परत पाठविलें. **शाहाजहान** हा तिकडे गेला तर नाहीं, परंतु त्याचे कैदेंत त्याचा वडील भाऊ **खुसरू** हा होता तो त्याच संधीस मेला. तो त्यानें मारविला असेल असा संशय उत्पन्न झाला. **शाहाजहान** ह्यानें तर जन्मांत असें क्रूर कर्म केलें नाहीं, ह्यावरून पाहतां तो संशय खोटा असें दिसतें.

९. **शाहाजहान** ह्याच्या पराक्रमामुळें **जहानगीर** ह्याची त्यावर फार प्रीति होती, आणि त्याची राणी **नूरजहान** हिचा भाऊ **असफखान** ह्याचे मुलीशीं त्यानें लग्न केलें होतें; त्यामुळें तिचेंही लक्ष्य त्याकडे असून त्याचे मतलब सिद्धीस जाण्याकरितां ती बादशाहाजवळ भीड खर्चीत असे. त्यामुळें **शाहाजहान** ह्याची उत्तरोत्तर बढती होत चालली होती, परंतु ह्या राणीची

पहिल्या नवऱ्यापासून झालेली मुलगी ती बादशाहाचा धाकटा मुलगा शहरयार ह्यास दिली होती; ह्या जवळच्या संबंधामुळें तिची प्रीति त्यावर शाहाजहानाच्यापेक्षां अधिक बसली. पुढें शाहाजहानाचें वर्चस्व दिवसानुदिवस अधिक होत गेलें असतां आपलें व बादशाहाचें चालणार नाहीं, असें मनांत आणून तिनें शाहाजहान ह्याच्या मानभंगाविषयीं उद्योग करण्याचा आरंभ केला.

१०. नंतर लौकरच कंदहार, इराणी लोकांनीं हस्तगत केलें होतें तें जिंकून परत घेण्याकरितां शाहाजहान ह्यास तिकडे स्वारी करण्याविषयीं बादशाहाचा हुकूम झाला; आणि त्याप्रमाणें तो दक्षिणेंतून मांडू किल्ल्यापर्यंत गेला, परंतु दक्षिणेंत आपला अमल चांगला बसलेला पाहून बादशाहानें आपणास तेथून बाहेर पाठविण्याची मसलत आरंभिली आहे, असें जाणून फौज तयार नाहीं, ह्याकरितां माझें जाणें होत नाहीं, म्हणून त्यानें बादशाहास लिहून पाठविलें. त्यावरून शहरयार ह्याकडे कंदहार घेण्याचें काम सोंपून शाहाजहान ह्यानें आपली फौज त्याकडे पाठवून द्यावी, असा बादशाहानें हुकूम केला, आणि शाहाजहान ह्याच्या हिंदुस्थानांतील जहागिरी जप्त करून त्यानें तितका प्रांत दक्षिणेंत लावून घ्यावा अशी युक्ति केली. बादशाहाच्या ह्या करण्यावरून शाहाजहान ह्यास राग आला; मग मध्यस्थ पाठवून सामोपचाराचा कांहीं उपयोग नाहीं असा त्याचा निश्चय झाल्यावर तो सैन्य घेऊन आग्र्याकडे

निघाला. इकडे बादशाहाहि काश्मीरास गेला होता, तो लाहोरच्या वाटेनें परत येऊन ह्या बंडवाल्यांच्या फौजेवर स्वारी करिता झाला.

११. पुढें उभयपक्षींच्या सैन्याची लढाई मेवात प्रांतांतील जंगलांत होऊन शाहाजहान मागें हटून बऱ्हाणपुरास आला. त्याच्या मागून शहाजादा परवीज व मोहबतखान व खानखानान, ह्या सरदारांनीं येऊन त्याचीं ठाणीं घेतलीं, आणि त्याचा निरुपाय केला. ते-वेळीं पर्जन्य अतिशयित असतां तो शाहाजहान बऱ्हा-णपुराहून निघून तैलंगणाच्या मार्गानें बंगाल्यास गेला. तेथें त्यानें राजमहाल शहरांत बंगालच्या सुभेदाराचा पराजय करून बंगाला आणि बहार हे प्रांत हस्तगत केले; आणि जयपूरच्या राण्याचा भाऊ भीमसिंग ह्या-च्या स्वाधीन फौजेची एक टोळी करून तो प्रयागचा किल्ला घेण्यास पाठविला.

१२. इतक्यांत परवीज व मोहबतखान हे बऱ्हा-णपुराहून प्रयागाकडे जाण्यास निघाले. शाहाजहान त्यांस गांठण्याकरितां भागीरथीस उतरला, परंतु बहार प्रांतांतील लोक त्यास दाणा वैरण मिळूं देईनात. अशा अडचणी पाहून शाहाजहान दक्षिणेंत परत आला, आणि मलिकंबरास मिळून कांहीं दिवसपर्यंत त्यानें युद्ध चालविलें. पुढें बादशाहाच्या सरदारांनीं त्यास हैराण केलें, आणि बहुत फौज आपणास सोडून गेली असें पाहून तो बादशाहास शरण गेला. त्यानें बादशाहाचे आज्ञेप्रमाणें रोटास व अशीरगड हे किल्ले स्वाधीन

करून, पुढील चांगले वर्तणुकीविषयीं खातरी करितां **दारा** व **औरंगजेब** हे दोघे मुलगे ओलीस पाठविले.

१३. इतक्यांत बादशाहा व **नूरजहान** ह्या उभयतांची **मोहबतखान** ह्याजवर गैरमर्जी होऊन त्यानें **बंगाल्यांत** असतां कांहीं लबाडी केली असा आरोप ठेवून त्यांनीं त्याचा जाब पुसण्याकरितां त्यास **दरबारास** बोलावूं पाठविलें. त्यामुळें, व त्याच्या जांवयाची बादशाहानें कारणावांचून फार अप्रतिष्ठा केली होती ह्यामुळें त्याच्या मनांत कपट येऊन त्यानें बादशाहाची स्वारी **जेहलम नदीच्या** कांठीं असतां युक्तीनें एकाएकीं त्याच्या डेऱ्यांत जाऊन त्यास कैद करून आपल्या डेऱ्यांत नेलें. तेव्हां **नूरजहान** हिनें मोठ्या धैर्येंकरून लढाई केली. तीमध्यें तिच्या हौद्याच्या आसमंतात् शस्त्रांची वृष्टि होऊन तिचे मांडीवर तिची लाहान नात असली होती तिला वार लागला, आणि तिचा माहूत मरण पावला व हत्तीच्या सोंडेस जखमही लागली. त्या काळीं तो हत्ती नदींत उडी टाकून कितीएक वेळां गचकळून शेवटीं पलिकडील तीरास गेला ह्याप्रमाणें तिचा पराजय होऊन ती पुढें बादशाहा जवळ जाऊन राहिली आणि कांहीं दिवसांनीं युक्तीनें थोडथोडी फौज जमवून शेवटीं आपल्या चातुर्याच्या बळेंकरून **काबूल** एथें बादशाहास प्रतिबंधांतून मुक्त करिती झाली.

१४. **जहानगीर** ह्याच्या हातीं पुनः सत्ता येतांच **मोहबतखान** त्यास शरण आला. बादशाहानें लागलेंच त्यास **शाहाजहान** ह्यावर पाठविलें; आणि मागून त्यास

धरून आणण्याकरितां फौज रवाना केली. तेव्हां तो व शाहाजहान हे उभयतां समदुःखी होऊन एकमेकांस मिळाले, आणि एकविचारें वागूं लागले. शाहाजहान ह्याचा भाऊ परवीज हाही ह्याच संधीस मृत्यु पावला.

१५. नंतर जहानगीर हा लाहोराहून काश्मीरास गेला होता. तेथें त्यास दम्याचा उपद्रव होऊन तो परत लाहोरास येत असतां त्याच रोगानें मरण पावला.

इ० स० १६२७ अक्टोबर ता. २८

१६. ह्याच्या पूर्वी कांहींवेळ अजीज व खानखानान हे दिल्लीचे सरदार व मलिकंदर हे तिघे मरण पावले.

१७. जहानगिर बादशाहा मद्यपी व विषयी होता, त्यामुळें तो कधीं कधीं कारभारामध्यें बेसावध होत असे. त्यानें नूरजहान ही आपणास मिळावी म्हणून तिच्या नवऱ्यास मारविलें, व आणखी कितीएक दुष्टकर्में केलीं, ह्याशिवाय कांहीं स्वच्छंदपणाही त्यामध्यें होता. तथापि तो भला व उदार असे असें सरटामसरो नामें इंग्लिश बादशाहाचा वकील त्याच्या दरबारांत कांहीं दिवस होता त्यानें लिहिलें आहे. ह्या बादशाहानें आपल्या राज्याची बखर लिहिली आहे, तीमध्यें आपल्या करण्याविषयीं व स्वभावाविषयीं बहुत चमत्कारिक गोष्टी लिहिल्या आहेत.

# प्रकरण ११.

## शाहाजहान बादशाहाची कारकीर्द.

### इ० स० १६२७ पासून १६५८ पर्यंत.

१. जहानगीर मेल्यानंतर असफखान ह्यानें नूरजहान हिला प्रतिबंधांत ठेवून शाहाजहान ह्यास दक्षिणेंतून बोलावणें पाठविलें. शाहाजहान लागलाच जाऊन आग्रा एथें तक्तावर बसला. त्याच्या पूर्वीं खुषरू ह्याचा मुलगा दावर हा असफखान ह्यानें आपल्या मतलबाकरितां उगाच गादीचा अधिकारी केला होता, तो युक्तीनें इराणांत पळून गेला. शहरयार आणि शाहाजादा दानिआल ह्याचे मुलगे ह्यांनीं मिळून लाहोरचा खजीना स्वाधीन करून बंडावा आरंभिला होता, त्यांचा बंदोबस्त असफखान ह्यानें करून त्यांस कैदेंत घालून ठेविलें होतें, त्यांस बादशाहाच्या हुकुमावरून देहांत दंड झाला. इ० स० १६२८.

२. शाहाजहान ह्यानें अधिकारावर येतांच असफखान व मोहबतखान ह्या सरदारांनीं आपणास मदत केली होती, म्हणून त्यांचा मोठा बहुमान केला. बादशाहापुढें साष्टांग नमस्कार वगैरे घालण्याचे सांप्रदाय आलिकडे पडले होते ते शाहाजहान ह्यानें मोडून मुसलमानी धर्मास अनुकूळ अशा कांहीं चाली पुनः प्रवृत्तींत आणिल्या. तशाच त्यानें मुख्य मुख्य शहरांमध्यें थोर थोर इमारती बांधल्या, आणि मोठे मोठे समारंभ

करण्याचें आरंभिलें. त्यांतून तो गादीवर बसलेला दिवस दुसऱ्या वर्षी जेव्हां आला, तेव्हां सुवर्णाच्या तुळा व रत्नाभिषेक व बक्षिसें पोषाक वगैरे मिळून एक कोटी साठ लक्ष रुपयांचा खर्च झाला असें लिहिलें आहे.

३. **काबूल** एथें उजबेक लोकांनीं कांहीं बंड केलें होतें त्याचा बंदोबस्त करण्यांत, व **खानजहान** लोदी नामें कोणी सरदार फितूर होऊन विजापूरचा **महंमद आदिलशाहा**, व **नगरचा मुर्तिजा निजामशाहा**, ह्यांच्या दरबारचा आश्रय करीत कांहीं दिवस फिरत होता, त्याचें पारिपत्य करण्यांत बादशाहाचीं सुमारें तीन वर्षे गेलीं. शेवटीं **बुंदेलखंडांत खानजहान** लोदी ह्याचा पराजय होऊन कोणी एका रजपुतानें त्याचें डोकें भाल्यास लावून बादशाहाकडे नजर पाठविलें.

४. **अहंमदनगर** एथें **मलिकंबराचा** मुलगा **फत्तेखान** ह्यानें **मुर्तिजा निजामशाहा** ह्यास मारून एक लहान बाळक गादीवर बसविला होता, आणि तो कांहीं वेळपर्यंत **शाहाजहान** ह्याचे ताबेदारीनें वागत होता. परंतु पुढें तो फितूर झाला असतां **मोहबतखान** ह्यानें त्यास **दौलताबाद** एथें वेढिलें; मग पुढें त्यानें निरुपाय होऊन दिल्लीच्या सरकारची चाकरी पतकरली, तेव्हां त्यानें बसविलेला बाळराजा ह्यास कैद करून मोंगलांनीं **ग्वालेरच्या** किल्ल्यावर नेऊन ठेविलें. पुढें **शाहाजी भोंसला** ह्यानें **दौलताबाद** व आणखी कांहीं प्रांत परत घेऊन दुसरा एक बादशाहा **अहंमदनगरच्या** गादीवर बसविला होता;

इ० स० १६३०.

परंतु **शाहाजहानानें** दक्षिणेंत येऊन, **विजापुरास** वेढा दिल्यावर तेथील बादशाहानें, आपण वर्षास वीस लक्ष रुपये खंडणी द्यावी, व आपणास निजामशाही राज्यापैकीं कांहीं प्रांत मिळावे असा करार ठरवून घेतला. हें पाहून **शाहाजीही** शाहाजहानाच्या संमतानें **विजापूरकरांच्या** एथें चाकरीस राहिला, आणि **नगरच्या** बादशाहीची समाप्ति झाली. ह्याच्या कांहीं पूर्वीं **गोंवळकोंड्याच्या** राजानें निमाजामध्यें इराणच्या बादशाहाचें नांव उच्चारूं नये, व दरसाल **दिल्लीच्या** सरकारास खंडणी द्यावी, असा करार ठरविला होता.

इ० स० १६३६.

इ० स० १६३७.

५. **कंदहार** एथील इराणी सरकारचा सुभेदार **अलीमर्दानखान** ह्यानें आपल्या राजास कंटाळून तो प्रांत **शाहाजहान** ह्याच्या स्वाधीन केला; म्हणून बादशाहानें त्याचा मोठा सन्मान करून त्यास दरबारांत ठेवून घेतलें. आणि त्यास मोठमोठीं सुभ्याचीं कामें सांगितलीं. त्यानें **दिल्लीस** असतांना कितीएक उपयोगी कामें करविलीं, त्यांपैकीं **यमुनेचा** एक कालवा त्याच्या नांवानें अद्यापि प्रसिद्ध आहे.

इ० स० १६३७.

६. **बल्कप्रांतांत नजर महंमद** ह्याचा मुलगा **अबदुल अजीज** ह्यानें बंड केल्याची संधि पाहून **शाहाजहान** ह्यानें **अलीमर्दानखानास** तिकडे सैन्य देऊन पाठविलें. त्यानें तो प्रांत लुटला परंतु तेथील थंडीनें त्यास तो हस्तगत न होतां परत येणें प्राप्त पडलें. दुसऱ्या वर्षीं बादशाहानें **जगतसिंग** नामें

इ० स० १६४४.

सरदार १४००० रजपूत देऊन त्या मोहिमेवर पाठविला आणि त्याच्या मागून आपणही **काबुलास** गेला. तेथून आपला मुलगा **मुराद** व **अलीमर्दानखान** ह्यासही तिकडे **रवाना** केलें.

इ० स० १६४६.

त्या काळीं **नजरमहंमद** ह्यास इराणांत पळून जाणें प्राप्त झालें, आणि तो प्रांत राज्यांत दाखल करण्याविषयीं बादशाहानें जाहीरनामा लाविला, पुढें लौकरच **अबदुल अजीज** ह्यानें **आकूसस** नदीच्या पलिकडून लुटारू लोक पाठवून तो मुलूख उजाड करण्याचें आरंभिलें. त्याच्या पारिपत्याकरितां बादशाहानें आपला मुलगा **औरंगजेब** तिकडे पाठविला, त्याचा प्रथम कांहीं जय झाला, परंतु लौकरच **बल्कश-हराचा** आसरा त्याला करणें प्राप्त पडलें. अशा प्रसंगीं आपला केवळ अपमान न होतां पुढें द्रव्याचा व माणसांचा नाश नव्हावा ह्यास्तव बादशाहानें असी मसलत केली कीं, आपल्या दरबारांत **नजर महंमद** येऊन राहिला आहे त्यास तेथील राज्याचा अधिकार परत द्यावा. नंतर **औरंगजेब** तेथून **काबुलास** परत आला, त्यास वाटेनें उजबेक लोकांनीं व हजारे लोकांनीं फार उपद्रव दिला, आणि त्याच्या लष्करांतील सर्व बुणगें व घोडे हिरावून घेतले.

इ० स० १६४६.

इ० स० १६४७.

इ० स० १६४७.

७. इराणी बादशाहा **सफी** ह्याच्या कारकिर्दींत आणि त्याचा मुलगा **शाहा अब्बास** हा लहान होता तोंपर्यंत **कंदहार** परत घेण्याचा उद्योग इराणी लोकांकडून झाला नाहीं. पु-

इ० स० १६४८.

ढें शाहा अबास ह्यानें मोठी फौज घेऊन हिंवाळ्यामध्यें कंदहारावर स्वारी केली, आणि अडीच महिनेपर्यंत त्याला वेढा देऊन तें शहर घेतलें. ह्या वेळेस त्या शहराच्या संरक्षणार्थ बादशाहाचा वजीर **सआदुल्लाखान**, व **औरंगजेब** हे निघाले होते, परंतु ते जाऊन पोहोंचल्याच्या पूर्वींच तें शत्रूंच्या हस्तगत झालें होतें. पुढें त्या उभयतांनीं चार महिनेपर्यंत मोठ्या कौशल्यानें किल्ला घेण्याविषयीं पराकाष्ठा केली, परंतु इराणी लोकांनीं बाहेरून दाणा वैरणीचा तोटा पाडला, आणि किल्लेदारांनीं आंतून मोठ्या चातुर्यानें किल्ला राखण्याविषयीं फार मेहनत केली; ह्यामुळें त्यांचा निरूपाय होऊन ते उभयतां वेढा उठवून परत आले. नंतर दोन वर्षांनीं बादशाहानें त्याच उभयतांस मोठें सैन्य स्वाधीन करून त्याच कामावर पाठविलें; परंतु कांहीं उपयोग झाला नाहीं. पुढें बादशाहाचा पहिला मुलगा **दाराशेखो** ह्यानें कीर्ति व जय संपादण्याकरितां **कंदहारावर** स्वारी केली, आणि बाहेर तोफा लागू करून सुरंग वगैरे करण्याचा मोठा प्रयत्न केला. एकवेळां एकाएकीं तटावर चढण्याचाही त्यानें धीर केला; परंतु कांहीं फळ न होतां, त्याची फौज नाश मात्र पावून, त्यास परत **काबुलास** येणें प्राप्त पडलें.

इ० स० १६५२.

इ० स० १६५३.

८. ह्यानंतर दोन वर्षें **शाहाजहान** ह्याचीं स्वस्थपणांत गेलीं. तितक्यांत साऱ्या मुलखाची नवी पाहाणी जी पूर्वीं वीस वर्षांपासून चालली होती, ती संपून

तोडरमल्ल ह्याची शिस्त सर्व ठिकाणीं चालू झाली. ह्याच वर्षीं त्याचा वजीर सआदुल्लाखान मरण पावला. तो मोठा चतुर आणि प्रामाणिक मनुष्य होता.

९. दक्षिणेंतील सुभ्याचें काम शाहाजहान ह्यानें औरंगजेबास सांगितलें. त्यानें हैदराबादच्या बादशाहाचा वजीर, मीरजुमला, ह्यास अनुकूळ करून घेऊन त्याच्या मसलतीनें आपल्या मुलाच्या लग्नाकरितां बंगाल्यास जाण्याचें मिष करून एकाएकीं तेथील बादशाहा अबदुल्लाशाहा ह्यास कपटेंकरून वेढिलें.
इ० स० १६५६. तेव्हां त्याचा निरुपाय होऊन तो शरण आला, आणि त्यानें आपली मुलगी औरंगजेबाचा मुलगा सुल्तान महंमद ह्यास द्यावी, व दरवर्षास दिल्लीच्या सरकारास एक कोटी रुपये द्यावे वगैरे नम्रतेचे करार करून दिले. ह्याप्रमाणेंच विजापूरचा महंमद अदिलशाहा मेल्यावर त्याचा मुलगा, अल्ली हा तेथें राज्य करीत होता, त्यावरही औरंगजे-
इ० स० १६५८. बानें कारणावांचून हल्ला केला; आणि ब्रेदर वगैरे कांहीं प्रांत औरंगजेबाचे हस्तगत झाल्यामुळें तो शरण आला.*

१०. इतक्यांत शाहाजहान दुखण्यांत पडला. तेव्हां दारा हा सर्व राज्यकारभार करूं
इ० स० १६५८. लागला, असें वर्तमान ऐकतांच औरंगजेबाचें चित्त व्यग्र झालें. नंतर त्याचा भाऊ

* ह्या लढायांचें सविस्तर वर्त्तमान मराठ्यांचे बखरेंत चौथ्या भागीं पाहावें.

मुराद गुजराथच्या सुभ्याच्या कामावर होता, त्यास गादीवर बसविण्याची भुलथाप देऊन ते दोघे मिळून हिंदुस्थानास जाण्यास निघाले, त्या उभयतांची गांठ माळव्यांत पडून शिप्रा नदीच्या कांठीं त्यांची आणि दारा ह्याचा सरदार राजा जसवंतसिंग ह्याची मोठी लढाई होऊन उभयतां शाहाजादे जय पावले.

११. ह्याच्या पूर्वींच शाहाजहानाचा दुसरा मुलगा बंगालचा सुभेदार सुजा, हाही काशीपर्यंत आला होता; परंतु दारा ह्याचा मुलगा, सुलेमान, ह्यानें त्याचा पराजय केल्यामुळें त्यास परत बंगाल्यांत जाणें प्राप्त झालें. नंतर औरंगजेब व मुराद हे युक्तीनें चंबळा नदी उतरून आग्र्यापासून एके मजलेवर जाऊन पोहोंचले असतां दारा ह्यानें समगड एथें त्यांशीं युद्धप्रसंग केला. त्यांत औरंगजेबाकडे सुमारें तीस पस्तीस हजार स्वार होते, व दारा ह्याच्या पक्षाचें दुप्पट सैन्य होतें. शिवाय बहुत हत्ती व तोफा होत्या.

इ० स० १६५७.

इ० स० १६५८.

१२. ह्या युद्धांत औरंगजेब मध्यभागीं होता, आणि त्याच्या पुढें तोफांची हार लाविली होती. ती फोडण्याकरितां दारा ह्यानें दोन वेळ हल्ला केला असतां कांहीं उपाय चालला नाहीं. इतक्यांत मुराद ह्याजवर २००० उजबेक लोकांनीं मोठ्या वेगानें बाणांची वृष्टि चालविली; ती सोसून तो कांहींसा सावध होतो आहे, इतक्यांत रजपुतांचे एके टोळीनें त्यावर हल्ला केला,

आणि त्यांचा राजा, **रामसिंग**, हा केशरी पोषाख करून व मोत्यांचा तुरा लावून लढत होता, त्यानें पुढें होऊन आपली बर्ची **मुरादावर** फेंकली; ती त्यानें ढालेवर संभाळून एका तिरानें त्यास मारून खालीं पाडलें. तें पाहून रजपूत लोक संतापून फार निकरानें लढले आणि त्यांच्या राशी **मुराद** ह्याच्या हत्तीच्या सभोंवत्या पडल्या. पुढें **दारा** ह्यानें आपल्या सैन्याचे संख्येच्या योगानें **मुरादाच्या** सैन्याची फळी फोडून त्याची कांहींसी दाणादाण केली. इकडे **औरंगजेब** आपल्या जागीं कायम राहून जेथें जेथें भय दृष्टीस पडलें तेथें तेथें आपला हत्ती नेऊन आपल्या सैन्यास ईश्वरावर भरंवसा ठेवून लढण्याविषयीं धीर देत होता. त्या वेळीं युद्धाची मोठी गर्दी चालली असतां राजा **रूपसिंग** ह्यानें घोड्यावरून उडी टाकून **औरंगजेब** ह्याच्या हत्तीचा तंग कापण्याचा उद्योग आरंभिला. त्याचा धीटपणा पाहून **औरंगजेब** संतुष्ट होऊन त्यास मारूं नका म्हणून त्या गर्दींतही बोलला; परंतु त्याचा शब्द ऐकूं येण्याच्या पूर्वीं त्याचे तुकडे तुकडे होऊन तो पडला. पुढें लौकरच **दारा** ह्याच्या हत्तीस बाण लागल्यामुळें तो खालीं उतरून घोड्यावर बसला. तेव्हां तो पडला असा त्याच्या लष्करांत पुकारा होऊन धांदल झाली, आणि शेवटीं लष्करास पळ सुटला. तो संध्याकाळीं दोन हजार स्वारांसहित परत **आग्र्यास** जाऊन पोहोंचला. त्याचे फौजेंतून इतकेच बाकी राहिले, त्यांतही बहुतेक जखमी झाले होते.

१३. इकडे युद्ध संपल्यावर **औरंगजेब** **मुरादाज-**

वळ गेला. ह्याचा हौदा तिरांनीं चहूंकडून फुगलेला होता. त्याच्या तोंडाचें रक्त पुसून त्यास राज्य प्राप्त झालें म्हणून **औरंगजेबानें** आपणास मोठा संतोष झाला असें दाखविलें. इ० स० १६५९
पुढें तीन दिवसांनंतर ते उभयतां **आग्र्यास** पोहोंचले. नंतर कांहीं दिवसांनीं आपल्या बापास प्रतिबंधांत ठेवून त्याजजवळ कोणाचा प्रवेश होऊं नये असा बंदोबस्त केल्यावर, एके दिवशीं रात्रीस **औरंगजेबानें मुराद** ह्यास पुष्कळ दारू पाजून, तो उन्मत्त झाला असतां त्याचीं शस्त्रें काढून घेऊन, त्यास हत्तीवर बसवून **दिल्लीच्या** किल्ल्यावर पाठवून दिलें. नंतर लौकर आपण बादशाहा झाल्याची दंवडी पिटविली; आणि पुढें एक वर्षानें आपल्या नांवाचा शिक्का पाडून तक्तावर बसण्याचा समारंभ केला.

१४. ह्या रीतीनें **शाहाजहान** ह्याचें राज्य समाप्तीस गेल्यानंतर त्यानें सात वर्षें प्रतिबंधांत आयुष्य घालविलें. त्यानें लहानपणीं बापाशीं विरोध केला होता, आणि त्यास ऐष आरामाची आवड होती, ह्यामुळें तो गुणी पुरुष नव्हता असें वाचणाऱ्यांस कदाचित् वाटेल, परंतु राज्याच्या बंदोबस्तांत व चांगले कामदार ठेवून त्यांजवर जरब राखण्यांत, व प्रजेस सुख देण्यांत त्याची बरोबरी **अकबरासही** नाहीं असें निष्पक्षपात बखर लिहिणाऱ्यांनीं म्हटलें आहे. कोणी द्रव्यवान् झाला म्हणून त्याचें द्रव्य सरकारांत लुटून आणिलें असें इतर राजांच्या कारकिर्दीप्रमाणें **शाहाजहानाचे** वेळेस कधीं

घडलें नाहीं, आणि तो सर्व प्रजेला पुत्रवत् मानी, असें कोणी युरोपियन ग्रंथकारानें लिहिलें आहे.

१५. **शहाजहान** ह्यास मोठ्या मोठ्या इमारती बांधण्याची व शोभेची फार आवड होती. त्यानें **दिल्ली** एथें पूर्वींच्या शहरापेक्षां शोभायमान असा एक पुरा वसविला, त्यांत मोठ्या मोठ्या संगमरवरी दगडांच्या व सोनेरी घुमटांच्या अशा इमारती बांधिल्या होत्या, आणि रस्ते बांधून त्यांच्या कांठानीं झाडें लावून बाजार वसविले होते. ह्या इमारतींतील मोठी भव्य अशी एक मशीद त्यानें बांधलेली अद्यापि आहे, आणि **आग्रा** एथें त्यानें संगमरवरी पाषाणांचा बांधलेला जो **ताजमहाल** नामें वाडा आहे, तो बांधण्याचा खर्च, त्याची शोभा किंवा कारागिरी ह्यांचा विचार केला असतां त्या महालाचे बरोबरीची इमारत पृथ्वींत कोठेंही नाहीं, असें म्हणण्यास चिंता नाहीं.

१६. **शाहाजहान** ह्यानें माणिकें, पाचा, हिरे, नीळ, इत्यादि रत्नांहीं करून खचित असें एक मयूरासन केलें होतें. तें पाहतांच त्याच्या दरबारांत नव्यानें जाणाऱ्याचे डोळे दिपत असत. त्यास सुमारानें साडे साहा कोटि रुपये लागले असतील असें कोणी युरोपियन जवाहिऱ्यानें पाहून लिहिलें आहे. ह्याशिवाय **शहाजहानाचा** लवाजमा व देणग्या व दरबारचा खर्च, ह्याच प्रमाणें अतिशयित असतां व **कंदहार** व **बल्क** ह्यांच्या स्वाऱ्यांचा खर्च बहुत असतां, व पगार खाणारे दोन लक्ष स्वार नेहमीं चाकरीस असतां, त्याच्या राज्याचे अखेरीस

खजिन्यांत चोवीस कोटि* रुपये नक्त आणि सोनें, रुपें, जवाहीर हीं मनस्वी शिलक होतीं.

१७. **शाहाजहान** स्वभावानें भला, व किंचित् भोळा असे; म्हणून मुलांवर फार विश्वास ठेविल्यामूळें तो फसला. त्यानें तीस वर्षें राज्य केलें. तो पदच्युत झाला तेव्हां त्याच्या वयास ६७ वर्षें होतीं.

---

## प्रकरण १२.

### औरंगजेब बादशाहा.

इ० स० १६५८ पासून १७०७ पर्यंत.

१. **औरंगजेब** गादीवर बसल्यानंतर तो चार वर्षेंपर्यंत आपल्या भावांचा बंदोबस्त करण्याच्या उद्योगांत होता. त्याचा वडील भाऊ **दारा** हा **लाहोराहून मुलतानच्या** वाटेनें **गुजराथेंत** जाऊन तेथें आपणास बादशाहा म्हणवूं लागला; परंतु **औरंगजेबानें जयपुरा**-जवळ त्याचा पराजय केल्यामुळें तो **गुजराथेंतून** पळून **सिंधेंत** गेला. तेथील **जूनच्या** राजानें त्यास कैद करून **औरंगजेबाकडे** पाठविलें. त्यास पुढें लौकरच कैदेंत मारून त्याचें प्रेत शहरांतून हिंडविलें. त्याचा दुसरा भाऊ **सुजा** हा पंचवीस हजार स्वार व कांहीं

---

* शाहाजहानाच्या राज्याचा वसूल बत्तीस कोटि रुपये येत होता, म्हणजे इंग्रेजांच्या राज्यापेक्षां दाहा कोटि रुपये अधिक येत होते.

तोफा घेऊन दिल्लीवर स्वारी करीत असतां, **प्रयागा-जवळ औरंगजेबानें** त्याचा पराजय करून त्याच्या लष्करांतून ११४ तोफा व बहुत हत्ती हस्तगत केले. ह्या लढाईंतून पळून गेल्यावर **सुजा** हा कांहीं दिवस-पर्यंत **बंगाल्यांत** टिकाव धरून होता, व **औरंगजेबाचा** वडील पुत्र थोडा वेळपर्यंत त्यास जाऊन मिळाला होता; परंतु पुढें तो शाहाजादा परत आपल्या बापाजवळ गेल्यावर **सुजा** ह्यास **आराकान** प्रांताकडे पळून जाणें प्राप्त पडलें. तेथें तो व त्याच्या कुटुंबांतील माणसें सर्व प्राणांस मुकलीं. पुढें लौकरच त्याचा तिसरा भाऊ **मुराद** हा कैदेमध्यें असतां त्यावर कोणीं हलक्या माणसानें फिर्याद केल्याचें निमित्त करून त्यास बादशाहा-नें ठार मारिलें, आणि **मुराद** ह्याचा धाकटा मुलगा, आणि **सुलेमान** व **सफर** ह्या नांवांचे दारा ह्याचे दोन मुलगे ग्वालेरच्या किल्ल्यावर कैदेंत होते, त्यांस जीव-दान देण्याचें **औरंगजेबानें** कबूल केलें असतां तेही थोडक्या दिवसांत नाहींसे झाले.

२. नंतर **औरंगजेब** ह्यानें **बिकानीर** एथील राजाचें पारिपत्य करून **मीरजुमला** ह्यास

इ० स० १६६१. फौजेसहित **आसाम** घेण्यास पाठविलें; परंतु तो देश हस्तगत झाला नाहीं. तेथील राजानें खंडणी वगैरे देण्याचें मात्र कबूल केलें. त्या स्वारींतून परत आल्यावर **मीरजुमला** मरण पावला. त्याच्या अधिकारावर **औरंगजेबानें** त्याचा

इ० स० १६६३. मुलगा **महंमद अमीन** ह्यास नेमिलें.

३. ह्यावेळेस मराठ्यांच्या राज्याचा पाया घालणारा शिवाजी हा १२५ कोस लांब कोंकणपट्टी व पुण्याचे उत्तरेपासून मिरजेपर्यंत मुलूख घेऊन ७००० स्वार व ५०००० पायदळ बाळगून होता; त्याचें पारिपत्य करण्याविषयीं विजापूरकरांचा उपाय थकला होता, आणि औरंगजेबानें दक्षिणेंतून दिल्लीस जाते वेळेस त्याजकडे जाहागिरी चालविण्याविषयीं वचन दिल्यासारखें केलें होतें.

४. पुढें शिवाजी व औरंगजेब ह्यांमध्यें विरोध पडून बादशाहाचा सुभेदार षाहिस्तखान औरंगाबादेस राहत होता तो व राजा जसवंतसिंग ह्या उभयतांनीं येऊन पुणें घेतलें. त्यांवर रात्रीचे वेळेस शिवाजीनें आपल्या मावळे लोकांसहित सिंहगडाहून येऊन छापा घातला. पुढें षाहिस्तखानास बंगाल्याचें काम देऊन बादशाहानें आपला मुलगा मोअज्जीम ह्यास दक्षिणेस पाठविलें. त्याचें कांहीं न चालतां शिवाजीनें सुरत लुटली. पुढें त्याचा बाप शाहाजी हा मेल्यावर, व त्याची जाहागीर तंजावर प्रांत हस्तगत झाल्यावर, त्यानें एकवेळ जाहाजांतून मलबारापर्यंत स्वारी करून बारसिलूर शहर लुटलें. मक्केस जाणाऱ्या यात्रेकऱ्यांचीं त्यानें कितीएक जहाजें धरिलीं, आणि आपणांस राजा म्हणविण्याचा आरंभ करून आपल्या नांवाचे शिक्के पाडिले. ह्याप्रमाणें शिवाजीचा उत्कर्ष होत चाललेला पाहून औरंगजेबास क्रोध येऊन

इ० स० १६६४

त्यानें **जयसिंग** व **दिलीरखान** असे दोन सरदार त्याच्या पारिपत्याकरितां पाठविले. त्यांनीं त्याशीं **सिंहगड** वगैरे जागीं युद्ध केल्यावर **शिवाजीनें** थोड्या लोकांसहित **जयसिंगाचे** छावणींत जाऊन करार ठरविला, त्यांत असें ठरलें कीं कांहीं किल्ले शिवाय करून **शिवाजीनें** दरोबस्त मुलखाचा उपभोग करून बादशाहाची ताबेदारी कबूल करावी. बादशाहानें **शिवाजीचा**
इ० स० १६६५ मुलगा **संभाजी** ह्याच्या नांवें पांच हजार स्वारांची सरदारी सांगावी. व बादशाहाच्या प्रांतांतून जो वसूल येईल त्याची त्यानें चौथाई द्यावी. असे करार त्यानें सांगून पाठविले, ते सर्व चौथाई शिवाय बादशाहानें कबूल करून **शिवाजीस** पत्र पाठविलें. नंतर दोन हजार स्वार व आठ हजार पायदळ घेऊन त्यानें **जयसिंगाबरोबर** जाऊन विजापूरकरांशीं ल-
इ० स० १६६६ ढाई केली. पुढें **औरंगजेबाचे** मर्जीस्तव तो निवडक ९०० स्वार व १००० मावळे लोक बरोबर घेऊन **दिल्लीस** गेला, तेथें त्याचा बहुमान न करितां औरंगजेबानें त्यास प्रतिबंधांत ठेविल्याप्रमाणें केलें. तेणेंकरून त्यास वाईट वाटून तो युक्तीनें तेथून पळून आला. इकडे **जयसिंग** ह्यानें कांहीं दिवस विजापूर घेण्याविषयीं यत्न केला; तो सिद्धीस
इ० स० १६६७ न जातां जयसिंग मरण पावला. त्यानंतर **औरंगजेबाकडून मोअज्जीम, व जसवंतसिंग,** व **दिलीरखान,** हे तिघे दक्षिणेंतील कारभार करीत असतां **शिवाजीनें** जसवंतसिंग ह्यास अनुकूळ करून

घेऊन, त्याच्या द्वारें आणखी एक वेळ औरंगजेबाशीं स्नेह केला. तेवेळेस औरंगजेबानें शिवाजीचे सर्व अपराध क्षमा करून त्याचें जुनें राज्य त्याकडे चालवावें असें केलें, आणि त्यास आणखीहि कांहीं मुलूख दिला.

५. पुढें दोन वर्षेंपर्यंत शिवाजीनें विजापूर व गोंवळकोंडें एथील संस्थानाकडून खंडणी घेण्याचा व आपल्या राज्याचा बंदोबस्त करण्याचा उद्योग केला. नंतर आपणास धरण्याविषयींची मसलत आहे, असें जाणून शिवाजीनें सिंहगड वगैरे किल्ले परत घेऊन सुरत शहर व खानदेश प्रांत लुटून, मुलुखांतून चौथाई वसूल केली. हें पाहून औरंगजेबानें ४०,००० फौज देऊन मोहबतखान नामें एक सरदार पाठविला, त्याशीं शिवाजीनें युद्धप्रसंग करून त्याचा केवळ पराजय केला. नंतर ह्यापुढें औरंगजेबानें मोहबतखान व मोअज्जीम ह्या उभयतांस परत बोलावून गुजराथचा सुभेदार खानजहान ह्यास दक्षिणेंत पाठविलें. इ० स० १६७०.

६. इतक्यांत काबूल एथें बंड होऊन तेथील सुभेदार ह्याचा मोड झाला. तिकडे औरंगजेबानें आपला मुलगा सुलतान व दुसरे सरदार ह्यांस पाठविलें, आणि तिकडे दोन वर्षेंपर्यंत लढाई चालली; परंतु शेवटीं तेथील अफगान लोकांचा बंदोबस्त पक्का न होतां ती लढाई समाप्त करण्याचा प्रसंग आला. इ० स० १६७५.

७. पुढील वर्षी **सतनरामी** नामें हिंदु बैराग्यांनीं **दिल्ली**-जवळ मोठें बंड केलें, त्यांत त्यांच्या कितीएक
इ० स० हजार लोकांनीं निकरानें लढून बादशाही
१६७६. फौजेचा एक दोन वेळ मोड केला. त्यामुळें त्यांजवळ जादूगिरी आहे, असा लौकिक होऊन बहुत जमीदार वगैरे लोक त्यांस मिळाले. त्यांपुढें बादशाही फौज उभी राहीना, म्हणून **औरंगजेबानें कुराणांतील** वाक्यें कागदावर लिहून जरीपटक्यास बांधिलीं, आणि त्याच्या कितीएक सरदारांनीं लढण्याची पराकाष्ठा करून बंडवाल्यांचा मोड केला.

८. **औरंगजेब** ह्यानें मुसलमानी धर्माचा पक्ष धरून आपल्या हिंदुप्रजेस फार पीडा देण्याचें आरंभिलें होतें. हिंदूंच्या जत्रा भरूं नयेत, असा त्यानें हुकूम केला, व मुसलमानास जकात वगैरे माफ केली; ती माफी हिंदु लोकांस केली नाहीं. तसाच हिंदु लोकांस सरकार-कामांत ठेवूं नये अशी सर्व कामदारांस आज्ञा पाठविली; आणि **जजिया**नामें शिरगणतीचा कर त्यांजवर फिरून बसविला. ह्यामुळें सर्व प्रजा नाराजी होत होती, इतक्यांत रजपूत संस्थानी लोकांस विषम वाटण्यास दुसरें एक कारण झालें.

९. तें असें कीं, **जोदपूरचा जसवंतसिंग** हा **का-बुलास** मरण पावला. त्याची राणी व मुलें
इ० स० ह्यांस बादशाहानें प्रतिबंधांत ठेविलें. तीं
१६७९. पुढें त्याच्या लोकांचा सरदार **दुर्गादास** ह्यानें चोरून **जोदपुरास** पोहोंचतीं केलीं खरीं; परंतु बादशा-

हानें जोदपूरच्या संस्थानाशीं कपट केलें, व कर बसविला ह्या कारणामुळें उदेपूरचा राजा, राजसिंग ह्यानें जोदपूरचा पक्ष स्वीकारला, आणि जजिया देण्याचें नाकबूल केलें. औरंगजेबानें स्वत: त्यावर स्वारी करून त्याकडून जजियाच्या ऐवजीं पैका घेतला, आणि त्यानें जोदपूरचा अजितसिंग ह्यास मदत करूं नये, असा करार करून घेऊन आपण परत दिल्लीस गेला. तो तेथें पोहोंचला नाहीं तों उदेपूरच्या राण्यानें तह मोडला, असें वर्तमान समजून तो परत अजमीरास आला; आणि आपला मुलगा मोअज्जीम ह्यास दक्षिणेंतून, व अजीम ह्यास बंगाल्यांतून आणवून त्यानें उदेपूरच्या राण्यास आपली राजधानी सोडण्याचें व पाहाडांत जाऊन राहण्याचें प्राप्त केलें. नंतर त्यास दाणापाणी मिळूं नये म्हणून गांव जाळावे, झाडें तोडावीं, व रजपुतांचीं बायकामुलें धरून न्यावीं, असा उद्योग त्यांनीं आरंभिला; तेणेंकरून कांहीं वेळपर्यंत रजपूत नम्र झाले खरे; परंतु अशा त्यांच्या कृत्यामुळें व औरंगजेबाच्या धर्माभिमानामुळें, त्यांची दिल्लीच्या दरबारावरून भक्ति जी उडाली ती पुन: कधीं बसली नाहीं. आणि पूर्वीप्रमाणें बादशाहास कुमक करावयाची सोडून त्यांनीं पुढें द्वेष करण्याचें आरंभिलें.

१०. औरंगजेबाबरोबर जोदपूरचे २५,००० राहटोर स्वार व पायदळ ह्यांसहित रजपूत लोक लढून त्यांस हैराण करीत असतां पूर्वीं लिहिलेल्या दुर्गादासानें एकाएकीं त्याचा सर्वांहून लहान मुलगा अकबर ह्यास फितूर करून त्यासच बाद- इ० स० १६८१.

शाहा असा किताब दिला, आणि पुढें कितीएक मोठे मोठे सरदार, व ७०,००० लष्कर जमवून बादशाहाशीं उघड लढाई करण्याचा उद्योग आरंभिला. परंतु तो सिद्धीस न जातां **अकबराचा** मुख्य सरदार **तोहवरखान** व आणखी लष्करांतील कितीएक लोक फितूर होऊन **औरंगजेबाकडेस** गेले, व **तोहवरखान** ह्यास **औरंगजेबानें** ठार मारिलें, ह्या दहशतीमुळें सर्व लष्कराची फाटाफूट होऊन **अकबर गुजराथच्या** पाहाडामध्यें कितीएक दिवस लपून राहिला. शेवटीं **दुर्गादास** व त्याचे इमानी ५०० रजपूत ह्यांसहवर्तमान **कोंकणांतून** जाऊन त्यानें **शिवाजीचा** आश्रय केला.

११. इकडे रजपुतांशीं लढाई चाललीच होती, तिजमध्यें मुसलमानांनीं फार क्रूर कर्मे करून रजपुतांस जेरीस आणिलें. तसेंच त्या द्वेषानें रजपुतांनींही मशीदी लुटल्या, कुराणें जाळलीं, आणि मुल्ले लोकांची अप्रतिष्ठा केली. शेवटीं उभयपक्षीं लढाईचा कंटाळा येऊन तह झाला. त्यांत **जोतपूरचा अजितसिंग** हा मोठा होईल त्यावेळीं त्याचा मुलूख त्यास परत द्यावा व उदेपूरच्या राण्यानें **अकबरास** मदत केली म्हणून त्यानें आपल्या मुलखांपैकीं कांहीं मुलूख बादशाहास द्यावा असें ठरलें.

१२. ह्या लढाईंत **औरंगजेब** गुंतला असतां इकडे **शिवाजीनें** **कोंकणपट्टी** व घांटमाथ्यावरील कृष्णेपर्यंत मुलूख हस्तगत केला. आपणास **रायगड** एथें राज्याभि-

षेक करून घेतला, व नर्मदेपलीकडे वऱ्हाड प्रांतांत एक वेळ स्वारी करून मोंगलांस भयप्रदर्शन केलें, नंतर गोंवळकोंडयाच्या बादशाहाशीं इ० स० १६७५. स्नेह करून त्याच्या मुलखांतून तीस हजार स्वार व चाळीस हजार पायदळ ह्यांसहित तो कर्नोल येथें कृष्णा उतरला. तेथून त्यानें कडप्याच्या वाटेनें करनाटकांत जाऊन जिंजी, वेलूर, इ० स० १६७७. आर्णी, वगैरे किल्ले घेऊन त्या प्रांतांतील आपल्या बापाच्या वेळची सर्व जाहागीर परत घेतली, आणि तिचा उपभोग आपला धाकटा भाऊ व्यंकाजी ह्यानें करून, निमे वसूल आपणास द्यावा असा ठराव करून घेतला. तिकडून परत येतांना त्यानें बल्लारी व अद्वानी हे प्रांत घेतले. ती स्वारी करून तो १८ महिन्यांनीं परत रायगडास आला. पुढें इ० स० १६७८ औरंगजेबाचा सरदार दिलीरखान ह्यानें विजापुरास वेढा दिल्यामुळें तेथील कारभाऱ्यानीं शिवाजीसही कुमकेस बोलाविलें; परंतु शिवाजीचा मुलगा संभाजी दिलीरखानाच्या लष्करांत उठून गेल्यामुळें शिवाजीस कांहीं वेळपर्यंत काय करावें म्हणून विचार पडला. पुढें थोडक्याच वेळानें संभाजी आपल्या बापाकडे परत निघून आल्यावर शिवाजीनें विजापूरकरांस मदत करून दिलीरखानास उठ- इ० स० १६८० वून लाविलें. ह्या चाकरीबद्दल तुंगभद्रा व कृष्णा ह्यांच्या मधील मुलूख त्यास मिळाला. पुढें लौकरच तो मरण पावला.

१३. शिवाजीच्या मागें त्याचा मुलगा संभाजी गादीवर बसला. त्यानें कांहीं दिवसपर्यंत जंजीरा एथील शिद्दी ह्यांशीं लढाईमध्यें गुंतून घाटावर मुलुखामध्यें अव्यवस्था होऊं दिली; आणि पूर्वीच्या द्वेषावरून शिवाजीचे विश्वासू मसलत सांगणारे व सरदार होते त्यांतून कितीएकांस ठार मारिलें. तसेंच कलुषा नामें काणी हिंदुस्थानी ब्राह्मण ह्याच्या नादास लागून त्यानें व्यसनाकडे बहुत पैका खर्चिला.

१४. इतक्यांत औरंगजेब रजपूत राजांशीं तह करून दक्षिणेंतील संस्थानें घेण्याकरितां ब-

इ० स० १६८३ ऱ्हाणपुरास आला. तेथून त्यानें आपला मुलगा अजीम ह्यास फौज देऊन चांदवडाच्या डोंगराजवळचा मुलूख घेण्यास पाठविलें, आणि दुसरा मुलगा मोअज्जीम ह्यास ४०,००० स्वार देऊन कोंकणांत रवाना केलें. त्या फौजेस संभाजी-

इ० स० १६८४ नें दाणापाण्याचा तोटा पाडल्यामुळें बहुतकरून सर्व फौज खराब झाली. शेवटीं मोअज्जीम थोड्या लोकांसहित कृष्णेच्या कांठीं वाळवें एथें येऊन राहिला; तेथें कांहीं सांत उत्पन्न होऊन त्याच्या राहिलेल्या फौजेचा फार नाश झाला.

१५. पुढील वर्षी अजीम ह्यानें विजापुरावर हल्ला केला आणि त्याच्या कुमकेस मागून औरंगजेबही तिकडे गेला. मोअज्जीम ह्यानें गोंवळकोंडें एथील बादशाहा, अबुलहसन, ह्यावर स्वारी केली. त्याचा सेनापति इब्राहिमखान, हा फितूर होऊन मोअज्जी-

**माकडे** आल्यावर त्या संस्थानचा फडणीस, **मदनपंत**, हा शहरांत बखेडा झाल्यामुळें प्राणास मुकला. नंतर तो **मोअज्जीम** तीन दिवसपर्यंत हैदराबाद लुटून, बादशाहाकडून पुष्कळ पैका घेऊन, त्याशीं तह करून, परत गेला. इकडे **औरंगज़ेब विजापुरास** वेढा घालून आंतील लोकांस दाणापाण्याचा तोटा पाडून लौकरच किल्ल्याचा तट फोडून आंत शिरला आणि तेथील अल्पवयी बादशाहा ह्यास कैद करून त्या राज्याची
समाप्ति करिता झाला. **गोंवळकोंड्याशीं** इ० स० १६८६.
जो पूर्वीं तह झाला होता तोही नंतर लौकर मोडून यात्रेस जाण्याचे मिषानें **औरंगजेबानें** फौजेसहित तिकडे स्वारी केली. प्रथम त्यानें त्या राजाकडून पुष्कळ जवाहीर व द्रव्य घेऊन नंतर त्याचे कारभारी व फौज फितूर केली, आणि तो काफर
लोकांस आश्रय देतो असा जाहीरनामा लावून इ० स० १६८७.
शहरास वेढा दिला. तथापि **अबुलहसन** ह्यानें सात महिनेपर्यंत टिकाव धरिला. शेवटीं फितूरानें **गोंवळकोंडें** हस्तगत होऊन तेथील
राज्याची समाप्ति झाली. नंतर थोडक्याच इ० स० १६८८.
काळांत **औरंगजेबानें** मराठे व विजापूरकर व गोंवळकोंडेकर ह्यांचा तंजावरपर्यंत मुलूख घेतला.

१६. ह्याच्या पूर्वीं **औरंगजेबाचा** मुलगा, **अकबर, संभाजी** जवळ येऊन राहिला होता,
परंतु त्याची अव्यवस्था पाहून तो **इराणास** इ० स० १६८९.
निघून गेला. पुढें घाटावरील बहुत करून मुलूख मोंगलांच्या स्वाधीन झाला. शेवटीं **संभाजी**

**कोंकणांत संगमेश्वर** एथें असतां **औरंगजेबाच्या** सरदार **तुकारबखान** ह्यानें एकाएकीं त्यावर स्वारी करून त्यास धरून **औरंगजेबाकडे** पाठविलें. त्यास **औरंगजेबानें** मुसलमान होण्याविषयीं सांगितलें, तेव्हां **औरंगजेबास** व त्याच्या पैगंबरास तो फार दुरुत्तरें बोलिला. त्यावरून **औरंगजेबानें** त्याचे डोळे फोडून जीभ कापून त्याचा मित्र **कलुषा** ह्यासहवर्त्तमान त्याचा शिरच्छेद करविला.

१७. **संभाजी** मेल्यावर मोंगलांनीं लौकरच फितुरानें **रायगड** किल्ला घेतला. त्यांत त्याचा मुलगा **शाहु** मोंगलांच्या हस्तगत झाला. तेवेळीं त्याचा चुलता **राजाराम** ह्यानें त्याच्या नांवानें कारभार करावा असें ठरवून सरदारांनीं त्याच्या जिवाचें संरक्षण होण्याकरितां त्यास **करनाटकांत जिंजी** एथें पाठविलें. हें वर्त्तमान **औरंगजेबास** समजल्यावर त्यानें तो किल्ला घेण्याकरितां **झुल्फिकारखान** सैन्यासहित तिकडे रवाना केला; परंतु तो तेथें गेल्यावर किल्ल्यास घेरा देण्यापुरती फौज त्याजवळ नसल्यामुळें त्याचें कांहीं चाललें नाहीं. इकडे **राजाराम** ह्याच्या हुकुमावरून त्याचे सरदार **संताजी घोरपडे** व **धनाजी जाधव**, व **सातारा** एथील कारभारी **रामचंद्रपंत** व दुसरे मराठे सरदार, हे मुलूख लुटून चौथ व घासदाणा ह्यांबद्दल खंडण्या घेऊं लागले. त्यांनीं जिकडे तिकडे मुलखांत लूट करून **औरंगजेबाचा** खजीना **हिंदुस्थानांत** जात असतां तो त्यांनीं कित्ती एक वेळ हस्तगत

इ० स० १६९२.

इ० स० १६९३.

इ० स० १६९४.

केला. ह्यामुळें **औरंगजेबानें** आपला मुलगा **कामबक्ष** हा विजापुरापलिकडे **वाकिनखेड** किल्ला घेण्याच्या उद्योगांत होता, तेथून त्यास **जिंजीवर** रवाना केलें. त्याच्या बरोबर **झुल्फिकारखान** ह्याचा बाप **असदखान** नामें सरदार दिला. तो **झुल्फिकारखान** व **कामबक्ष** ह्या उभयतांमध्यें कांहीं वैमनस्य पडलें; इतक्यांत **संताजी घोरपडा** व **धनाजी जाधव** ह्या उभयतांनीं निवडक वीस हजार मराठे स्वारांसहित **करनाटकांत** जाऊन मोंगलांच्या लष्करास दाणापाण्याचा तोटा पाडून **औरंगजेब** मेल्याचें वर्त्तमान उठविलें, आणि **कामबक्ष** ह्याशीं कांहीं स्नेहाचें बोलणें लाविलें. तें **झुल्फिकारखानास** कळल्यावर त्यानें **कामबक्ष** ह्यास प्रतिबंधांत ठेविलें. तें वर्त्तमान लष्करांत प्रसिद्ध होतांच लोकांनीं आपले मोर्चे सोडून देऊन वेढा उठविला. नंतर मराठ्यांच्या लष्करानें उलटा त्यांस घेरा घातला; आणि पुढें मोंगलांच्या लष्करानें जवळ वंदिवाश नामें खेडें आहे तेथें **औरंगजेबाचा** हुकूम येईपर्यंत राहावें असा करार ठरला. इ० स० १६९७.

१८. **औरंगजेब दक्षिणेकडेस** आल्यावर प्रथम कांहीं वेळपर्यंत कृष्णेच्या कांठीं **गलगल्यास** होता तेथून पंढरपुराजवळ **ब्रह्मपुरीस** कायम छावणी घालून राहिला असतां दक्षिणेंतील वर्तमान कळल्यावर त्यानें **कामबक्ष** व **असदखान** ह्यांस परत बोलाविलें. नंतर **झुल्फिकारखान** ह्यानें कांहीं दिवसपर्यंत मराठे सरदारांशीं युद्ध करून शेवटीं इ० स० १६९८.

जिंजी किल्ला घेतला; परंतु आंतून त्याचा व राजारामा-चा स्नेह होता, म्हणून त्यानें राजारामास पूर्वी सूचना केल्यावरून तो किल्ला घेण्याच्या पूर्वी तेथून निघून गेला होता.

१९. राजारामानें करनाटकांतून आल्यावर, सातारा एथें आपली राजधानी करून, आ-
इ० स० १७००
पण स्वतां गोदावरी पलिकडे जालन्यापर्यंत चौथाईचा वसूल घेतला. त्यावेळीं औरंग-जेबानें ब्रह्मपुरीहून निघून किल्ले घेण्यास आरंभ केला. त्यांत परळी, सातारा, केळंणा, इत्यादि किल्ल्यांवरच्या लोकांनीं फार वेळ टिकाव धरून मोठ्या कौशल्यानें त्यांचें संरक्षण केलें. त्यामुळें औरंगजेबास जागोजागीं फार मेहनत पडली. इतक्यांत राजाराम मरण पावला. त्याच्या जागीं त्याचा मुलगा शिवाजी ह्यास गादीवर बसवून त्याची बायको ताराबाई कारभार करूं लागली. तिच्या वेळेस मराठे सरदारांनीं किती एक किल्ले मोंगलांपासून परत घेतले, आणि औरंगजेबास जाट व रजपूत ह्या लोकांचें पारिपत्य करण्याकरितां कांहीं फौज त्यांवर पाठवावी लागली, त्यामुळें जसजसी त्याची फौज कमी होत चालली तसतसें मराठ्यांचें सैन्य अधिक जमत चाललें. मोंगलांच्या सैन्याची हिंमत खचली; मुलूख ओसाड पडल्यामुळें ओझ्याचीं जनावरें मिळेनात, दाणावैरणीचा तोटा पडूं लागला; व हिंदुस्थानांतून खजीना बहुत येत होता. तरी द्रव्याचा तोटा पडून लष्कराची तलब चढून शिपाई अडून बसूं लागले. त्यामुळें पुढें

काय करावें, तें बादशहास सुचेनासें झालें. इकडे मराठ्यांनीं छावणी लुटण्याचें व गुरें वळवून नेण्याचें आरंभिलें. त्यांवर फौजेंतील सुमाराची टोळी गेली असतां त्यांनीं तिचा पराजय करावा, मोठें लष्कर आलें असतां आपण नाहींसे होऊन दूरचा एकादा गांव लुटावा; तिकडे मोंगलांनीं जावें तों आपण दुसरेचकडे उमटावें; असा क्रम त्यांनीं आरंभिला; आणि ते औरंगजेबाची कांहीं खातर बाळगीनात असे झाले. त्यांस औरंगजेबाच्या लष्करांतील लोकही जाऊन मिळूं लागले. अशा प्रसंगीं औरंगजेबानें मराठ्यांशीं तहाचें बोलणें लाविलें. तें जर ते ऐकते तर त्यानें शाहूस सोडून चौथाई वगैरेचें मागणें कबूल केलें असतें; परंतु त्यांचें मागणें फार पाहून औरंगजेब आपल्या लष्करासहित निघून मराठ्यांचें सैन्य मागून पाठलाग करीत असतां व फौजेचा संहार करीत असतां अहंमदनगरास पोहोंचला. पुढें कांहीं दिवसीं तो मरण पावला. तेवेळीं त्याच्या वयास ८९ वर्षें होतीं.

इ० स० १७०७ फेब्रूआरि ता० २१.

२०. औरंगजेबामध्यें शौर्य, व युद्धकौशल्य, आणि श्रम साहण्याचें सामर्थ्य हीं पराकाष्ठेचीं होतीं. कसाही प्रसंग आला तरी तो धैर्य सोडीत नसे. त्याचा उद्योगही अतिशयित होता. इतकें एका प्रांतांत युद्ध चाललें असतां दूरदूरच्या प्रदेशांतील बंडांचा बंदोबस्त करण्याविषयीं, अथवा तेथील कारभाराची व्यवस्था राखण्याविषयीं तो हुकूम लिहिण्यास अवकाश लावीत नसे; व

लहान मोठे सर्व कामदार आपण नेमून त्यांच्या कामांची चौकशी राखीत असे; परंतु अशी फार चौकशी राखल्यामुळें, व सरदारांजवळ चोर बातमीदार वगैरे ठेवून त्यांचा सर्वकाळ अविश्वास धरल्यामुळें, ते कामदार मनापासून त्याची चाकरी करीत नसत. त्यानें हिंदुधर्मास फार उपद्रव केल्यामुळें प्रजांची प्रीति त्यावर नसे. त्यास आपल्या धर्माचा अभिमान होता, आणि त्यामुळें त्यावर ईश्वराची कृपा होती असें मुसलमान मानीत खरें; परंतु त्याचा स्वभाव कपटी फार म्हणून आपला मतलब साध्य होण्याचा समय आला असतां तो विश्वासघात करण्याविषयीं अनमान करीत नसे, ह्याचीं उदाहरणें पूर्वीं लिहिण्यांत आलींच आहेत; म्हणून तो कशींही संकटें आलीं तरी त्यांतून निभावत असे.

२१. त्यास कोणीं युरोपियनानें त्याच्या वयाच्या ७८ व्या वर्षीं पाहिलें, त्यानें लिहिलें आहे कीं, त्याची आकृति लहान व सडपातळ होती; व त्याचें नाक लांब, दाढी पिकलेली होती. तो पांढरा मलमलीचा पोषाख घालून, उमराव लोकांमध्यें काठी टेंकून उभा राही, लोकांच्या अर्ज्या घेऊन उपनेत्रावांचून वाची, त्यांवर शेरे लिही; आणि नेहमीं हसतमुख असे.

# प्रकरण १३.

## बाहादुरशाहा आणि फरुकशीर.

### इ० स० १७०८ पासून स० १७२० पर्यंत.

१. **औरंगजेब** मेल्यावर त्याच्या उशाखालीं एक व्यवस्थापत्र सांपडलें, त्यांत असें लिहिलें होतें कीं, राज्यांतील पूर्वेकडचे व उत्तरेकडचे प्रांत **मोअज्जीम** ह्यानें घेऊन **दिल्ली** एथें राज्य करावें; आणि दक्षिणेकडील व नैर्ऋत्येकडील प्रांत **अजीम** ह्यानें घेऊन **आग्रा** एथें राज्य करावें; व **दक्षिणें**तील **विजापूर** वगैरे प्रांत **कामबक्ष** ह्यानें घ्यावे. अशी व्यवस्था **औरंगजेब** ह्यानें लिहून ठेविली असतां, ती एकीकडे ठेवून तो मेल्यावर **अजीम** आपणास सर्व **हिंदुस्थानचा** बादशाहा म्हणवूं लागला. परंतु **मोअज्जीम** ह्यानें प्रथम **काबूल** एथील गादीवर बसून पुढें थोड्या वेळानें पुष्कळ फौज जमवून **अजीम** ह्यावर स्वारी केली. त्यावेळीं त्या उभयतांचें मोठें युद्ध होऊन **अजीम** ह्याच्या सैन्याचा पराजय झाला; आणि तो व त्याचे दोघे प्रौढ मुलगे युद्धांत पडले. नंतर **मोअज्जीम**, **बाहादुरशाहा** हा किताब घेऊन गादीवर बसला; आणि **असदखान** व त्याचा मुलगा **झुल्फिकारखान**, तसेच **अजीम** ह्याचे जे कोणी इष्ट सरदार होते, त्यांस मोठे मोठे अधिकार देता झाला. ह्यानें **मुनीमखान** नामें सरदार आपला वजीर केला.

२. औरंगजेब ह्याचा तिसरा मुलगा कामबक्ष ह्यास दक्षिणेंतील अधिकार प्राप्त झाला
इ० स० १७०८. फेब्रु० होता तो बाहादुरशाहा ह्याचें स्वामित्व कबूल करीना म्हणून बादशाहानें त्याजवर स्वारी करून त्या उभयतांचें हैदराबादेजवळ युद्ध झालें त्यामध्यें ह्याचा पराभव होऊन त्यास जखमा लागल्या त्यांहीं करून तो त्याच दिवशीं मरण पावला.

३. अज़ीम ह्यानें आपल्या भावावर स्वारी करावयाच्या पूर्वी शाहूस दक्षिणेंत पाठविलें होतें. त्याचा आणि ताराबाईच्यापक्षाच्या सरदारांचा कांहीं वेळ कलह होऊन शेवटीं मराठ्यांच्या राज्याची गादी शाहूस प्राप्त झाली. दक्षिणेंतील सुभेदार झुल्फिकारखान ह्याचा मुतालिक दाऊदखान पन्नी ह्यानें मोंगलांचे तर्फेनें शाहूच्या चौथाईचा हक्क कबूल केला, आणि तो आपल्या कामदारांनीं वसूल करून शाहूस द्यावा असें ठरविलें.

४. बाहादुरशाहा ह्यानें परत हिंदुस्थानांत जाते वेळेस रजपूत संस्थानांशीं तह ठरविला. त्यांतील
इ० स० १७०९. मुख्य कलमें अशीं कीं मोंगलांनीं घेतलेला मुलूख परत द्यावा, स्वारांच्या पतकानिशीं चाकरी करण्याचें माफ करावें, व धर्मसंबंधी सर्व वहिवाट अकबराच्या कारकीर्दीप्रमाणें असावी. ह्या करारा-प्रमाणें उदेपूरचा राणा जोदपूरचा अजितसिंग, व जयपूरचा जयसिंग, हे मोंगलांचे ताबेदार इतकें नांव मात्र बाळगून सर्व स्वतंत्रपणानें वागूं लागले.

९. ह्याप्रमाणें रजपूत राजांशीं तह करण्याचें बादशाहास अगत्य पडण्याचें कारण असें कीं, शीक लोकांचा धर्मप्रवर्तक नानक ह्यापासून दाहावा गुरुहर गोविंद ह्याचा नातू गुरुगोविंद, ह्यानें कितीएक किल्ले घेऊन आपलें संस्थान प्रबल करण्याचा उद्योग आरंभिला. त्यावेळीं मुसलमानांस तें असह्य होऊन त्यांचे किल्ले त्यांनीं परत घेतले, आणि त्याची आई व मुलें ह्यांस ठार मारून त्याच्या लोकांस चोहोंकडे पळविलें. नंतर तो दक्षिणेमध्यें हिंडत असतां नांदेड एथें प्राणास मुकला. त्यानंतर बंधु नांवें कोणी गुरु झाला. त्यानें मुसलमानांच्या धर्माचा व राज्याचा मोड करण्याचे मसलतीनें मशिदी फोडिल्या, मुल्ले लोक मारिले; व लहान मोठा, स्त्री, किंवा बाल, हे न पाहतां सर्व मुसलमानांचा संहार करून सतलज व यमुना ह्या नद्यांच्या कांठच्या प्रदेशांत आपला अमल बसविला. दुसऱ्या स्वारींत एकीकडे लाहोरापर्यंत व एकीकडे दिल्लीपर्यंत मुलूख उद्वस्त केला. त्याच्या पारिपत्यास जाण्याकरितां बाहादुरशाहा ह्यानें रजपूत लोकांशीं तह केला. नंतर त्यावर स्वारी करून शिकांस प्रथम आपल्या हद्दींतून पिटून लाविलें. आणि पुढें बंधु ह्यास एका किल्ल्यांत घेरून दाणापाण्याचा तोटा पाडिला. ते वेळीं किल्लेकरी लोक जिवावर उदार होऊन बाहेर पडले, त्यांतून बहुत मेले. त्या गर्दींत बंधु पळाला, आणि त्याच्या सारिखा कोणी शीक झालेला हिंदु मोंगलांच्या हातीं सांपडला. तें कृत्रिम त्यास समजल्यावर बादशाहानें त्या-

इ० स० १६७५.

ला लोखंडाच्या पिंजऱ्यांत घालून दिल्लीस पाठविलें.

६. हा जय झाल्यानंतर बाहादूरशाहा लाहोरास निघून गेला. तेथें तो कांहीं वेळानें मरण
इ० स० १७१२. पावला. ते वेळेस त्याच्या वयास ७१ वर्षें होतीं.

७. त्याच्या मुलांमध्यें परस्पर कलह होऊन त्यांपैकीं दोन मेले, पुढें **जहानदार** बादशाहा गादीवर बसला. त्यानें **झुल्फिकारखान** ह्यास वजीर करून आठ महिनेपर्यंत राज्य केलें. तितक्यांत दुराचरणें करून आपली अप्रतिष्ठा करून घेतली. शेवटीं त्याचा पुतण्या **फरुकशीर** हा बंगाल्यांत होता, त्यानें बंड करून बादशाहाचे सत्तर हजार फौजेचा आग्र्याजवळ पराभव केला. तो तेथून **दिल्लीस** पळून गेल्यावर **झुल्फिकारखान** व त्याचा बाप **असदखान** ह्या उभयतांनीं विश्वासघात करून त्यास कैद केलें, आणि **फरुकशीर** हा येतांच तो त्याच्या स्वाधीन केला. फरुकशीरानें
इ० स० १७१३. **असदखान** ह्यास जीवदान दिलें; परंतु **झुल्फिकारखान** ह्याच्या विश्वासघाताचें त्यास देहांतप्रायश्चित्त करून पुढें **जहानदारशाहा** ह्यासही ठार मारिलें.

८. **फरुकशीर** ह्यास तक्त प्राप्त होण्याविषयीं **हुसेन अल्ली** व **अबदुल्लाखान** ह्या दोन सरदारांनीं
इ० स० १७१९. फेब्रुआरी फार साहित्य केलें होतें. त्यांनींच हा बादशाहा सात वर्षेंपर्यंत राज्य करीत असतां सर्व कारभार केला. शेवटीं बादशाहाची कृपा

रुकनुद्दौला नामें कोणी सरदार ह्याजवर झालेली पाहून हुसेन अल्ली ह्यानें दक्षिणेंतून बाळाजी विश्वनाथ ह्याचे दाहा हजार मराठे लोक आणिले, व त्यांचे मदतीनें फरुकशीर ह्यास पदच्युत करून त्याचा प्राण घेतला.

९. हे दोघे बंधु सय्यद ह्या नांवानें प्रसिद्ध होते.

१०. ह्या राज्याच्या आरंभीं हुसेनअल्ली ह्यानें जाऊन मारवाडचा राजा, अजितसिंग, ह्याशीं तह केला; व त्यानें आपला मुलगा दिल्लीस पाठवावा, आणि आपली मुलगी बादशाहास द्यावी, ह्याप्रमाणें करार ठरविला. ह्या राज्यांतच शिकांचा सरदार बंधु ह्यास कैद करून, त्यांच्या ७४० लोकांसहवर्तमान त्यास दिल्लीमध्यें फार अप्रतिष्ठा करून ठार मारिलें. त्या लोकांचीं शिरें उडविण्याचें काम सात दिवसपर्यंत चाललें होतें. दक्षिणेच्या बंदोबस्ताकरितां हुसेनअल्ली ह्यानें येऊन दाउदखान पन्नी ह्याचा पराजय केला. तो युद्धांत पडला. नंतर चिनकिलिचखान, म्हणजे ज्यांस पुढें निजामुल्मुल्क नांव पडलें, व हैदराबादच्या नबाबाचा मूळ पुरुष, तो सरदार कांहीं दिवसपर्यंत दक्षिणेच्या अधिकारावर होता. नंतर हुसेनअल्ली हा दक्षिणेंत आल्यावर त्यानें कांहीं दिवसपर्यंत लढाई चालवून शेवटीं शाहूशीं तह केला. तो असा कीं मराठ्यांनीं जितका मुलूख जिंकून घेतला होता तितका मुलूख व किल्ले त्यांनीं ठेवावे; व चौथाई आणि शिवाय दुसरी सरदेशमुखी नामें बाब, म्हणजे ऐन वसुलाचा दशांश, त्यांस द्यावा; व ह्याबद्दल शाहूनें पंधरा लाख रुपये सालीना खंडणी द्यावी,

१५००० स्वार चाकरीस द्यावे आणि कोठूनही चोरावें झाल्यास त्याचा जाब करावा.

---

## प्रकरण १४.

### महंमदशाहा.

इ० स० १७१९ पासून स० १७३९ पर्यंत.

१. **फरुकशिर** मेल्यानंतर **सय्यद** ह्यांनीं एका मुलास **रफिउद्दर्जात** हा किताब देऊन
इ० स० १७१९ सप्टेंबर. गादीवर बसविलें; आणि त्यास क्षय होऊन तो मेल्यावर **रफिउद्दवला** ह्या नांवानें दुसऱ्या एका अज्ञान मुलास बादशाहाचें पद दिलें. तोही थोड्याच महिन्यांत मरण पावला. शेवटीं **रोशन अख्तर** ह्यास **महंमदशाहा** असा किताब देऊन राज्याचा अधिकार दिला.

२. **महंमदशाहा** गादीवर बसल्यापासून एक वर्ष दोन महिने ह्यांच्या आंत एक **सय्यद** प्राणास
इ० स० १७२० मुकला व एक पदच्युत झाला. नंतर बादशाहानें **महंमद अमीन** नामें प्रधान नेमिला. तो लौकरच मेल्यावर **असोफजा** म्हणजे **चिनकिलिचखान**, ह्यास तो अधिकार दिला,
इ० स० १७२३ परंतु त्याला बादशाहाचा स्वभाव न आवडल्यामुळें तो तें काम सोडून दक्षिणेच्या सुभ्यास निघून गेला.

३. तेव्हेळेपासून सुमारें पंधरा वर्षेंपर्यंत मराठे आणि असोफजा ह्यांच्या परस्परांस बुडवावयाच्या मसलती चालल्या होत्या. ह्या उभयतांनीं परस्परांशीं कलह करून निर्बळ व्हावें ही बादशाहाची इच्छा होती खरी, तथापि त्यांचा मोड करण्यास प्रयत्न करण्याविषयीं त्यास विशेष सामर्थ्य नव्हतें, आणि त्याचें चित्त ऐषआरामांत फार होतें, ह्यामुळें मराठे व असोफजा ह्यांच्या कृति तो स्वस्थपणीं पाहात असे. बाळाजी विश्वनाथ पेशवा ह्याचा मुलगा बाजीराव हा युद्धाच्या कामांत व मसलतींत फार प्रवीण होता. त्याचा प्रतिस्पर्धी जो असोफजा ह्यानें प्रतिनिधि व शाहु राजा ह्यांस अनुकूळ करून घेण्याविषयीं प्रयत्न केला. नंतर त्यानें शाहू आणि संभाजी ह्या उभयतांमध्यें मत्सर उत्पन्न करण्याची खटपट करून पाहिली, व खंडेराव दाभाडा पेशव्याच्या पारिपत्याकरितां उठविला; परंतु बाजीराव ह्यानें ह्या मसलती चालूं न देतां दाभाडा ह्याचा गुजराथेंत पराजय केला. ह्या लढाईत दाभाडा प्राणास मुकला. बाजीराव ह्यानें गायकवाड, शिंदे व पंवार, ह्या तीन कुळांचे मूळ पुरुष जे पिलाजी, राणोजी, आणि उद्धवजी ह्यांचे मदतीने गुजराथ व माळवा ह्या प्रांतांतून चौथ, सरदेशमुखी, व खंडणी घेतली. गुजराथचा सुभेदार अभिसिंग ह्यास तेथून काढून देऊन ह्या प्रांतांत गायकवाड सत्ता करूं लागला, विद्या आणि शास्त्रें ह्यांचें

इ० स० १७३१.

इ० स० १७३२.

फार व्यसन बाळगणारा जो जयसिंग तो माळव्याचा सुभेदार असतां त्यानें तो प्रांत मराठ्यांच्या
इ० स० १७३४. स्वाधीन केला. ह्या प्रमाणेंच बुंदेलखंड प्रांतही तेथील राजानें मराठ्यांस दिला.

४. बाजीरावाची मसलत अशी होती कीं मुसलमानांचें मूळच उपटून टाकावें, म्हणजे फांद्या
इ० स० १७३७. आपोआप नाश पावतील. अशा विचारानें माळवा प्रांत आणि चंबळा नदीचे दक्षिणेकडील सर्व प्रांत हे आपणास जाहागीर द्यावे, व मथुरा, प्रयाग, आणि काशी हीं क्षेत्रें आपल्या स्वाधीन करावीं, हें बोलणें बोलण्याकरितां त्यानें दिल्लीवर स्वारी केली. त्यावर असोफजा व अयोध्येच्या नबाबांचा मूळ पुरुष, सादतखान हे मोठी सेना घेऊन आले. त्यावर्षी बाजीराव दक्षिणेंत परत आला, परंतु पर्जन्यकाळा-
इ० स० १७३८. नंतर ८०००० फौजेसहित पुनःतो हिंदुस्थानांत जात असतां भूपाळ शहराजवळ तो व असोफजा ह्यांच्या लढाया* होऊन असोफजा ह्याचा मराठ्यांपुढें निरुपाय झाला. त्यामुळें नर्मदा व चंबळा ह्या नद्यांच्या मधला मुलूख व शिवाय पन्नास लक्ष रुपये बादशाहाकडून देववितों असा करार करून असोफजा हा दिल्लीस गेला. तो करार कायम होण्याच्या

---

* त्या लढायांचीं व मराठ्यांच्या लढायांचीं वर्तमानें मराठ्यांच्या बखरींत बाराव्यापासून पंधराव्या भागापर्यंत सविस्तर लिहिलीं आहेत, म्हणून एथें त्यांचा तपशील लिहिला नाहीं.

पूर्वी दिल्लींत एक मोठा अनर्थ घडला, तो असा.

५. इराणचा सफी वंशाचा बादशाहा **हुसेन** ह्यास पदच्युत करून **महमूद** नामें कोणी घिलजी सरदार **इस्पाहान** एथें गादीवर बसला. तो मेल्यावर त्याचा पुतण्या **अशरफ** राज्य करीत असतां **हुसेन** ह्याचा पुत्र **तहमस्प** ह्यास **नादिरकुलीखान** नामें सरदार मदतीस मिळाला. त्यानें इराणी लोकांस उमेद व धीर देऊन घिलजी व अबदली ह्यांचा पराजय केला; आणि **तहमस्प** ह्यास गादीवर बसविलें. परंतु पुढें लौकरच त्यास रयत राजी नाहीं ह्या निमित्तानें त्यानें त्यास गादीवरून काढून त्याचा अज्ञान मुलगा बादशाहा केला. नंतर तुर्क व **रशियन** ह्यांनीं इराणचें राज्य वांटून घेण्याच्या हेतूनें जो कांहीं मुलूख घेतला होता तो सर्व त्यानें परत घेतला. त्या वेळेस त्यानें राज्यांतील मोठमोठे मानकरी, व सरदार, व अधिकारी, सुमारें १००००० जमविले. त्या सभेंत राजा कोण करावा हा विचार होऊन सर्व संमतानें **नादिर** ह्याच्या मस्तकीं मुकुट घालण्याचें ठरलें. तें बोलणें **नादिर** ह्यानें बाहेरून अनमान दाखवून कबूल केलें, आणि शय्या हें मत सोडून सुनी मत चालू करण्याचा लोकांकडून करार करविला.

६. हें वर्तमान इ० स० १७३६ त घडलें. नंतर त्यानें घिलजी व अबदली लोकांचा पराजय करून **कंदाहार** परत घेण्याकरितां ८०,००० फौजेसहित अफगानिस्थानावर स्वारी केली. तेथील लोकांनीं त्याशीं सुमारें एक वर्षपर्यंत युद्धें केलीं, आणि कितीएक वेळां त्यास माघारें

हटविलें. शेवटीं इ० स० १७३८ च्या मार्च महिन्यांत कंदहार त्याच्या स्वाधीन झालें. तेथील लोकांविषयीं नादिरशाहा ह्यानें निर्दयपणा विशेष न करितां त्यांतून बहुतेकांस लष्करांत चाकरीस ठेविलें; कितीएकांस त्या प्रांतांतून काढून खुरासानास पाठविलें.

७. ह्या रीतीनें नादिरशाहा हिंदुस्थानच्या सरहद्दीवर येऊन पोहोंचला; आणि दिल्ली
इ० स० १७३८ अक्टोबर. एथील दरबार निर्बळ आहे हें त्याच्या ऐकण्यांत आल्यामुळें तेथील संपत्ति लुटून आपला खजीना भरावा ही त्यास इच्छा उत्पन्न झाली. तसें करण्यास त्यास निमित्तही लौकरच सांपडलें. तें हें कीं, गजनीजवळून कितीएक बंडवाले अफगाण पळून दिल्लीस गेले होते, त्यांस स्वाधीन करावें म्हणून नादिरशाहा ह्यानें दिल्लीच्या दरबारास निरोप पाठविला. त्याचें उत्तर आलें नाहीं म्हणून त्यानें दुसऱ्यानें वकील रवाना केला; त्यास अफगाण ह्यांनीं मारिलें. हें वर्तमान समजल्यानंतर त्यानें काबुलाहून लागलीच हिंदुस्थानावर स्वारी केली.

८. नादिरशाहा ह्यास प्रतिबंध करण्याचा लाहोर एथील सुभेदारानें कांहीं आव दाखविला;
इ० स० १७३९. मार्च. परंतु त्यापासून फळ न होतां नादिर ह्यानें पुढें चाल केली. त्याची आणि महंमद ह्याच्या लष्कराची कर्नालाजवळ गांठ पडली. तेच वेळेस सादतखान हा बादशाहाचे कुमकेस येऊन पोंहोंचला; पुढें लौकरच लढाईस आरंभ झाला. तीमध्यें

वळकट आणि लढाया अनुभवलेले जे इराणी लोक, त्यांपुढें बादशाहाच्या फौजेंतील लोकांचें कांहीं न चालतां ते पळून गेले; त्यांचा सरदार **खानदौरान** हा मरण पावला; आणि **सादतखान** हा **नादिरशाहा** ह्याच्या लोकांच्या हातीं सांपडला. **असोफजा** हा ह्या युद्धांत न जातां दूर राहिला होता, त्यास दुसऱ्या दिवशीं **महंमद** ह्यानें **नादीरशाहा** ह्याजकडे तहेदारीचा निरोप सांगण्यास पाठविलें. तो त्याजपासून परत आल्यावर **महंमदही नादिरशाहा** ह्याच्या सांगण्यावरून त्याच्या लष्करांत जाऊन ते दोघे बादशाहा दिल्लीस आले.

९. तेथें ते उभयतां राजवाड्यांत राहिले. प्रथम **नादिरशाहा** ह्यानें आपले फौजेच्या टोळ्या करून शहराच्या रखवालीकरितां जागोजागीं ठेविल्या, आणि कोणीं आगळीक करूं नये, किंवा लोकांस उपद्रव करूं नये, असा बंदोबस्त केला. परंतु दुसऱ्या दिवशीं **नादिरशाहा** मेला असें वर्त्तमान शहरांत उठल्यावरून सर्व शहरकरी इराणी लोकांवर उठले, आणि ते बेसावध आणि जिकडे तिकडे फांकलेले होते म्हणून त्यांतून बहुतेक प्राण्यास मुकले. ह्या बखेड्याचा बंदोबस्त होण्याकरितां **नादिरशाहा** ह्यानें प्रयत्न केला, परंतु त्या दिवशीं अस्तमानपर्यंत तो मोडला नाहीं, आणि रात्रीं ही तसाच चालला; म्हणून **नादिरशाहा** सकाळीं उठतांच घोड्यावर बसून शहरांत फिरावयास निघाला तंव त्याच्या लोकांचीं प्रेतें त्याच्या दृष्टीस प्रथम पडलीं, आणि तो पुढें जातो इतक्यांत घराच्या आंतून त्यावर दगड,

तीर, व गोळ्या येऊन त्यांहींकरून त्याचे बाजूस एक सरदार मरून पडला. तेणेंकरून नादिरशाहा ह्यास राग आवरेना असा होऊन जो हिंदुस्थानी भेटेल तो बेलाशक मारावा असा त्यानें फौजेस हुकूम दिला. त्यावरून वीस हजार हत्यारबंद लोक कांहीं तासपर्यंत जो दृष्टीस पडेल त्यास मारीत होते. शेवटीं महंमद ह्यानें प्रार्थना केली, आणि रक्ताचे पूर पाहून नादिरशाहा ह्यासही कळवळा आला, तेव्हां त्यानें ती कत्तल बंद करण्यास हुकूम केला. तो होतांच क्षणमात्रामध्यें सर्वत्र शांतता झाली. ह्या प्रसंगीं फार थोडा म्हटला तरी २०००० लोकांचा संहार झाला.

१०. नादिरशाहा ह्याचा स्वारी करण्याचा मतलब द्रव्य मिळवावें हा मुख्यत्वें होता, म्हणून त्यानें पैक्याचे खंडणीचें बोलणें ठरवून बादशाही खजीना, जवाहीर, व मयूरासन हीं लुटण्यापासून त्या कार्यास आरंभ केला. नंतर मोठे उमराव व सरदार ह्यांचें सर्वस्व लुटलें. पुढें तो साधारण लोकांचे पाठीस लागला व जो देईना त्यास मार देऊन आणि त्यास हाल करून कबूल करवावें असें त्याचे लोक करूं लागले. त्या गर्दींत बहुत लोक मेले, व बहुतांनीं भयानें जीव दिले. कोणी ग्रंथकारानें लिहिलें आहे कीं, निद्रा आणि विश्रांति हीं त्या काळीं शहरापासून परागंदा झालीं. प्रतिघरांत व खोलींत जिकडे पाहावें तिकडे एकच आकांत झाला.

११. ह्याप्रमाणें दिल्ली लुटून व प्रांतांतील सुभेदारांकडून खंडण्या घेऊन नादिरशाहा ह्यानें सुमारें आठ

नऊ कोटि रुपये जमा केल्यावर आतां देशांत कांहीं शेष राहिलें नाहीं अशी त्याची खातरी झाली. मग तो महंमदशाहा त्यास पुनः गादीवर बसवून आपल्या हातानें त्याच्या आंगावर राजभूषणें घालून आणि आपल्या मुलाशीं व दिल्लीचे एके राजकन्येशीं लग्न करून देऊन दिल्लीहून परत गेला. त्यावेळीं त्यानें वर सांगितलेल्या द्रव्याशिवाय पुष्कळ हत्ती, घोडे, उंट, आणि शेकडों कारागीर बरोबर नेले.

१२. हा नादिरशाहा इराणास परत गेल्यावर जयाच्या व वैभवाच्या मदेंकरून उन्मत्त होऊन त्याची वृत्ति पूर्वीपेक्षांही अधिक तापट आणि अविचारी झाली. त्यानें आपल्या मुलाचे डोळे काढिले, व आणखी बहु अविचार केले. त्यामुळें त्याची फौज त्याजवर उठून तींतून कितीएकांनीं रात्रीं त्याच्या डेऱ्यांत जाऊन त्यास ठार मारिलें. त्यावेळेस त्याच्या वंशाचीही समाप्ति झाली.

---

## प्रकरण १५.

### महंमदशाहा.

इ० स० १७३९ पासून १७४८ पर्यंत.

१. नादिरशाहा गेल्यानंतर कांहीं वेळपर्यंत दिल्लींतील लोक जसे काय निश्चेष्ट होते. त्यांचीं घरें पडलीं होतीं, व रस्त्यांत प्रेतें पुरल्यावांचून जशाचीं तशींच होतीं. राजधानीप्रमाणें साऱ्या राज्याची हीच अवस्था

झाली होती. इकडे लष्कराची फाटाफूट व खजीना रिकामा; तिकडे दक्षिणेंत मराठे लुटीतच आहेत; आणि त्यांच्या उपद्रवापासून जे प्रांत राहिले होते त्यांचा विध्वंस नादिरशाहा ह्याचे फौजेपासून नुकताच झाला आहे; अशी स्थिति होती. त्यावेळेस दरबारामध्यें वजीर कमरुद्दीखान व असोफजा वगैरे दुराणी उमराव ह्यांची एक फळी, व त्यांचें वर्चस्व नसावें असें इच्छिणारे जे त्यांची एक फळी, अशा दोन फळ्या झाल्या होत्या, म्हणून मराठे ह्यांनीं दक्षिणेंतील कारभारांत न गुंतून जर पूर्वीप्रमाणें उत्तरहिंदुस्थानांत लढाई चालविली असती, तर दिल्लीच्या राजवंशाची लौकरच समाप्ति झाली असती.

२. दक्षिणेंत मराठयांचे मुख्य शत्रु आंग्रे, शिद्दी
इ० स० १७३९ व पोर्टुगीस हे तीन होते. ह्यांतून पहिले दोन हे दर्यांत व प्रांतांत लुटीत असत, त्यांचा बंदोबस्त बाजीराव ह्यानें कांहींसा केला;
इ० स० १७४० एप्रिल ता० २८ व पोर्टुगीस लोकांपासून युद्ध करून साष्टी, वसई, व जवळची कोंकणपट्टी हीं घेतलीं. पुढें बाजीराव लौकरच मृत्यु पावला.

३. त्याचा वडील मुलगा बाळाजी ऊर्फ नाना साहेब ह्यास पेशवाईचा अधिकार प्राप्त न
इ० स० १७४० व्हावा ह्याविषयीं सेनापति दाभाडे ह्यांचा मुतालिक दमाजी गायकवाड, व असोफजा ह्यांचा मुलगा नासरजंग, आणि नागपुरकर भोंसल्यांचा मूळपुरुष परसाजी ह्यांचे जागेवर बसलेला त्याचा चुलत

बंधु रघुजी ह्या तिघांचाही उद्योग चालला होता. ह्या कार्याकरितां रघुजी भोंसला करनाटकांतून साताऱ्यास आला होता. परंतु नानासाहेब ह्याच्या मसलतीपुढें त्याचें कांहीं चाललें नाहीं, आणि त्यास बापाचा अधिकार प्राप्त झाला. नंतर रघुजी भोंसला त्रिचिनापल्लीस निघून गेला.

४. पुढें नानासाहेबानें आपल्या बापाचे वेळचें कर्ज वारून व दक्षिणेंत व्यवस्था चांगल्या रीतीची करून, हिंदुस्थानांत स्वारी केली. त्याला दमाजी गायकवाड ह्याच्या पारिपत्याकरितां एकदा परत यावें लागलें; परंतु तें कार्य करून तो असोफजा ह्यानें पूर्वीं केलेला करार बादशाहापासून कायम करून घेण्याकरितां हिंदुस्थानांत गेला.

५. इतक्यांत रघुजी भोंसला ह्यानें बंगाल्यावर स्वारी केली. असें वर्तमान ऐकून त्या प्रांताचा सुभेदार, अलिवर्दीखान, ह्यानें कुमक मागितल्यावरून बादशाहानें अयोध्येचा नबाब सफदरजंग ह्यास सैन्य देऊन तिकडे पाठविलें, आणि माळवाप्रांत देण्याचें कबूल करून नानासाहेब हा त्याचे कुमकेस रवाना केला. त्यानें प्रयाग व बहार ह्यामागें मुर्शिदाबादेस जाऊन तें शहर रघुजी ह्याच्या हातीं लागूं दिलें नाहीं; आणि पुढें त्याचा पराजय करून त्यास माघारें हटविलें. नंतर बाळाजी माळवा प्रांतांतून साताऱ्यास आला.

इ० स० १७४०.

६. गायकवाड व रघोजी भोंसला व प्रतिनि-

धीचा मुतालिक हे तिघे आपल्या नाशाक-
इ० स० १७४३. रितां एकमसलतीनें वागतात असें पाहून
त्यांतून बलिष्ठ जो भोंसला त्याशीं सख्य क-
रण्याकरितां बंगाल व बहार ह्या प्रांतांत चौथाई व-
सूल करण्याचा आपला अधिकार बाळाजीबाजीरावानें
त्यास दिला. तेणेंकरून तो संतुष्ट होऊन ते-
इ० स० १७५१. व्हांपासून तिकडे आपला अमल बसविण्या-
च्या कामास लागला; आणि शेवटीं अलिव-
र्दिखानाकडून त्यास सारा कटकप्रांत आणि बंगाल्याचे
चौथाईबद्दल १२००००० रुपये प्राप्त झाले.

७. भोंसला फुटल्यामुळें पेशव्याचे सर्व शत्रु नि-
र्बळ झाले आणि असोफजा हा आपल्या मु-
इ० स० १७४८. डिसेंबर. लांनीं केलेल्या बंडाच्या बंदोबस्तांत व करना-
टकांतील लढायांत गुंतून शेवटीं १०४ चां-
द्रवर्षाच्या वयांत मृत्यु पावला. पुढें शाहु ह्या-
चाही काळ झाला; आणि ताराबाईचा नातू राजाराम
नामें होता, त्यास पेशव्यानें गादीवर बसवून रघुजी भों-
सला व इतर सरदार ह्यांस लोभानें वश करून घेऊन
शाहूच्या मरणानंतर सुमारें एक वर्षाच्या आंत आपणास
कोणी शत्रु नाहीं असें केलें.

८. नानासाहेब पेशवा ह्यानें आपली राजधानी पुणें
एथें केली होती. तीवर हैदराबादेचा नवा
इ० स० १७५१. नवाब सलाबतजंग ह्यानें स्वारी केली; तेवे-
ळेस त्याबरोबर बुसी नामें कोणी फ्रेंच सरदार
आणि ५०० गोरे व ५००० कवाईत शिकलेले शिपाई

होते. ह्या सैन्यापुढें पेशव्याचें कांहीं चाललें नसतें; परंतु रघूजी भोंसल्यानें वराडांतील सलाबतजंगाच्या मुलखावर हल्ला केला, ह्यामुळें व दुसऱ्या कांहीं कारणामुळें तो सलाबतजंग तह करून परत निघून गेला. इ० स० १७५२.

९. इतक्या काळांत दिल्लीच्या दरबारामध्यें विशेष वर्तमान कांहीं झालें नाहीं. अफगान लोकांपैकीं युसुफजई वगैरे जातीचे रोहिले ह्या नांवाचे लोक अयोध्या प्रांत व हिमालय ह्यांच्या मधील मुलखांत येऊन राहिले होते. त्यांचें संस्थान होऊन फार दिवस झाले नसतां ते इतके प्रबळ झाले कीं, बादशाहा ह्यास त्यांवर स्वतः स्वारी करणें प्राप्त झालें. इ० स० १७४५. पुढें तीन वर्षांनीं अहंमदशाहा नामें नादिर ह्याचा अफगान सरदार आपणास दुराणी अफगान लोकांचा राजा म्हणवावयास लागला; आणि १२००० फौजेसहित त्यानें सिंधुनद उतरून सरहिंद शहर जिंकून घेतलें. परंतु तेवेळेस महंमदाच्या वजिराचे फौजेनें त्याचा पराजय करून त्यास माघारां हटविलें. ह्या लढाईंत दिल्लीच्या दरबारच्या वजिरास गोळा लागून तो मेला. अहंमदशाहा हा परत जातांना सिंधुनदापर्यंत पोहोंचण्याच्या पूर्वीं दिल्लीचा बादशाहा दुखणेकरी आहे हें ऐकून माघारां फिरला, मग पंजाबच्या सुभेदाराकडून खंडणी देण्याचें कबूल करवून तो स्वदेशास परत गेला. इ० स० १७४८ मार्च.

१०. हें वर्तमान झाल्यावर थोड्याच दिवसांनीं महंम-

दशाहा मरण पावला, आणि दुराणी राजाच्या नांवाचाच त्याचा मुलगा होता तो तक्ताचा अधिपति झाला.

---

## प्रकरण १६.

### इ० स० १८६० त मोंगली राज्याची समाप्ति झाली तेथपर्यंत वर्तमान.

१. अहंमदशाहा ह्यानें सादतखानाचा मुलगा सफदरजंग ह्यास वजीर नेमिल्यावर त्यानें
इ० स० १७२०. प्रथम रोहिल्यांवर स्वारी केली; परंतु त्या लोकांनीं त्याचा पराजय केला. पुढें त्यानें मल्हारराव होळकर व जयाप्पा शिंदा ह्यांस चौथाई वसूल करण्याची परवानगी देऊन तिकडे पाठविल्यावर त्यांनीं ते रोहिले लोक जिंकले. मग
इ० स० १७५१. वजिराकडून कितीएक गांव जाहागीर मिळाल्यावर ते स्वस्थ राहिले.

२. अहंमदशाहा दुराणी ह्यानें दुसरी स्वारी हिंदुस्थानावर केली, तेव्हां बादशाहानें
इ० स० १७५४. जुलै. त्यास पंजाब प्रांत दिला, तें कृत्य वजिरास आवडलें नाहीं; आणि वजीर ह्यानें बादशाहाचे कृपेंतील जवीद नामें कोणी खोजा मारिला, ह्यामुळें बादशाहाची त्यावर गैर मर्जी झाली. त्यानें असोफजा ह्याच्या वडील मुलाचा पुत्र ग्यासुद्दीन ह्याचा व त्या सफदरजंगाचा कज्जा लावून दिला,

आणि त्या उभयतांच्या फौजांच्या लढाया कांहीं दिवस-पर्यंत दिल्लीच्या रस्त्यांत होऊं लागल्या. शेवटीं आपणास बळहीन पाहून **सफदरजंग** ह्यानें **अयोध्या** व **प्रयाग हे** प्रांत घेण्याचें कबूल करून सला केला. नंतर **ग्यासुद्दीन** ह्यानें जाटांवर स्वारी केली. त्या स्वारींत तो **भरतपुरास** वेढा घालून होता, इतक्यांत बादशाहा त्याच्या दांडगे-पणास आणि आग्रही स्वभावास कंटाळून स्वतः त्यावर फौज घेऊन गेला. परंतु **ग्यासुद्दीनाचे** हितकर्ते जे मराठे त्यांनीं त्याचा पराजय केला, आणि पुढें लौकरच **ग्यासुद्दीनानें** त्याला गादीवरून काढून त्याचे डोळे फोडले; व दुसरा एक शाहाजादा ह्यास **आलमगीर** असा किताब देऊन तो सिंहासनावर बसविला.

३. त्यानंतर लौकरच **सफदरजंग** मरण पावला, आणि **ग्यासुद्दीन** ह्यास वजीराचें पद प्राप्त झालें. हा **ग्यासुद्दीन** वयानें लहान आणि स्वभावानें चपळ होता; ह्यामुळें अविचारानें व उतावळीनें वागत असे. ह्याकारणास्तव तो **पंजाबांत** जात असतां फौजेनें त्यावर उठून भररस्त्यांत त्याची फार अप्रतिष्ठा केली. पुढें तो **पंजाबांत** गेल्यावर त्यानें तेथील दुराणी बादशाहाचा सुभेदार **मीरमनूचा** मुलगा, तो लहान असतां, त्याचे बहिणीशीं जबरीनें लग्न केलें; आणि त्याची आई कारभार करीत होती तिला कैद केलें. त्यामुळें **अहंमदशाहा** अबदल्ली ह्यास क्रोध येऊन त्यानें **हिंदुस्थानावर** तिसरी स्वारी केली. आणि **ग्यासु-द्दीन** ह्यास जरी त्यानें तो अपराध माफ केला, तरी

इ० स० १७५७.

त्यानें दिल्लीस जाऊन नादिरशाहाप्रमाणें मार झोड लूट हे बहुतेक उपाय करून बरेंच द्रव्य संपादिलें. त्यानें अयोध्येचा नबाब सुजाउद्दवला ह्याजपासून खंडणी घेण्यास फौज पाठविली, आणि आपण जाट लोकांवर जाऊन त्यांचे एक दोन किल्ले घेऊन तेथील रखवालदार लोक मारिले. तसेंच त्याच्या लोकांनीं एके यात्रेच्या समयीं मथुरेस जाऊन तेथील निरपराधी शेंकडों यात्रेकरी निर्दयपणानें मारिले, हा अहंमदशाहा ह्यानें आपले कीर्तीस मोठा डाग लावून घेतला. आणखीहि ह्याप्रमाणें इतर ठिकाणीं करण्याची त्याची मसलत होती; परंतु गरमीचे दिवस आले, ह्यामुळें त्यानें परत जाण्याचा बेत केला. नंतर दिल्लीच्या दरबारांतल्या एके राजकन्येशीं त्यानें आपलें लग्न केलें, आणि दुसरी एक कन्या आपला मुलगा तैमूर ह्यास केली. पुढें नजीबउद्दवला नामें कोणी शूर रोहिला सरदार ह्यास बादशाहाजवळ सेनापति करून ठेवून आपण परत काबुलास गेला.

४. परंतु हा बंदोबस्त वजिरानें चालूं दिला नाहीं. त्यानें रघुनाथराव पेशवा ह्याच्या मदतीनें दिल्लीवर स्वारी करून त्या शहरास वेढा घातला, त्यांतून युक्तीनें नजीबउद्दवला पळून आपला प्रांत जो शाहरणपूर एथें गेल्यावर दिल्ली शहर वजिराच्या हस्तगत झालें. नंतर त्याच्या सांगण्यावरून रघुनाथराव पंजाब प्रांत घेऊन दुराणी लोकांस सिंधुनदाच्या पलिकडेस पिटून लाविलें; आणि तेथील बंदोबस्ताचें काम आदिनाबेग नामें सरदार ह्यास सांगून रघुनाथराव

इ० स० १७५८.

परत दक्षिणेंत निघून गेला. पुढें तो मेल्यानंतर तेथील एक मराठा त्या अधिकारावर गेला.

९. ह्या अविचारी कृत्याबद्दल वजीर व मराठे ह्याचें पारिपत्य करावें ह्या हेतूनें अहमदशाहा अबदल्ली हिंदुस्थानांत यावयास निघाला. तो येऊन पोहोंचण्याच्या पूर्वी ग्यासुद्दीन ह्यानें अलमगीर बादशाहास मारेकऱ्यांच्या हातानें मारविलें. हें विरोध वाढण्यास मोठें कारण झालें. इ० स० १७५९ नोवेंबर.

१०. इकडे पेशव्यास दक्षिणेंत कोणी शत्रु राहिला नव्हता, व त्याचा सर्व राज्याधिकार एकाच्या हातीं होता. हिंदुस्थानांत मल्हारराव होळकर, दत्तोजी शिंदा, व भोंसले ह्या तिघांनीं बहुत मुलूख मिळविला, आणि रघुनाथराव ह्यानें पंजाब घेतल्यामुळें एके बाजूस त्यांची सरहद्द हिमालय आणि सिंधुनद ह्यांपर्यंत पोहोंचली. आणि दुसरे बाजूस रामेश्वराजवळ गेली. त्याच्या फौजेंत पूर्वीप्रमाणें लुटारू लोक नव्हते, परंतु पगारदार व सामान सरंजाम सहित स्वार होते; व पूर्वीच्या पायदळापेक्षां ज्याचा बंदोबस्त चांगला असें १०००० पायदळ, कांहींसें गोरे लोकांच्या तऱ्हेचें त्यांनीं तयार केलेलें होतें. ह्याप्रमाणें त्यांचा उत्कर्ष होत चालला, आणि ते मुसलमानांच्या सत्तेची समाप्ति करण्याची इच्छा करूं लागले. त्यामुळें बहुतेक मुसलमानी संस्थान्यांसही त्यांच्या नाशाची इच्छा उत्पन्न झाली. रोहिल्यांचा मुख्य नजीबउद्दवला हा तर अहंमदशाहा ह्याची येण्याची वाट पाहत होता, आणि अयोध्येचा नबाव सुजाउद्दवला हा बाहेरून मरा-

त्यांस गोडी दाखवून आंतून त्यांच्याच पक्षास अनुकूळ होता. मराठ्यांस जाटांचा राजा सुरजमल हा सामील होता; परंतु रघुनाथराव परत आल्यावर सदाशिवराव भाऊ पेशवा हा हिंदुस्थानांत स्वारीस गेला, तो त्याची कांहीं मसलत न ऐकतां आपल्या शौर्याच्या गर्वेंकरून मनास येईल तें करी. दिल्लीस आल्यावर त्यानें राजवाडे, कबरी, दर्गे, अशा जागा लुटल्या; राजवाड्याचें रुप्याचें छत फोडून सतरा लक्ष रुपये घडले; आणि सिंहासनावर आपला पुतण्या विश्वासराव; ह्यास बसविण्यास उद्युक्त झाला. ह्या कृत्यांमुळें सुरजमल कंटाळून आपल्या देशास निघून गेला, आणि पुढें जी कलागत होणार तींत मुसलमानांचा जय होतो किंवा हिंदूंचा होतो हें पाहण्याकरितां सर्वांचे डोळे अहमदशाहा ह्याच्या येण्याकडे लागले.

इ० स० १७६०.

७. तो अहमदशाहा पर्जन्यकाळ संपला नाहीं आणि यमुनेचें पाणी कमी झालें नाहीं तंव तो उतरून अलिकडे आला. इकडेस मराठे पानिपताजवळ खंदक खणून छावणी करून राहिले होते, त्यांस अन्नाचा तोटा पडून शेवटीं जिवावर उदार होऊन ते युद्ध करण्यास उद्युक्त झाले. त्या युद्धांत काय झालें त्याचा विस्तार मराठ्यांचे बखरींत आहेच. सारांश मराठ्यांचे सुमारें साठ सत्तर हजार स्वार आणि १५००० पायदळ इतकें लष्कर होतें त्यांतून थोडे लोक परत आले. सदाशिवराव भाऊ, विश्वासराव वगैरे बहुतेक मोठे मोठे सरदार पडले; महादजी शिंदा जन्माचा लंगडा झा-

इ० स० १७६१.

ला; आणि पुढें मोठेपणास पावला जो **नानाफडणवीस** त्याच्या मनांत सतत एक दुःख राहावयाजोगें झालें. **इब्राहिमखान** गार्दी म्हणून कवायती लष्कराचा सरदार होता तो शत्रूंच्या हातीं सांपडला, तो त्यांनीं ठार मारिला. एक **मल्हारराव** होळकर हा लढाईतून लौकर निघून गेला. तो व **दिल्लीस** लष्करावरोबर कांहीं सरदार होते ते मात्र वांचले.

८. ह्या पराजयाचें वर्तमान दक्षिणेंत येतांच मराठ्यांच्या अवघ्या राज्यांत हाहाकार झाला. बहुतेकांचे इष्टमित्र पडले होते; आणि मराठ्यांची अप्रतिष्ठा झाल्यामुळें सर्व हळहळूं लागले. परंतु त्या लढाईपासून कांहीं थोडावेळपर्यंत शोक मात्र झाला असें नाहीं. तो जो धक्का बसला त्यापासून मराठे पूर्वींप्रमाणें कधीं पुनः सांवरलेच नाहींत. त्यांची सेना शेष राहिली होती, ती पुढें **नर्मदा** उतरून परत आली, व **हिंदुस्थानां**तील बहुतेक प्रांत पेशवा ह्यास सोडून द्यावे लागले. नंतर लौकरच **नानासाहेब**ही मरण पावला. पुढें शिंदे, होळकर, वगैरे सरदारांनीं युरोपियन फौजेच्या मदतीनें पूर्वींचे बहुतेक प्रांत घेतले खरे, परंतु मराठ्यांची एकहाती सत्ताही पुनः कधीं झाली नाहीं.

९. इकडे मुसलमानांचा जुट झाला होता तो लढाई संपतांच फुटला. **अहंमदशाहा** स्वदेशास निघून गेला, आणि त्यानें **हिंदुस्थानां**तील कारभारांत मन घालावयाचें सोडिलें. पुढें राज्याचे विभाग होऊन

लहान लहान संस्थानें झालीं ; राजधानी ओस पडली ; आणि साऱ्या हिंदुस्थानचे बादशाहा म्हणविणाऱ्यांचा जो वंशज त्यास परदेशचे लोक जें कृपा करून धर्मार्थ देतील तें खाऊन राहण्याचें प्राप्त झालें.

---

## प्रकरण १७.

### मुसलमानाच्या राज्याविषयीं.

#### साधारण विचार.

१. ह्याप्रमाणें दिल्लीच्या मुसलमानी राज्याची समाप्ति झाली. ते मुसलमान प्रथम स्वाऱ्या करूं लागले, तेव्हां सर्वांचें एक मत असे, आणि ते एकाच्या हुकमानें वागून अवघ्यांची दृष्ट एका कार्यावर असे. ह्या कारणामुळें, आणि ते लोक हिंदूपेक्षां शरीरानेंही सुदृढ आणि साहसी म्हणून, प्रथम ते थोडे असून हिंदूच्या मोठ्या मोठ्या सैन्याचा पराजय करीत असत. इकडे पंजाब व दिल्ली ह्या प्रांतांत लहान लहान निर्बळ हिंदु संस्थानी फार होते. त्यांमध्यें परस्पर वैमनस्य व मत्सर होता; म्हणून एकावर संकटाचा प्रसंग आला असतां जवळचे संस्थानी उदासीन असत, किंवा संतोष मानीत. अशा रीतीनें आरंभीं मुसलमानांचा प्रवेश झाला.

२. परंतु तेव्हेळीं त्यांस देशाची माहितगारी फार नव्हती, म्हणून एकवेळ ज्या ठिकाणीं अमल बसला त्याचें रक्षण करण्याकडे ते खपत असत. आणि ते हिंदुस्थानां-

तील राज्याच्या बंदोबस्ताकडे लागले, म्हणजे सिंधुनदाच्या पलिकडील मुलखांत बंडें होत. त्या मुलखाविषयीं त्यांस ममता अधिक असे म्हणून तिकडेच त्यांचें लक्ष्य असे. परंतु गजनीवंश समाप्तीस गेल्यावर ज्यानें दिल्लीचें संस्थान घेऊन तें शहर आपली राजधानी केली, त्या कुतुबुद्दीनास पश्चिमेकडच्या राज्याची कांहीं काळजी नव्हती; आणि तो जात्या शूर होता, म्हणून त्यानें बंगाल्यापर्यंत मुलूख घेतला. हा कुतुबुद्दीन, व त्याच्यापुढें अलतूमष बादशाह झाला, ह्या उभयतांप्रमाणें उद्योगी व चतुर असे आणखी कितीएक राजे जर एकापुढें एक झाले असते, तर तेव्हांच नर्मदेपर्यंत सारा मुलूख मुसलमानांच्या स्वाधीन झाला असता, परंतु मध्यें मध्यें हलके व विषयी असे कितीएक राजे झाले; त्यांचे वेळेस राज्यांत जी अव्यवस्था झाली ती नासरुद्दीन व बुलबुल ह्यासारिखे चांगले बादशाह गादीवर आले, म्हणूनच शांत झाली; आणि गुलाम वंशाचे कारकिर्दीच्या अखेरीस मुसलमानांची सत्ता कुतुबुद्दीनानें मिळविलेल्या बहुतेक राज्यावर राहिली.

३. खिलजी वंशाची कारकीर्द थोडे दिवस होती खरी; परंतु तीमध्यें मुसलमानांनीं नर्मदा उतरून दक्षिणेंत प्रवेश केला ही गोष्ट मोठी घडली. जलालुद्दीन हा पराक्रमी आणि शाहाणा असून फार सत्वस्थ होता. ह्याचा विचार करून मनास संतोष होतो; परंतु त्याच्या त्याच सत्वस्थपणामुळें मुलखांत बंदोबस्ताची कमती होऊन शेवटीं त्याच्या कृपेंतील पुतण्या अल्लाउद्दीन ह्यानें

कपटानें त्याचा प्राण घेतला, ही गोष्ट वाचून दया येती; आणि ज्या अल्लाउद्दीनानें असा कृतघ्नपणा केला, त्याचा पराक्रम आणि जय ह्यांचें आश्चर्य करावें, किंवा त्याच्या छांदिष्ट राजनीतीचा आणि त्याच्या क्रूर स्वभावाचा तिरस्कार करावा ह्याविषयीं संशय उत्पन्न होतो.

४. राजवंशांचे मूळ पुरुष बहुधा शाहाणे, गुणी, आणि योग्य असतात. ग्यासुद्दीन तघलख ह्याचेंही नांव ह्यामुळें स्मरण ठेवण्याजोगें आहे. त्याचा मुलगा महंमद तघलख ह्यास त्याच्या खेददायक मरणामुळें, जितकें राज्य प्राप्त झालें, तितक्याचाच बंदोबस्त शाहाणपणानें करून तो जर स्वस्थ असता, आणि तें वाढविण्याच्या व पैका जमविण्याच्या वेड्या मसलती आणि दुसरे अविचार तो न करिता, तर भागीरथी आणि तुंगभद्रा ह्यांच्या मधील साऱ्या हिंदुस्थानाचा राजा असा किताब त्यास मिळाला असता. परंतु अतिलोभ राज्याविषयीं होवो, किंवा द्रव्याविषयीं होवो, तो झाला असतां मोठे गुण आणि सामर्थ्य ह्यांपासून कांहीं फळ न होतां उलटा नाश होतो. ह्या गोष्टीचा प्रत्यय महंमद तघलख ह्यास आला, कारण तो मराठ्यांच्या पूर्वीं नर्मदेच्या उत्तरेस आणि दक्षिणेस बंडें होऊन निरानिराळीं कितीएक राज्यें झालेलीं त्याच्या दृष्टीस पडलीं; आणि त्यांचा स्वतंत्रपणा त्याच्या पुढील बादशाहास कबूल करावा लागला. पुढें लौकरच गुजराथ व जवानपूर एथें स्वतंत्र राज्यें झालीं; आणि शेवटीं इसवी सनाच्या चवदाव्या शेंकड्याच्या अखेरीस विजेच्या झपाट्याप्रमाणें तैमूरलंग ह्याची

स्वारी येऊन दिल्लीच्या आसपास धुमाळी झाली, तेणेंकरून दिल्लीच्या दरबारची चेतना बहुतकरून जाऊन धुगधुगी मात्र राहिली.

५. पुढें कांहीं वर्षेंपर्यंत ह्या मूळ जागींच्या संस्थानाची समाप्ति होण्याचाच वेळ आला होता; आणि ती मोडकी इमारत लोदी वंशाचे पराक्रमी, परंतु धर्माभिमानी आणि क्रूर राजे ह्यांच्या चातुर्यानें सरासरी सांवरून धरिली होती. अशा स्थितींत तिला बाबर ह्याच्या बळकट बाहूंचा टेंका मिळाला.

६. ह्या शेवटीं लिहिलेल्या मोंगल राजाचें शौर्य, भलेपणा, आणि विद्येचें व्यसन, हे तीनही गुण स्तुति करायासारखे योग्य आहेत. अशा बापास त्याच्या प्रमाणेंच गुणी, शूर आणि उदार मनाचा पुत्र हुमायून हा झाला. त्याकडे कांहीं दोष दिसण्यांत येत नसतां त्यास प्रवास, विपत्ति, आणि दारिद्र्य, इत्यादि संकटें भोगावीं लागलीं. ह्याचा विचार केला असतां दैवगति केव्हां केव्हां अतर्क्य असती, हा निश्चय होतो; आणि मनुष्यानें उपायांची पराकाष्ठा केली तथापि त्याचे प्रयत्न फसावे व त्यानें अहंकार सोडून आपण म्हणजे काय पदार्थ हें वारंवार ध्यानांत आणावें, असी विश्वाची व्यवस्था आणि निर्वाह ह्यांची काळजी ठेवणारा जो परमेश्वर त्याची इच्छा असें अनुमान होतें.

७. इकडे अशीं संकटें प्राप्त होऊन, व राज्याची पुरती घडामोड होऊन, त्याच हुमायून राजास जो पुत्र झाला त्यानें आपल्या प्रतापाच्या व बुद्धिकौशल्याच्या बळानें

राज्य परत घेऊन पहिल्यापेक्षां त्याचा विस्तार अधिक केला. ह्यांत ईश्वराचे इच्छेस येतें तेव्हां लहान कारणापासून मोठ्या उलटापालटी कशा होतात, ह्यांचें उदाहरण पाहावें. अकबर हा गादीवर आला तेवेळीं हिंदुस्थानाची स्थिति कशी होती, त्यांत अडचणी किती होत्या, आणि त्या दूर करण्यास त्याजवळ साहित्याचा तोटा कोणत्या प्रकारचा होता, हें सर्व सविस्तर लिहिलेंच आहे; आणि इतक्या अडचणी दूर होऊन त्यांस मोठें वैभव प्राप्त झालें, ह्यास इतर साधनांपेक्षां मुख्यत्वें अकबराचे जातीचे गुण साधन होत. ती वेळ मोठी परीक्षेची होती. अशा वेळेस दर्प आणि मृदुपणा, गुणी लोकांची आवड, बहुतांची आपणावर प्रीति होण्याजोगें आर्जव, नवीं राज्यें घेण्याविषयीं सामर्थ्य, हस्तगत झालेल्यांचें प्रतिपालन करण्याकडे लक्ष्य, उन्मत्तांस दंड, शरणागतांवर दया, इत्यादि परस्पर विरुद्ध गुणांच्या योगेंकरून मोठें राज्य स्थापण्यास जे पुरुष पृथ्वीवर जन्मत असतात, त्यांतला अकबर असें म्हणणें प्राप्त आहे.

८. अकबराच्या मुलांमध्यें त्याच्या गुणांपैकीं भलेपणा वगैरे कांहीं थोडे होते; आणि त्यांस बुद्धिवाद सांगण्यांत अकबराचे वेळचे प्रसिद्ध मंत्री खानखानान, इत्यादि होते, ह्यामुळें व्यवस्था बरीच चालली. त्याचा मुलगा भला आणि सुस्वभावाचा जो शाहाजहान त्याला अनुपकारी पुत्रांमुळें म्हातारपणीं राज्यनाश आणि दुःख प्राप्त झालेलें पाहून सर्वांच्या हृदयास द्रव येईलच.

९. चांगल्या राजांमध्यें मोठें पद संपादण्याजोगे जे बहुतेक गुण असतात ते औरंगजेबामध्यें असून त्यानें सर्वकाळ हलक्या आणि कपटाच्या मसलती केल्या; आणि ज्या राज्यांचें रक्षण करून आपण फळ भोगून राजाधिराज म्हणवावें, त्यांस समूळ उपटून टाकण्याचा प्रयत्न केला, आणि शौर्य उद्योग इत्यादि आपल्या असाधारण गुणांच्या योगें तो बराच सिद्धीस नेला; म्हणून पूर्वींच्या सर्व राजांच्या कारकिर्दीपेक्षां त्याचे वेळेस राज्य अधिक वाढलें; जीं संस्थानें हुकुमांत अर्धीं होतीं त्यांवर पुरा अमल बसला; आणि जीं अगदीं स्वतंत्रपणानें वागत होतीं तीं ताब्याखालीं आलीं असें वाटलें. परंतु दक्षिणेंतील मुसलमानांचीं राज्यें मोडल्यापासून असें झालें कीं, त्या लोकांचा संचार देशांत झाल्यामुळें जो वैराग्नि शेंकडों वर्षांपासून धुमत होता, आणि ज्यास औरंगजेब ह्याच्या जुलुमाचें व धर्माभिमानाचे कृतीचें सर्पण मिळालें होतें, तो वैराग्नि प्रदीप्त करून, शिवाजी आणि त्याचे वंशज जेव्हां मुसलमानांनीं केलेल्या कृति परत करूं लागले, तेव्हां दिल्लीच्या दरबारचे तर्फेनें तरवार उचलावयास कोणी सामर्थ्यवान राहिला नाहीं. हुजुरांतून मुलखाच्या बंदोबस्तास सुभेदार असत, आणि त्यांजवळ सैन्यही पुष्कळ असे खरें; परंतु हिंदुराज्य वाढूं द्यावयाचें नाहीं असा सर्व मुसलमानी संस्थानांचा जूट असून जी दहशत होती ती गेली, आणि हुजूरच्या मोठ्या कारभाऱ्यांमध्यें दक्षिणेंतील व्यवस्थेविषयीं दुर्लक्ष्य होऊं लागलें,

ह्यामुळें राज्याचे शत्रु जे बळावत चालले, ते शेवटीं अनिवार झाले.

१०. औरंगजेबाबरोबर मोंगलांच्या राज्याची समाप्ति झाली. पुढें सुमारें पन्नास वर्षेंपर्यंत तें दिवसानुदिवस क्षीण होत चाललें होतें. बादशाहाचे गादीवर जे बसत त्यांस आपल्या इच्छेनें कारभार करावयाचें सामर्थ्य नसे; लोभी आणि मतलबी पुरुष आपल्या स्वार्थाकरितां त्यांस सिंहासनावर बसवीत, आणि आपल्या मर्जीप्रमाणें ते त्यांस बाहुल्यांसारखें नाचवून आपलें कार्य झालें म्हणजे त्यांस अधिकारावरून काढीत किंवा त्यांचा प्राण घेत. महंमदशाहा ह्याच्यामध्यें राजाचे कांहीं गुण होते परंतु दक्षिणेचा सुभेदार असोफजा व अयोध्येचा सुभेदार ह्यांचे स्वार्थसाधनाकरितां जे कलह चालले होते त्यांतच त्यांचा बहुतेक काळ गेला. तशा मोडकळींत नादिरशाहा ह्याचें येणें झाल्यामुळें बादशाहाची प्रतिष्ठा लोकांच्या दृष्टीनें फारच कमी झाली, आणि बाबर व अकबर ह्यांचे वंशज म्हणून सर्व रयत व फौज ह्यांची दिल्लीच्या बादशाहाविषयीं जी प्रीति व बहुमान होता तो जाऊन सर्वांस ते तुच्छ वाटूं लागले, व सर्व त्यांचा तिरस्कार करूं लागले. अशांत अविचारी आणि उतावीळ जो ग्यासुद्दीन ह्यानें पुढील परिणामाचा विचार न पाहतां, दरबारांतील आपले प्रतिस्पर्धी ह्यांचें पारिपत्य व्हावें इतक्याच हेतूनें, मुसलमानांचे हाडवैरी जे मराठे त्यांस आमंत्रण देऊन बोलावून आणिलें. त्यांस तर पूर्वीं पांचशें वर्षांपासून जीं आपल्या

लोकांनीं दु:खें भोगिलीं होतीं व धर्मोच्छेद झाला होता, त्या सर्वांचा सूड उगवावयाचा होता; त्यामुळें त्यांनीं मुसलमानांची सत्ता बुडविण्याकरितां निकरानें कंबर बांधिलीच होती. ते मराठे व त्यांचे शत्रु अहंमदशाहा व त्यांच्या पक्षाचे सरदार ह्या उभयतांचे उद्योग दिल्लीची बादशाही मोडण्यास सारिखे अनुकूळ झाले. त्याचा प्रतिबंध करण्यास महमूद वगैरे प्राचीन मुसलमान राजांच्या वेळचा उत्साह, शौर्य, आणि धर्मवृद्धीविषयींचा आग्रह; किंवा अकबराची मसलत, दीर्घदृष्टि, आणि लोकरंजन; किंवा औरंगजेबाचें युद्धकौशल्य व कपट, ह्यांतून कांहींच साधन नाहीं असें झालें, म्हणून दिल्लीचें संस्थान असें जें नांव कांहीं वर्षांपासून शेष राहिलें होतें, तें पानिपतच्या मैदानावर लयास गेलें.

११. तेव्हां राज्याकरितां कलह करणारे जे होते ते सर्व परस्परांस हीनबळ करून आपापल्या जागीं बसले. पुढें लौकरच सारा मुलूख नव्या कोणीएक लोकांच्या अमलाखालीं एकवटून दिल्लीच्या राज्यापेक्षां मोठें राज्य उत्पन्न व्हावें अशी ईश्वरेच्छा होती. ह्या नव्या लोकांच्या चातुर्यापुढें आणि कौशल्यापुढें अकबर आणि औरंगजेब हे जरी पुन: जिवंत होते तरी त्यांचें कांहीं न चालतें.

# दिल्लीचे बादशाहा.

| नांवें. | इ० स० | हि० स० |
|---|---|---|
| कुतुबुद्दीन मूळ गादी स्थापणारा .... | १२०६, | ६०३ |
| आरामशाहा .... .... .... | १२१०, | ६०७ |
| अलतमषशाहा .... .... .... | १२११, | ६०८ |
| रुक्नुद्दीन .... .... .... .... | १२३६, | ६३४ |
| रजियाबेग .... .... .... | १२३६, | ६३४ |
| मवजुद्दीन .... .... .... .... | १२३९, | ६३७ |
| अल्लाउद्दीन मसाऊद .... .... | १२४१, | ६३९ |
| नासरुद्दीन .... .... .... .... | १२४५, | ६४३ |
| ग्यासुद्दीन बुल्बुन .... .... .... | १२६६, | ६६५ |
| कैकुबाद .... .... .... .... | १२८६, | ६८५ |
| जलालुद्दीन .... .... .... | १२८८, | ६८७ |
| अल्लाउद्दीन .... .... .... | १२९५, | ६९५ |
| मुबारीक .... .... .... .... | १३१७, | ७१७ |
| खुसरू .... .... .... .... | १३२१, | ७२१ |
| ग्यासुद्दीन तघलख ऊर्फ गाजीखान | १३२१, | ७२१ |
| यूनाखान .... .... .... .... | १३२५, | ७२६ |
| फिरूजुद्दीन .... .... .... | १३५१, | ७५२ |
| ग्यासुद्दीन तघलख दुसरा .... .... | १३८८, | ७९१ |
| अबूबखर .... .... .... .... | १३८९, | ७९२ |
| नासरुद्दीन .... .... .... .... | १३९०, | ७९३ |
| हुमायून ह्यानें ४५ दिवस राज्य केलें. | | |
| महमूद तघलख .... .... .... | १३९४, | ७९७ |
| दौलतखान लोदी .... .... .... | १४१२, | ८१५ |

| नांवें. | इ० स० | हि० स० |
|---|---|---|
| खिझरखान.... .... .... .... | १४१४, | ८१७ |
| सय्यद मुबारीक .... .... .... | १४२१, | ८२४ |
| सय्यद महंमद .... .... .... | १४३५, | ८३९ |
| सय्यद अल्लाउद्दीन .... .... | १४४४, | ८४८ |
| बहिलोलखान लोदी .... .... | १४५०, | ८५४ |
| शिकंदरशाहा .... .... .... | १४८८, | ८९४ |
| इब्राहिम .... .... .... .... | १५१६, | ९२२ |
| बाबर .... .... .... .... | १५२६, | ९३३ |
| हुमायून दुसरा .... .... .... | १५३०, | ९३७ |
| शीरशाहा .... .... .... | १५४२, | ९४९ |
| सलीमशाहा .... .... .... | १५४४, | ९५१ |
| महंमदशाहा सूरआदिली .... | १५५३, | ९६१ |
| अकबरशाहा .... .... .... | १५५६, | ९६४ |
| जहानगीर .... .... .... | १६०५, | १०१४ |
| शहाजहान .... .... .... | १६२८, | १०३८ |
| औरंगजेब .... .... .... | १६५८, | १०६९ |
| मोअज्जीन .... .... .... | १७०८, | ११२० |
| जहानदार .... .... .... | १७१२, | ११२४ |
| फरुकशीर .... .... .... | १७१३, | ११२५ |
| महंमदशाहा .... .... .... | १७१९, | ११३२ |
| अहंमदशाहा .... .... .... | १७४८, | ११६१ |
| अलमगीर .... .... .... | १७५४, | ११६८ |

अलमगीर हा १७५९ त मेल्यावर पुढें नामधारी बादशाहा गादीवर बसले.

# अकबर बादशाहाच्या पूर्वीं झालेल्या मांडलिक राजांचीं नांवें.

## १ ब्राह्मणी राजे.

| नांवें. | इ० स० | हि० स० |
|---|---|---|
| हुसेन गंगू ऊर्फ अल्ला उद्दीन मूळ पुरुष | १३४७, | ७४८ |
| महंमद पहिला .... .... .... | १३५८, | ७५९ |
| मुजाहिद .... .... .... .... | १३७५, | ७७६ |
| दाऊद .... .... .... .... | १३७८, | ७८० |
| महमूद पहिला .... .... .... | १३७८, | ७८० |
| ग्यासुद्दीन .... .... .... | १३९७, | ७९९ |
| शमसुद्दीन .... .... .... | १३९७, | ७९९ |
| फिरूझ .... .... .... .... | १३९७, | ८०० |
| अहंमद पहिला .... .... .... | १४२२, | ८२५ |
| अल्ला उद्दीन .... .... .... | १४३५, | ८३९ |
| हुमायून .... .... .... .... | १४५७, | ८६२ |
| निजाम .... .... .... .... | १४६१, | ८६५ |
| महंमद दुसरा .... .... .... | १४६३, | ८६७ |
| महमूद दुसरा .... .... .... | १४८२, | ८८७ |
| अहंमद दुसरा (नामधारी) .... | १५१८, | ९२४ |
| अल्लाउद्दीन दुसरा .... .... | १५२०, | ९२७ |
| वाली .... .... .... .... | १५२२, | ९२९ |
| कलीम .... .... .... .... | १५२६, | ९३३ |

| नांवें. | इ० स० | हि० स० |
|---|---|---|
| **२ विजापूरचे राजे.** | | |
| युसुफ आदिलशाहा मूळ पुरुष .... | १४८९, | ८९५ |
| इस्मायल आदिलशाहा .... .... | १५१०, | ९१५ |
| मल्लू आदिलशाहा .... .... | १५३४, | ९४१ |
| इब्राहिम आदिलशाहा .... .... | १५३५, | ९४१ |
| अलीआदिलशाहा .... .... | १५५७, | ९६५ |
| इब्राहिम आदिलशाहा दुसरा .... | १५७९, | ९८७ |
| **३ अहंमदनगरचे राजे.** | | |
| अहंमदशाहा मूळपुरुष .... .... | १४९०, | ८९६ |
| बुऱ्हाण .... .... .... .... | १५०८, | ९१४ |
| हुसेन .... .... .... .... | १५५३, | ९६१ |
| मुर्तिजा .... .... .... .... | १५६५, | ९७२ |
| मिरानहुसेन .... .... .... | १५८८, | ९९६ |
| इस्मायल .... .... .... | १५८८, | ९९७ |
| बुऱ्हाणदुसरा .... .... .... | १५९०, | ९९९ |
| इब्राहिम .... .... .... .... | १५९४, | १००३ |
| अहंमद दुसरा .... .... | १५९४, | १००४ |
| बहादूर .... .... .... .... | १५९५, | १००४ |
| **४ गोंवळकोंड्याचे राजे.** | | |
| सुलतान कुतुबकुली मूळपुरुष .... | १५१२, | ९१८ |
| जमशीद .... .... .... | १५४३, | ९४० |
| सुभानकुली .... .... .... | १५५०, | ९५७ |
| इब्राहिम .... .... .... .... | १५५०, | ९५७ |

| नांवें. | इ० स० | हि० स० |
|---|---|---|
| महंमदकुली .... .... .... | १५८०, | ९८८ |

## ५ वऱ्हाडचे राजे.

| | | |
|---|---|---|
| फत्तेअल्ला मूळ पुरुष .... .... | १४८४, | ८९० |
| अल्लाउद्दीन .... .... .... | १५०४, | ९१० |
| देरिआ .... .... .... .... | १५२९, | ९३६ |
| बुऱ्हाण .... .... .... .... | १५६०, | ९६१ |
| तुफाल. | ” | ” |

## ६ बेदरचे राजे.

| | | |
|---|---|---|
| कासिम .... .... .... .... | १४९८, | ९०४ |
| अमीर .... .... .... .... | १५०४, | ९१० |
| अली .... .... .... .... | १५४९, | ९४५ |
| इब्राहिम .... .... .... .... | १५६२, | ९९० |
| कासिम दुसरा .... .... .... | १५६९, | ९९७ |
| मिर्झाअली .... .... .... | १५७२, | १००० |
| अमीर दुसरा | ” | ” |

## ७ गुजराथचे राजे.

| | | |
|---|---|---|
| मुजफरशाहा .... .... .... | १३९६, | ७९९ |
| अहंमदशाहा .... .... .... | १४१२, | ८१५ |
| महंमदशाहा .... .... .... | १४४३, | ८४७ |
| कुतबशाहा .... .... .... | १४५१, | ८५५ |
| दाउदशाहा ह्यानें एक आठवडा राज्य केलें. | | |
| महमूदशाहा बेगर .... .... | १४५९, | ८६३ |

| नांवें. | इ० स० | हि० स० |
|---|---|---|
| मुजफरशाहा दुसरा .... .... | १५११, | ९१७ |
| शिकंदरशाहा.... .... .... | १५२६, | ९३२ |
| महमूदशाहा दुसरा .... .... | १५२६, | ९३२ |
| बहादुरशाहा .... .... .... | १५२६, | ९३२ |
| मीरानमहंमद शाहाफरूखी .... | १५३६, | ९४३ |
| महमूदशाहा तिसरा .... .... | १५५३, | ९६१ |
| अहंमदशाहा दुसरा .... .... | १५६१, | ९६९ |
| मुजफरशाहा तिसरा ... .... | १५६१, | ९६९ |

## ८ माळव्याचे राजे.

| | | |
|---|---|---|
| दिलावरगोरी मूळ पुरुष .... | १४०१, | ८०४ |
| हुसेनगोरी .... .... .... .... | १४०५, | ८०७ |
| महंमदगोरी.... .... .... .... | १४३२, | ८३५ |
| महमूदखिलजी .... .... .... | १४३५, | ८३९ |
| ग्यासुद्दीनखिलजी .... .... | १४८२, | ८८७ |
| नासरुद्दीन खिलजी.... .... .... | १५००, | ९०६ |
| महमूदखिलजी दुसरा .... .... | १५१२, | ९१६ |

## ९ खानदेशचे राजे.

मलिकराजा

| | | |
|---|---|---|
| नासिरखान (पहिला राजा) .... | १३९९, | ८०१ |
| मिरान आदिलखान.... .... .... | १४३७, | ८४१ |
| मिरान मुबारिक .... .... .... | १४४१, | ८४४ |
| आदिलखान पहिला .... .... | १४५७, | ८६१ |
| दाऊदखान ... .... .... .... | १५०३, | ९०९ |

| नांवें. | इ० स० | हि० स० |
|---|---|---|
| आदिलखान दुसरा.... .... .... | १५१०, | ९१६ |
| मिरान महमदशाहा .... .... | १५२०, | ९२६ |
| मिरान मुबारिक दुसरा .... .... | १५३५, | ९४२ |
| मिरान महंमदखान .... .... .... | १५६६, | ९७४ |
| राजा अलीखान.... .... .... | १५७६, | ९८४ |
| बहादुरशाहा ... .... .... | १५९६, | १००५ |

## १० बंगालचे राजे.

| | | |
|---|---|---|
| फकरुद्दीन ... .... .... | १३३८, | ७३९ |
| अलाउद्दीन .... .... .... | १३४०, | ७४१ |
| हजीइलिआस ऊर्फ शमसुद्दीन .... | १३४२, | ७४३ |
| शिकंदर .... .... .... .... | १३५७, | ७५९ |
| ग्यासुद्दीन .... .... .... | १३६७; | ७६९ |
| सुल्तान उसलातीन .... .... | १३७४, | ७७५ |
| शमसुद्दीन दुसरा .... .... | १३८३, | ७८५ |
| राजाकान .... .... .... | १३८६, | ७८८ |
| जेटमल अथवा जलालुद्दीन .... | १३९२, | ७९५ |
| अहंमद .... .... .... | १४०९, | ८१२ |
| नासिरुद्दीन .... .... .... | १४५६, | ८३० |
| नासिर .... .... .... | १४२६, | ८३० |
| बार्बिक .... .... .... | १४२८, | ८३२ |
| युसुफ .... .... .... | १४४५, | ८४९ |
| फत्ते .... .... .... .... | १४६१, | ८६६ |
| शाहाजादा .... .... .... | १४८१, | ८८६ |

| नांवें. | इ० स० | हि० स० |
|---|---|---|
| फिरूझ .... .... .... | १४८१, | ८८६ |
| महमूद .... ... .... | १४९३, | ८९९ |
| मुजफर .... .... .... | १४९४, | ९०० |
| अल्लाउद्दीन दुसरा .... .... | १४९७, | ९०४ |
| नसरत .... .... .... | १५१२, | ९२७ |
| महमूद दुसरा .... .... .... | १५३४, | ९४० |
| शीरशाहा .... .... .... | १५३८, | ९४५ |
| सलीम .... .... .... .... | १५४५, | ९५२ |
| आदिली .... .... .... | १५४८, | ९५५ |
| बहादूर .... .... .... | १५५३, | ९६१ |
| जलालुद्दीन .... .... | १५६०, | ९६८ |
| सुलेमान किराणी ... .... | १५६३, | ९७१ |
| बायजीद .... .... | १५७३, | ९८१ |
| दाऊद .... .... .... | १५७३, | ९८१ |

## ११ जवानपूरचे राजे.

| | | |
|---|---|---|
| खाजाजहान .... .... | १३९४, | ७९६ |
| मुबारिक .... .... .... | १३९९, | ८०२ |
| इब्राहिम .... .... .... | १४०१, | ८०४ |
| महमूद .... .... .... | १४४०, | ८४४ |
| महंमद .... .... .... | १४५७, | ८६२ |
| हुसेन .... .... .... | १४५७, | ८६२ |

समाप्त.